

# आमच्या देशाची स्थिती

निबंधमालेतील

... केला ...

चित्रशाळा प्रकाशन

IRBK-0103174

IRBK-0103174

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें

विषय वा॰वा॰

दा. क्र. ३१७४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

३७५४

# आमच्या देशाची स्थिति

( निबंधमालेंतील जप्त झालेला निबंध )

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर

पुनर्मुद्रण
सन १९४८.

—मुद्रक व प्रकाशक—
दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. ( टिळक ), चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ, पुणें २.

ग्रंथ संग्रहालय
३७५४
क्र. ३७५४
वि. बा. बा.

किं

IRBK-0103174
IRBK-0103174

# प्रस्तावना.

२३ वर्षांच्या दीर्घकालीन बंदीनंतर कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा हा निबंध प्रसिद्ध करण्याचा सुयोग आला याबद्दल अत्यंत आनंद होत आहे. नव्या राज्यघटनेनुसार कॉंग्रेसचें मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालें व त्यांनीं या निबंधावरील जप्ती उठविली याबद्दल आम्ही मंत्रिमंडळाचे आभारी आहों.

परतंत्र राष्ट्रांतील लोकांना आपले विचार उघडपणें बोलण्यास अगर प्रसिद्ध करण्यास अधिकारी सत्ता मनाई करीत असते. परतंत्र राष्ट्रांतील जिवंत, स्फूर्तिप्रद व यथार्थ चित्र रेखाटलेल्या वाङ्मयाला सूर्यदर्शन होऊं न देण्याची खबरदारी सरकारकडून घेतली जाते. पण घड्याळ बंद ठेवलें म्हणून सूर्योदय होण्याचा थोडाच थांबतो ! मनुष्याच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति ज्यावर निर्बंध जास्त तें उपलब्ध करून घेण्याकडे अधिक असते. आजकाल राजकीय असंतोषाचा महासागर इतका तुफान झाला आहे कीं, इंग्रज सरकारची अवघी सेना एकवटली तरी ती त्या सागराला मार्गे रेटूं शकणार नाहीं.

कै. शास्त्रीबुवांनीं व त्यांच्या समकालीन लेखकांनीं लावलेला हा असंतोषाचा वटवृक्ष आतां सारा हिंदुस्थान व्यापून बसला आहे; आणि अशा वेळीं जुन्या काळच्या वाङ्मयाला कपाटांत कोंडून ठेवणें म्हणजे स्वतःचेंच हंसें करून घेणें आहे. पण जें पुस्तक जप्त होतें तेंच वाचण्याची लोकांना आतुरता असते आणि पुस्तक जप्त करणें म्हणजे त्याच्या चांगुलपणाची जाहिरात देणेंच आहे.

आजकाल इंग्रजी राज्यासंबंधींच वाभाडे अधिक प्रखरपणें व निर्भयपणें काढणारे अनेक लेखक व वक्ते विद्यमान आहेत. पण शास्त्रीबुवांचा काळ हा अव्वल इंग्रजीचा काळ असल्यामुळें राज्यकर्त्यांविषयीं अप्रीति उत्पन्न करणारे लेख लिहिणें म्हणजे बंडाचा पुरस्कार करण्याइतकेंच कठीण होतें. तथापि असल्या प्रतिकूल परिस्थितींत शास्त्रीबुवांनीं जे निर्भयपणें, सडेतोडपणें व मर्मी घाव घालणारे विचार प्रदर्शित केले आहेत त त्यांच्या जळजळणाऱ्या अंतःकरणाचे स्फोट आहेत असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं. शंभरांतील ९९ माणसें जेव्हां इंग्रजांना नांवें ठेवतात, तेव्हां एखाद्यानें आपलें हृदय मोकळें करणें वेगळें आणि जेव्हां शंभरांतील ९९ माणसें इंग्रजांची स्तुति करीत होती तेव्हां एकानें वाक्प्रहार करण्यास उद्युक्त होणें निराळें !

ज्यावेळीं शास्त्रीबुवांनीं हा निबंध लिहिला, त्यावेळीं इंग्रजांचें राज्य म्हणजे एक ईश्वरी देणगी समजली जात होती. आपण परतंत्र कां झालों तर आपला धर्म गचाळ, सामाजिक चालीरीति रानटीपणाच्या, आपला इतिहास व परंपरा कुचकामाची असा न्यूनगंड विद्वानांमध्यें निर्माण झाला होता. शास्त्रीबुवांनीं हें

मनावरील लघुत्वाचें दडपण झुगारून दिलें आणि स्वतःच्या संस्कृतीचा, धर्माचा, सामाजिक आचारविचारांचा आरसा लोकांच्यापुढें धरून त्यांना यथार्थ स्वरूप पटवून दिलें. ते म्हणतात, ' आमच्या देशास कांहींएक झालें नाहीं. त्याची नाडी अद्याप साफ आहे...... इंग्रेज लोक हे आम्हांहून अनेक प्रकारांनीं बलिष्ठ असल्यामुळें व आमचें दैव फिरल्यामुळें हल्लींच्या अवस्थेंत आम्ही येऊन पडलों आहों. ' दैववादाचा सिद्धांत आपण अमान्य करूं, पण इंग्रजांचा बलिष्ठपणा मान्य करावयास पाहिजे. या आपत्तींतून सुटण्याकरतां युद्ध करणें शक्य नाहीं. सारी जनता जागृत केली पाहिजे. म्हणजे जगांतील जागृत देशांत जशी क्रांति झाली, तशी आपल्याहि देशांत होईल असा विश्वास त्यांनीं प्रकट केला आहे. यापेक्षां राजकीय परिस्थितीचें स्पष्ट व सुश्लिष्ट निदान आजहि आपण करूं शकत नाहीं.

इंग्रजी राज्याबद्दल शास्त्रीबुवांची टीका इतकी प्रखर व आग पाखडणारी आहे कीं, ती सरकारला झोंबली असली तर नवल नाहीं. ते म्हणतात, " जें राष्ट्र इंग्लिश लोकांचे पाय येथें लागण्यापूर्वी लक्ष्मी, सरस्वती, अन्नपूर्णा, वीरश्री, इत्यादिकांनीं युक्त होतें, तेथें, सारी नासाडी करून टाकून सहाराचें वाळवंट करून सोडलें हां—परम देदीप्यमान कीर्ति तरी आमच्या श्वेतद्वीपीय बंधूंच्या वांट्यास येऊन तिचा ध्वज यावच्चंद्रदिवाकरौ फडकत राहील. " दुसऱ्या ठिकाणीं ते म्हणतात, 'हल्लीं सुधारणेचा कळस दृष्टीस पडत आहे कीं, साहेबी बूट खाऊनहि लोक चाकरी करायला तयार असतां कोणास पोटभर अन्न नाहीं, जिकडेतिकडे रोगराई, अशक्तता, दैन्य इत्यादींचा प्रचार, जेथें शेंकडों हजारों वीर हां हां म्हणतां गोळा व्हायचे तेथें आतां कोणास स्वप्नींहि तरवारीचें किंवा बंदुकीचें दर्शन नाहीं. ' या सरकारनीं काय केलें ? ' त्यांनीं आमच्याकरतां येवढी तसदी घेऊन खोट्या सह्या करा, दिवसा ढवळ्या दरवडे घाला, असा क्रम आरंभून, ' वगैरे वगैरे, या गोष्टी इंग्रजांनीं केल्याचें शास्त्रीबुवांनीं इतिहासावरून दाखवून दिलें आहे. ' गोमाजीनें उठून तिमाजीच्या घरावर दरवडा घालावा, त्याची चीजवस्त लुटून त्याचा जीव घ्यावा, बायको उपटावी, मुलामाणसांस बंदे गुलाम करून आपल्या घरीं न्यावें ' हा प्रकार जितका दुष्टपणाचा व पाजीपणाचा तितकाच दुसऱ्याच्या मुलखावर स्वारी करणें ... ... हाहि आहे. " इंग्रजी राज्याची व पेंढाऱ्यांची तुलना करतांना शास्त्रीबुवा म्हणतात, "मागें पेंढाऱ्यांच्या राज्यांत आमचे लोक दुसऱ्या गांवीं जात किंवा डोंगरकपारींत दडून बसून .... पण हल्लींच्या सुधारलेल्या राज्यांत ... टॅपल साहेबांनीं खुदावंत होऊन खुदाच्या मुलाखतीला आपल्या मुलखांतील लाखों प्रजा एकदम रवाना करून दिली. "

दुसऱ्या ठिकाणीं ते म्हणतात, ' इंग्रज लोक इकडे प्रभु होण्यापूर्वी हा देश फार संपन्न होता व मुसलमानांची जुलमी म्हटलेली कारकीर्द सांप्रतच्या कारकीर्दीहून शंभर वांट्यांनीं बरी वगैरे...' इंग्रज लोकहि बोलून दाखवतात. ज्या इंग्रजांची कदर ' इमल्याच्या खालच्या जमिनीपर्यंत झाडावरच्या पानापर्यंत व जेवणांतल्या मिठापर्यंत त्यांच्या मगरमिठींत सांपडलेल्या बिचाऱ्या राष्ट्राची स्थिति तरी काय सांगावी ? '. अशा स्थितींत सांपडलेल्या भरतखंडास " श्वेतद्वीपस्थ माता खुशाल थोपवून अंगाई करविते आहे व गाढ झोंप येण्याकरतां इंग्रजी सुधारणेशा थोडीशी अफूहि चारल्यामुळें तें घोरत पडलें आहे." या सर्वांचा परिणाम काय झाला ? शास्त्रीबुवा म्हणतात, ' आम्ही तूर्त जगांतून उठल्यासारखें झालों आहों. आमची स्थिति पशूसारखी झाली आहे. ' पाशवी अवस्थेंत मनुष्य कोणत्या थराला जातो याचेंहि त्यांनीं परिणामकारक वर्णन केलें आहे. हें वर्णन त्या काळच्या पोटभरूंना उद्देशून आहे. पारतंत्र्यामुळें मनुष्य मानधनशून्य, निर्लज्ज, धैर्यहीन बनतो व भ्रष्ट होतो. ' जन्मास येऊन काय करावें तर परदास्य करावें, यजमानाची खुशामत करावी, लांड्यालबाड्या कराव्या, लोकांच्या मुंड्या मुरगळाव्या, वरिष्ठांची थुंकी झेलून हाताखालच्यांना गांजावें, व शेवटीं पैशाची गांठोडीं उराशीं घट्ट बांधून एके दिवशीं मरून जावें.'

अशा प्रकारें या निबंधांत शास्त्रीबुवांनीं हिंदुस्थानच्या स्थितीचें सर्व बाजूंचें चित्र रेखाटलें आहे. शिकलेले लोक धर्मद्वेषी, समाजद्वेषी, परक्यांची चाकरी करणारे; गरीब जनता दरिद्री व मृत्युपंथाला लागलेली; संस्थानिक चैनींत व आळसांत काळ कंठणारे; आणि सरकार प्रजेला जास्त जास्त जेरीस आणणारें असें होतें. आज ही स्थिति अधिकच बिघडली आहे हें कोणीहि कबूल करील. तेव्हांच्या व आतांच्या परिस्थितींत फरक असला तर अंशांचा. एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं, शास्त्रीबुवांच्या वेळेपासून आजपर्यंत जें डोळ्यांत चरचरीत अंजन पडलें त्यामुळें लोक सावध झाले, स्वाभिमानी झाले व परराज्याचा तिटकारा करूं लागले. या आघाडीच्या लेखकाबद्दल आपण कृतज्ञ असलें पाहिजे. आज त्यांच्यासारख्यांच्या लिखाणाला खतपाणी घालून राष्ट्रीय जागृतीचा वृक्ष डौलदार, फलपुष्पान्वित झाला आहे आणि त्यांतच राष्ट्राच्या उत्कर्षाचीं व वैभवाचीं बीजें दिसत आहेत.

अशा प्रकारचा हा विद्वत्ता, सडेतोड युक्तिवाद, प्रखर टीका, जळजळीत देशभक्ति वगैरेंनीं युक्त असलेला निबंध प्रत्येकानें अवश्य वाचला पाहिजे आणि आपल्या देशभक्तीला या तेजाबाच्या पाण्यानें उजळा दिला पाहिजे.

ता. २०।१०।३७.

त्र्यं. र. देवगिरीकर.

...महाराष्ट्र ...
अनुक्रम........
विभाग........
क्रमांक........
नों. दि.........

# आमच्या देशाची स्थिति

## दुर्लभं भारते जन्म मानुष्यं तत्र दुर्लभम् । *

१. प्रस्तुत विषय हा वस्तुतः पाहतां अत्यंत व्यापक होय, म्हणजे त्यांत शेकडों गोष्टींचा विचार करतां येण्यासारखा आहे, हें उघडच आहे. आमची सांप्रत जी स्थिति आहे तिजविषयीं ऊहापोह करावयाचा म्हटलें म्हणजे त्यांत कितीक प्रकार येतात! प्रथमतः आपलीं आजपर्यंत काय काय अवस्थांतरें होत गेलीं याचा विचार करणें जरूर आहे; कां कीं, सध्यांची स्थिति हें त्या सर्वांचें मिळून एकंदर फळ होय. वरील पूर्व-पीठिका झाल्यानंतर हल्लीं आमची काय हालहवाल आहे ती पाहिली पाहिजे. ही स्थिति फार चमत्कारिक आहे हें उघडच आहे; तिला आमच्या पूर्व इतिहासांतच काय, पण बहुधा साऱ्या जगाच्या इतिहासांत ही तोड सांपडणें बहुधा कठीण पडेल! हा दुसरा भाग झाल्यानंतर तिसरा व शेवटचा भाग आमची भावी स्थिति होय. हिजविषयीं अनेकांचे अनेक तर्क आहेत. हे कितपत खरे होतील हें एका परमेश्वरावांचून इतरांस अगम्यच होय!

प्रस्तुत विषयाचा वर सांगितला येवढा वस्तुतः पाहतां जरी विस्तार

---

* "या भरतखंडांत जन्म पावणें हें अगोदर दुर्लभ आणि त्यांतून मानुष्य दुर्लभ!"

आहे, तरी त्यांतला विशेष उपयुक्त व निश्चित असा भाग म्हटला म्हणजे मधलाच होय हें उघड आहे. कां कीं, या देशाची पुढें काय स्थिति होणार याविषयींचे तर्क तरी कितीसे निश्चयात्मक होणार आहेत हें कोणीही सांगेल, व असल्या शुष्क तर्कांपासून उपयोग कितीसा होणार आहे हेंही दिसतेंच आहे. बरें, मागील काळाविषयीं पाहिलें, तर आमचा इतिहास ग्रीक व रोमन लोकांच्या इतिहासाप्रमाणें साद्यंत तर मिळत नाहींच; पण जी कांहीं इकडची तिकडची माहिती माराकूट करून मिळते तीही परा-काष्ठेची संदिग्ध व तुटक मिळते. भूमि खणतां खणतां एकादा भौमासुराचा वाडा लागला तर त्यावरील लेख एके हातांत घ्यावा, व दुसऱ्या हातांत एकाद्या रोमन इतिहासकाराचें वाक्य घ्यावें; किंवा ‘ विष्णुपुराणां ’ तला एकादा श्लोक घ्यावा, आणि अमुक अमुक ग्रीक इतिहासकाराचा अमुक अमुक लेख आहे म्हणून त्याशीं तो ताडून पाहावा; याप्रमाणें ‘ शंख मिऱ्याचा डोला आणि पर्वतीच्या पायऱ्या ’ अशी कांहीं सांगड लावून देऊन बादरायण संबंध जोडून द्यावा येवढाच काय तो हल्लींच्या स्थितींत मार्ग उरला आहे ! असें करतांना ‘ मृच्छकटिक ’ नाटकांतला ‘ भावश्चेटः चेटो भावः ’ * हा प्रकार किती वेळां घडत असेल कोण जाणे ! तेव्हां भूत, भविष्य व वर्तमान या तिहींपैकीं तिसऱ्याविषयींच आपणांस निश्च-यात्मक विवेचन करतां येणार आहे, व त्यापासूनच विशेष लाभही आहे. वास्तव तोच घेऊन त्यावर आमचे काय काय विचार आहेत ते वाचकांस सादर करतों.

२. हे विचार या वेळेस सादर करण्याचें एक मोठें कारण असें आहे कीं, आजपर्यंत या विषयाच्या संबंधानें आमचे जे जे विचार प्रगट होत गेले त्यांवरून कित्येकांस एक मोठी शंका उत्पन्न झाली आहे कीं, आमचीं स्वतःचीं मतें तरी काय आहेत ? आम्ही कधीं कधीं नव्या लोकांस नांवें ठेवतों; व कधीं कधीं जुन्यांसही ठेवायला चुकत नाहीं. कधीं इंग्रजांची व

---

* ‘ मृच्छकटिका ’ च्या प्रथम प्रदेशांत शकार, विट, व चेट हे अंधा-रांत वसंतसेनेस शोधीत असतां वरील चुकभुली झाल्या आहेत. प्रथम अंक पाहावा.

इंग्रेजी ग्रंथकारांची आम्ही तारीफ केलेली आढळते; कधीं तोच उलटही प्रकार आढळतो. तेव्हां हें आहे तसें काय ? एक आमचें कोणत्याच विषयावर कांहींच मत निश्चित म्हणून नाहीं असें तरी असलें पाहिजे; किंवा उगीच हें कांहीं तरी गौडबंगाल तरी आम्ही चालवीत असूं ! 'इसापनीती' तील वनदेवास वाटसराची परस्परविरोधी कृति पाहून जसा आचंबा वाटला, व हा लबाड आहे असा त्यानें सिद्धांत करून टाकला; किंवा ग्रहांच्या विचित्र गति, म्हणजे त्यांचें प्रचलन, स्तंभन व वक्रीभवन, ऽ हे प्रकार पाहून प्राचीन ज्योतिषी जसे गोंधळून जात; त्याप्रमाणेंच आमचें मतवैचित्र्य पाहून अनेक वाचक बुचकळ्यांत पडले आहेत असें आम्हांस समजलें आहे. त्याप्रमाणेंच इतर आक्षेपकांचें असेंही म्हणणें आमच्या कानांवर आलेलें आहे कीं, आम्ही हें बरोबर नाहीं, तें बरोबर नाहीं याप्रमाणें दोषाविष्करण मात्र करतों; पण बरोबर कोणतें, व करावें काय, याविषयीं कोठेंच कांहीं सांगत नाहीं. केवळ निषेध करून काय फळ आहे ? निषेध करील त्यानें विधीचाही मार्ग सांगणें अवश्य होय !

आतां प्रथमतः वरील दोन आक्षेपांचा थोडासा विचार करणें जरूर आहे. पहिला आक्षेप हा कीं, आमचें स्वतःचें मत काय आहे तें निश्चित-पणें समजत नाहीं. वस्तुतः पाहतां आजपर्यंत जे जे विषय आम्ही हातीं घेतले त्यांजवर इतरांचे जसे अभिप्राय प्रगट केले त्याप्रमाणेंच आम्हीं आपलेही प्रगट केले आहेत; मग त्यांत संदिग्धपणा कोणता राहिला आहे हें

---

ऽ जो एकाद्या ग्रहाच्या गतीकडे लक्षपूर्वक अवलोकन करील त्यास पुढील विलक्षण प्रकार दृष्टिगोचर होणार आहेतः—कधीं कधीं त्यांची गति सारखी पुढें चालली असते, केव्हां केव्हां तो जागच्याजागीं अडून राहिल्या-सारखा दिसतो, व दुसऱ्या वेळीं पहावें तो, स्वारी मागें मुरडून पिच्छेहाटही करते ! या शेवटल्या दोन प्रकारांस अनुक्रमें करून स्तंभन व वक्रीभवन अशा ज्योतिषांतील संज्ञा आहेत. हे सर्व विचित्र आभास पृथ्वीच्या सम-कालिक गतीमुळें होतात हें आमच्या वाचकांपैकीं कांहीं मंडळीस तरी माहीत असेलच.

आम्हांस कांहीं समजत नाहीं ! आतां आमचें प्रतिपादन कधीं या पक्षाचें असतें व कधीं त्या पक्षाचें असतें हें खरें आहे; पण याचें कारण आमचें बुद्धिचांचल्य नव्हे, तर सत्याचेंच चांचल्य होय. सत्य हें एकाच राष्ट्राला, एकाच धर्माला, किंवा एकाच पक्षाला अनुसरून असतें असें नाहीं; तर अशोधित धातूंत जसे सुवर्णरज यदृच्छेनें मिसळलेले असतात, व रसायन-व्यापारांनीं त्यांचें पृथक्करण करून ते वेगळे काढावे लागतात, त्याप्रमाणेंच सत्याचीही गोष्ट होय. त्याचे अंश ज्यांत मिश्रित झाले नाहींत असा प्रायः कोणताही पक्ष नाहीं. यास्तव एकाच पक्षाचा दृढ अभिमान धरणें हा दुरभिमान होय. तर लोकांत यथार्थ ज्ञानाचा प्रसार करण्याचें काम जो पतकरील त्यानें केवळ एका सत्याचीच ओळख ठेवली पाहिजे. अमुक अमुक पक्षाचे किंवा अमुक अमुक मताचे आम्ही अभिमानी आहों असा बाणा 'बॉंबे गॅझिट्' किंवा 'ज्ञानोदय' यांच्याप्रमाणेंच त्यानें बाळगणें म्हणजे आपलें कर्तव्य विसरून जाणें होय. तर हें तत्त्व नीट लक्षांत ठेवलें असतां आमच्या लेखांत जे कोणास विरोध भासत असतील त्यांचा तेव्हांच परिहार होणार आहे !

दुसरा मुद्दा असा कीं, एकाद्या गोष्टीला जो कोणी नांवें ठेवील त्यानें ती सुधारावी कशी हेंही पण जरूर सांगितलें पाहिजे; नाहीं तर नांव ठेवण्यास त्यास अकत्यार नाहीं. हा मुद्दा किती पोकळ आहे हें बहुधा कोणालाही कळणार आहे. अमका मनुष्य नकटा आहे असें कोणी म्हटल्याबरोबर त्याचें नाक 'चांपेकळी' सारखें करून देण्याचा बोजा लागलींच त्याच्या डोक्यावर येऊन आदळतो काय ? वैद्यानें आपली नाडी पाहून अमुक अमुक विकृति आपल्याला जडली आहे असें सांगितल्याबरोबर अथेल्लोनें जशी यागोची गचांडी धरली त्याप्रमाणें वैद्यराजांवर प्रयोग केला असतां चालेल काय ? 'इंग्रेजी राज्य जुलमी आहे' हे शब्द तोंडावाटे काढावयाचे, तर अगोदर पार्लमेंट, स्टेट सेक्रेटरी, वैसरॉय, गव्हर्नर, कलेक्टर, या साऱ्या परंपरेची जेव्हां मनांतल्या मनांत वाट लावून उत्कृष्ट राज्यपद्धतीचा नकाशा अगोदर ततोतंत जुळवून ठेवावा, तेव्हां तोंड उघडावें, दरम्यान चालला आहे तसा बुक्क्यांचा मार निमूटपणें सोसला पाहिजे, हें म्हणणें रास्त होईल काय ? वरच्यासारखें तर्कशास्त्र लढूं लागलें

तर मोठा जुलूम होणार आहे! ' अरे, ही भिंत येथें वांकडी आली ना!' असें यजमानानें विचारल्याबरोबर गवंड्यानें हातची करणी खालीं ठेवून द्यावी आणि ' कशी घालायाची ती अगोदर दाखवा आणि मग बोला ' असें खाडदिशीं उत्तर द्यावें, असा न्याय झाला! तसेच स्वतः सूपशास्त्रांत अगोदर निपुण व्हावें, आणि मग हें आंबट, तें तिखट, ही चवढव करायला लागावें; दरम्यान किती आंबट लागलें तरी तोंड वेडेंवांकडें करण्याचा कोणाला अधिकार नाहीं; किंवा तिखटाची आग कानशिलाला जरी जाऊन झोंबली तरी खबरदार कोणी हूं कां चूं केलें तर!!—तेव्हां एकंदरींत हाही कोटिक्रम अगदीं शुष्क आहे. अमुक अमुक गोष्ट गैर आहे असें सांगण्याचा सर्वांस अधिकार आहे व ती सुधारण्याचा उपाय सांगण्याची जबाबदारी वरील दूषकांवर नियमानें येतेच असें कांहीं नाहीं. दूषकानें दोषाचें आविष्करण करतांना त्याच्या प्रतिक्रियेचाही उपाय सांगितल्यास चांगलेंच. तसें केलें असतां त्यास तें विशेष श्रेयस्कर होणार आहे हें उघडच आहे. पण या वरच्या पायरीपर्यंत जरी त्याची मजल न पोंचली, तरी लोकांचा भ्रम दवडून त्यांस सावध केल्याचें तरी श्रेय त्याजकडे येणार आहे हें उघड आहे. रोगांपासून मुक्त करण्याचें सामर्थ्य थोड्यांसच असतें, म्हणून आपल्या दृष्टीस जी विकृतीची भावना येईल ती कोणाच्या किंवा त्याच्या स्नेह्यांच्या लक्षांत आणून दिल्यानें दौर्जन्य प्रगट होतें असें नाहीं. वरील भावना लक्षांत येणें हेंच पुढील चिकित्सेचें पहिलें अंग होय!

तर याप्रमाणें वरील दोन आक्षेपांचें निरसन झालें. आतां सदरील विषयावर आम्हीं आपले अभिप्राय यापूर्वी प्रगट कां केले नाहींत हा विचार जर कोणाचे मनांत येईल, तर असें करण्याचें कारण उघडच आहे. तें हें कीं, प्रस्तुत विषय हा मोठा खोल आहे. ज्यानें उठावें त्यानें त्यावर वाक्पांडित्य चालवावें किंवा लेखणीची फर्डेशाई उडवावी अशांतला तो नव्हे. त्यास पुष्कळ वाचन, पुष्कळ विचार, पुष्कळ अनुभव, व मोठी पोक्त बुद्धि, हीं पाहिजेत. केवळ चार दिवस येथें बडेजावी भोगून गेलेल्या पाश्चात्य ग्रंथकारांनीं, किंवा चवाट्यावर शेणमार खाल्लेल्या ख्रिस्तपुत्रांनीं, आपलें अगाध ज्ञान मिरविण्याच्या उद्देशानें केलेल्या एकदेशीय वर्णनांवरून येवढ्या

प्रचंड व प्राचीन राष्ट्राची खरी अंतर्गत स्थिति समजणें हें केवळ अशक्य होय. कोणत्याही राष्ट्राच्या स्थितीचें वास्तविक स्वरूप ज्यास माहीत करून घेणें असेल त्यास तें परवांच्या युवराजाप्रमाणें दीपोत्साहांत हिंडून बड्या दरबारांतील गुळचेट नाटकी बोलण्यावरून समजत असतें असें नाहीं; किंवा साहेबी बंगल्यांतून दुर्बिणी रोखल्यानेंही वरील उद्देश सफळ होत नाहीं. वरील ज्ञानाची ज्यास खरोखरच अपेक्षा असेल त्यानें अंग मोडून जातीनें मेहेनत केल्याखेरीज तें कधीं प्राप्त होणारें नाहीं. आपली बडे-जावी एकीकडे गुंडाळून ठेवून जो लहानथोरांत सामील होईल, राजा-पासून रंकापर्यंत परिचय ठेवील, देशभाषांतील ग्रंथांचें सामग्र्यानें अव-लोकन करील, चोहोंकडे पर्यटन करून सान्या प्रकारची माहिती मिळवील, त्यासच वरील हेतु साध्य होणार आहे. तेव्हां हें सर्व लक्षांत आणलें असतां, आजपर्यंत सदरील विषयावर आम्हीं आपली लेखणी कां चालवली नाहीं, व सध्यांही चालवण्याची आम्हांस धास्तीच वाटते, या दोन्ही गोष्टींची उपपत्ति कोणासही करतां येणार आहे.

येवढी प्रस्तावना करून आतां आम्ही पुढें सरसावतों. वर नुकतेंच सांगण्यांत आलें आहे कीं, प्रस्तुत विषय हा मोठा गहन आहे व यांचें यथार्थ विवेचन करावयाचें म्हणजे पुष्कळ साधनें अनुकूल पाहिजेत हीं आमच्यापाशीं हल्लींच्या स्थितींत जशीं असावींत तशीं जरी नाहींत तरी एकून महत्त्वाच्या विषयावर दिग्दर्शनमात्रेंकरून तरी निरूपण करूं अशी आम्हांस उमेद आहे

असो; आतां या अवाढव्य विषयांचें निरूपण आम्ही कोणत्या पद्धतीनें करणार तें सांगून नंतर विषयास लागूं. आमच्या देशाच्या स्थितीविषयीं जो विवेचन करील त्यानें पुढील तीन विभागांवर आपलीं मतें प्रदर्शित केलीं असतां बस होईल असें वाटतें. हे तीन विभाग येणें-प्रमाणें:—( १ ) आमच्या राज्यकर्त्यांची स्थिति, ( २ ) एतद्देशीय राजेरजवाड्यांची स्थिति, ( ३ ) सामान्य लोकांची स्थिति. तर आतां पहिला विभाग उचलून त्याच्या संबंधानें आमचे आजमितीला काय काय अभिप्राय झाले आहेत ते निवेदन करतों.

वरील तीन भागापैकीं या प्रथम विभागावर आपले काय विचार असतील ते बेधडक कागदावर नमूद करणें हें हल्लींच्या बादशाही कारकीर्दींत मोठें कठीण काम झालें आहे हें सर्वांस महशूर आहेच यांतून दिल्लीपदावर आरूढ झाल्यानंतर लवकरच आमच्या राज्यकर्त्यांनीं छापखान्यांवर केवढी कदर चालू केली, व त्यांची मुसकटें कशीं आवळून टाकलीं, हेंही सर्वप्रसिद्धच आहे. आतां विलायतेंत त्यावर जी झटापट झाली, व बीकन्सफील्ड महाराजांच्या जागीं ग्लाडस्टन साहेबांचें प्रभुत्व स्थापित झालें, त्याच्या योगानें वरील खग्रास बराच सुटला आहे हें खरें; तरी पूर्ण मोक्ष होऊन कैलासवासी लॉर्ड साहेबांच्या नांवें बुचकळी मारण्याची मोकळीक सर्वांस होईपर्यंत चकोरमंडळीस स्वच्छंदेंकरून भराऱ्या मारण्याचें अवसान येणार नाहीं हें उघड आहे. यास्तव इंग्रेजी पेन हातीं धरलें असतां प्रस्तुत विषयांचें विवेचन जसें आम्ही करूं, किंवा एकादा फ्रेंच, रशियन, अगर अमेरिकन ग्रंथकार जसें त्यावर निष्प्रतिबंध लिहील, तसें प्रस्तुत प्रसंगीं आमच्या हातून होणार नाहीं हें खरें; तथापि पुढें ज्या गोष्टी आम्ही दाखल करणार त्या सर्व इतिहासप्रसिद्ध व लोकप्रसिद्ध असल्यामुळें त्याच्या संबंधानें यथास्थितपणें विवेचन करण्यास आम्हांस कोणतीही हरकत नाहीं.

आतां आमचे धर्मनिष्ठ बंधु 'ज्ञानोदय' व राजनिष्ठ बंधु 'एलिफास्' अशा मंडळीस आमचें पुढील विवेचन कोणत्या तऱ्हेनें भासेल, व त्यांतील कोटिक्रम त्यांच्या पवित्र व ज्ञानमय चित्तावर कोणत्या प्रकारें आरूढ होईल हें आम्ही पुरतेपणीं जाणून आहों; पण आमच्या हल्लींच्या स्थितींत त्यांच्या अभिप्रायांची आम्हांस मोठीशी फिकीर करायला पाहिजे असें नाहीं. शिवाय त्यांची वादपद्धति किती मुद्देशीरपणाची असते हें यापूर्वी अनेक प्रसंगीं आमच्या वाचकांच्या लक्षांत आलें असेलच, यास्तव पुढील विवेचनाच्या संबंधानें निघणारे जे त्यांचे नेहमींचे आक्षेप, कीं आपल्या राज्यकर्त्यांस अप्रिय होईल असा मजकूर लिहिणें हें मोठें अनुचित कर्म होय, व ज्यांनीं आपणांस ज्ञान दिलें त्यांचे दोष काढूं पाहणें हा मोठा अधमपणा आहे इ० इ०, या सर्वांकडे आम्ही कानाडोळा करून आपल्या मार्गास लागतों.

३. 'आमच्या राज्यकर्त्यांची स्थिति' या प्रकरणांत आम्ही पुढील गोष्टींविषयीं निरूपण करणार. प्रथमतः आमचा व आमच्या राज्यकर्त्यांचा संबंध कसा जडला, आमची पूर्वीची स्थिति कशी होती, हल्लीं कशी आहे, सरकारचें आमच्याशीं कोणत्या तऱ्हेचें वर्तन आहे, तें असायाला कसें पाहिजे, इत्यादि.

इसवी सनाचें सोळावें शतक संपेतोंपर्यंत आम्ही इंग्रेजांचे कोणी नव्हत व इंग्रेज आमचे कोणी नव्हत ही स्थिति होती हें सर्वांस माहीत आहेच. शत्रु, मित्र व उदासीन या संबंधत्रयापैकीं आमचा व आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांचा त्या वेळेस शेवटला कायतो संबंध होता. पुढें या देशाची कीर्ति ऐकून पोर्च्युगीज, डच, फ्रेंच, डेन्स वगैरे लोकांप्रमाणें इंग्रेज हेही आमच्या देशांत येऊन येथें वखार घाल, तेथें थोडीशी जमीन खरेदी कर, याप्रमाणें त्यांनीं क्रम आरंभला. सारांश पारशी लोक जसे स्वदेशास पारखे होऊन गुजराथच्या राजाला शरण येऊन त्याच्या मुलखांत वणिग्वृत्तीनें राहिले, * किंवा मारवाडी जसे लोटा व रस्सी येवढें

* पार्शी लोकांचा मूळदेश हल्लीं ज्यास इराण म्हणतात तो होय. त्यावर मुसलमानांनीं स्वारी करून तो इ० स० ६५० या वर्षी काबीज केला. तेव्हां कांहीं लोक आपला फार दिवसांचा अग्नि व धर्मपुस्तकें हीं जवळ करून गलबतांत बसून निघाले, ते गुजराथेच्या किनाऱ्यावर येऊन दाखल झाले. तेव्हां त्या देशच्या राजानें त्यांजपासून कांहीं आणभाक करून घेऊन त्यांस आपल्या मुलखांत राहण्याची परवानगी दिली. पारशांची अग्यारी, बाहात्तर पदरी लोकरीचें जानवें, विटाळशीचा विटाळ, गोमांसवर्जन, वगैरे गोष्टी प्रसिद्धच आहेत. पुढें मुसलमानी अंमल झाल्यावर वरील लोकांस डुकराचें मांसही सोडून द्यावें लागलें. या लोकांनीं आपली वाणिज्यवृत्ति अद्याप कायम ठेवली असून ते आजपर्यंत कोणत्याही उलाढालींत पडले नाहींत. व आपल्या आश्रयदात्यांशीं त्यांनीं निमकहरामीपणा केला नाहीं, ही गोष्ट त्यांस भूषणास्पद समजली पाहिजे! नाहीं म्हणायला आमच्या पुण्याचे मोदीसाहेब मात्र शेवटल्या राजश्रींच्या कारभारांत थोडेसे पडले होते. पण त्यांस लवकरच हिरकणीचें प्रायश्चित्त घेणें भाग पडलें ! !

भांडवल घेऊन प्रथमतः येतात व ' कांच बांगडी फुटाणे ' करून वाणिज्यवृत्तीस आरंभ करतात, त्याप्रमाणें आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांची मूळपीठिका आहे. * पुढें एका इंग्रेजी डॉक्टरानें दिल्लीच्या बादशहास बरा केला, नानासाहेब पेशव्यानें इंग्रेजांची मदत घेऊन आंग्र्याचा मोड केला, आरकाटच्या नबाबास त्यांनीं साह्य केलें, अशा लहानमोठ्या कामगिऱ्यांवर या लोकांनीं एतद्देशीय राजापासून जकातीची

---

* प्रसिद्ध अमेरिकन कवि मॉंटगामेरी [ मेकालेच्या तावडींत सांपडलेले रेवरेंड बोवा नव्हेत ! ] यानें एका काव्यांत पुढील विलक्षण उल्लेख केला आहे:—

" Either India next is seen,
with the Ganges stretched between,
Ah ! What horrors here have been !
" War disguised as commerce came,
Britain, carrying sword and flame,
Won an empire, lost her name ! "

Voyage round the world.

वरील उल्लेखाचा एक भाग या अमेरिकन कवीनें बहुधा द्वेषबुद्धीनें लिहिला असावा. त्याजबद्दल त्याच्यापाशीं काय पुरावा असेल न कळे ! पण दुसरा भाग मात्र सर्वथा यथार्थ होय. त्याबद्दल खुद्द राज्यस्थापकाच्या हातचेंच सार्टिफिकेट घ्याः—

" Alas ! " says Clive, " how low is the English name sunk ! I could not avoid paying the tribute of a few tears to the departed and lost fame of England and the British nation–recoverably so, I fear. However I do declare, by that great Being who is the searcher of all hearts, and to whom we must be accountable if there be a hereafter, that I am come out with a mind superior to all corruption, and that I am determined to destroy these great and growing evils, or perish in the attempt. "

Essay on Lord Clive.

माफी घेतली, * गांव इनाम घेतलें, अशा प्रकार चालू झाला. पुढें हे जरासें जोरावर आल्यावर यांच्या व फ्रेंच लोकांच्या लढाया सुरू झाल्या. त्यांत सुदैवेंकरून आमच्या भावी राज्यकर्त्यांसच जय येत गेला. फ्रेंच लोकांनीं शेवटपर्यंत इंग्रेजांचा पाडाव करण्याचा प्रयत्न चालवला होता, § व एके प्रसंगीं डच् लोकांनींही आपलें बोट शिरकविण्याचा लाग केला होता; ¶ पण इंग्रेजांची सद्दी जबर ! त्यांच्या आणीबाणीच्या प्रसंगीं क्लैव,

---

* ह्या मिल्टन नांवाच्या एका इंग्रेजी वैद्यानें फिरुक्शीर बादशहास रोगमुक्त केलें; ह्याबद्दल बादशहाकडून इंग्लिशांस मद्रासेजवळ तीन गांवें मिळालीं, व कलकत्त्याजवळ सदतीस गांवें खरेदी करण्याची परवानगी मिळाली, खेरीज वर सांगितलेली जकातीची माफी ! या एका गोष्टीवरून आम्हांत व इंग्रजांत काय फरक आहे तो तेव्हांच लक्षांत येण्यासारखा आहे. ह्या मिल्टन्च्या जागीं आमच्या इकडचा कोणी मनुष्य असता, म्हणजे तो आपल्यापुरता विचार करून आपणांस एकादी जहागीर वंशपरंपरा करून घेता; आणि आमचे धुलीपसिंग महाराज जसे खुशाल विलायतेस रमून राहिले आहेत त्याप्रमाणेंच तो इकडे दिल्लीपतीच्या चरणारविंदीं निरंतर पडून राहता !

§ वरील प्रयत्नांपैकीं साऱ्यांत जबरा प्रयत्न म्हटला म्हणजे नेपोलियनचा. त्यानें ईजिप्ट् ( मिसर ) देशांतून टिप्पु सुलतानाशीं संधान चालविलें होतें. सन १७९९ च्या जानेवारी महिन्यांत त्यानें टिप्पूस असें पत्र लिहिलें होतें कीं, " इंग्लिश लोकांच्या त्रासांतून आपणास सोडवण्यास मी आपली अजिंक्य फौज घेऊन निघालों आहे ! " पण ही फौज पुढें जों येणार तों अगोदरच इंग्लिश लोकांनीं श्रीरंगपट्टणावर गर्दी करून सुलतान साहेबांस अक्षय्यपदीं आरूढ केलें ! वरील राजश्रीनें शेवटीं फ्रेंच प्रजासत्ताक राज्याची ही दीक्षा धारण करून ' सिटिजन् टिप्पू ' ही किताबत् सुरू केली होती ! !

¶ हा प्रसंग मीर जाफर यानें त्यांच्याशीं गुप्तपणें संधान बांधून इंग्रेजांस घालवून देण्याची जी मसलत योजिली होती तो होय. यांस कितपत यश आलें हें सांगायला नकोच. हल्लीं सुरत मुक्कामीं एक शेत काय तें डच् लोकांकडे राहिलेलें आहे !

२८.९.५
११
वा/वा
१९४
३९१३

कूट, वेलेस्ली, हावलॉक यांच्यासारखे जाडे सरदार सेनानायक होऊन त्यांचा मागें पाय म्हणून फार करून कोठें आलाच नाहीं ! आतां हें खरें, कीं त्यांनीं माधवराव, महादजी, रणजितसिंग अशा प्रबळ पुरुषांशीं स्नेहभावच राखून त्यांच्या मरणानंतर त्यांच्या कारभारांत ढवळाढवळ केली, व दोन्ही पक्षांकडील सेनानायक एका तोडीचे आहेत असा फार करून योग आलाच नाहीं; तरी एकंदरींत पाहतां या पाश्चात्य लोकांची सद्दी, त्यांचें कारस्थान, व कवायत हीं विशेष खरीं. त्यांच्या योगानें हिंदुस्थानासारखें अफाट राज्य त्यांच्या अचानक पदरीं पडलें, एरवीं मुळारंभीं पाहतां एक लहानशी व्यापाऱ्यांची मंडळी ती काय निघाली, हिनें दीडशें वर्षेपर्यंत या देशांत नुसती वाणिज्यवृत्ति ती काय केली, पुढें एकाएकीं तराजूची दांडी टाकून देऊन ते वैश्याचे क्षत्रिय काय बनले, व हळूं हळूं पाय सरकवतां सरकवतां साऱ्या राजेरजवाड्यांस वेतावितानें गुंडाळून टाकून सेव्यसेवकभावाचा विपर्यय करून सार्वभौमपदावर आरूढ ते काय झाले ! एकंदरींत साराच गौडबंगाली खेळ ! तेव्हां इंग्रेज ग्रंथकारांच्या व विशेषतः मिशनरींच्या तोंडून जो कधीं कधीं धन्यवाद निघतो, कीं हें भरतखंड आकाशांतील बापानें आमच्याकडे मेहेरबानीनें सोंपून दिलें आहे त्याची यथार्थता कोणास भासणार नाहीं ?

तर याप्रमाणें कोणीकडे इंग्लंड व कोणीकडे हिंदुस्थान, पण प्रभूच्या अचिंत्य करणीनें या दोहों देशांची आज कितीक वर्षांपासून सांगड जुळून गेली आहे ! आतां ही जी इंग्रेज लोकांची या अफाट देशावर सत्ता चालू झाली आहे ती कोणत्याही तऱ्हेनें मिळविलेली असो, तिजविषयीं तूर्त आम्हांस विचार कर्तव्य नाहीं. आम्ही असेंच घेऊन चालतों, कीं प्लासीच्या लढाईपासून तों राणीसाहेबांच्या जाहीरनाम्यापर्यंत जो जो आमच्या सरकारनें येथें कारभार केला तो सर्व अगदीं न्यायाचा होता. कंपनी सरकारचे पहिले गव्हर्नर जनरल वॉरन् हेस्टिंगस् यांच्यापासून तों शेवटले लॉर्ड डलहौसी यांच्यापावेतों सर्वांनीं जो जो व्यवहार केला तो तो रास्त, जीं जीं युद्धें केलीं तीं तीं धर्मयुद्धें, हें सर्व आम्हांस कबूल आहे. आतां हें सर्व गृहीत धरून सध्यां आमची स्थिति कशी आहे व आमचे राज्यकर्ते आम्हांस कोणत्या तऱ्हेनें वागवीत आहेत तें पाहूं.

४. राजा व प्रजा या दोघांचा परस्पर संबंध कोणत्या तऱ्हेचा असायला पाहिजे हें बहुधा कोणालाही सांगायाला नकोच. ' प्रजा ' शब्दाचा मूळ अर्थ ' संतति ' असा आहे; तेव्हां या अर्थाप्रमाणें पाहतां बापाचा व मुलांचा संबंध तोच वस्तुतः पाहतां राज्यकर्त्यांचा आणि राष्ट्राचा असायास पाहिजे म्हणजे बाप जसा मुलांचें लालनपालन करतो, त्यांस सन्मार्गास लावून सुशिक्षा देतो, व त्यांचें जें हित व जो थोरपणा तेंच त्यांचें हित व त्याचाही थोरपणा अशी त्याची समजूत असते, तशीच समजूत राजानें आपल्या प्रजेविषयीं बाळगिली पाहिजे. आजपर्यंत जे महाविख्यात राजे होऊन गेले त्या सर्वांच्या कारकीर्दींत हाच प्रकार नजरेस येतो. आमच्याच देशाविषयीं विचार केला तर राम, युधिष्ठिर, वगैरे पौराणिक काळांतले राजे जरी सोडून दिले तरी थोरले माधवराव, अहल्याबाई, अकबर, वगैरेंची राज्यरीति सर्व प्रकारें वरील नमुन्याचीच दिसून येते. आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांविषयीं जरी पाहिलें तरी त्यांचा पाहिल्यापासून हाच घाट आहे. हिंदुस्थानांतले लोक अर्धवट रानटी आहेत त्यांस सुधारायाचें, ते अज्ञान आहेत त्यांस सज्ञान करायाचें, त्यांचा धर्म वाईट आहे तर त्यांस चांगल्या धर्मांत आणून सोडावयाचें, त्यांच्या देशांत चोहोंकडे झोटिंगपाच्छाई होती ती मोडून टाकून त्यांस यथान्याय राज्य करण्याची पद्धति लावून द्यावयाची,—हा एकंदर प्रकार ! राणीच्या जाहिरनाम्यांत, पार्लमेंटांतील भाषणांत, गवर्नरप्रभृति येथील अधिकाऱ्यांच्या बोलण्यांत एकंदर मतितार्थ म्हटला म्हणजे हा, कीं या देशावर आधिपत्य करण्याचा आमच्या पाश्चात्य बंधूंचा मतलब म्हटला म्हणजे या देशाचें हित हाच केवळ होय. बाकी आमच्या धर्मप्रभूंस येवढ्या अफाट देशाचें राज्य चालवण्यापासून स्वतःला म्हणजे कांहीं फायदा आहे असें नाहीं. कित्येक पंडित तर 'केसरि हिंद ' शाही हा आतबट्ट्याचा व्यापार आहे असेंही म्हणायला चुकत नाहींत ! असो; धन्य त्यांची; आमचें सर्वस्व जाऊनही जेव्हां आमच्याच पायीं विलायतेस बूड, तेव्हां लांडग्यानें कोकरावर जो चार्ज ठेवला, कीं तूं माझें पाणी गढूळ करतोस, तो बरोबर म्हटला पाहिजे; व आमच्या भाषेंत जी म्हण आहे, कीं ' मेंढी जाते जिवानिशीं आणि खाणारा म्हणतो वातड ' तीही प्रस्तुत प्रसंगाला लावली पाहिजे !

असो; वरील मतांच्या यथार्थत्वाविषयीं किंवा अयथार्थत्वाविषयीं आम्हांस विचार कर्तव्य नाहीं. त्यावरून इतकेंच तात्पर्य घ्यावयाचें, कीं आमचें प्रस्तुतचे राज्यकर्ते या देशाच्या संबंधानें कोणत्या बुद्धि मनांत बाळगतात, किंवा निदान बोलण्यांत तरी दाखवतात. आतां आज सरासरीं शतकभर जो पाश्चात्यांचा आमच्यावर अंमल चालला त्यापासून आमचें हिताहित काय झालें याविषयीं निःपक्षपात बुद्धीनें विचार करूं.

५. सुमारें वीस पंचवीस वर्षांपूर्वीं वर्तमानपत्रांतून व ग्रंथांतून इंग्रेज लोकांचा केवळ स्तुतिपाठच चालत असे ही गोष्ट सर्वांस माहीत आहेच. ' आमचें शहाणें व दयाळू सरकार, इंग्रेजी राज्य झाल्यापासून या देशास अनेक फायदे झाले ' इत्यादि प्रकारांनीं फार करून ग्रंथांचे प्रस्ताव होत असत. आलीकडे पाहावें तों वरील मन्वंतर अगदींच फिरल्यासारखें दिसत आहे. मागें जी आमच्या राज्यकर्त्यांविषयीं लोकांची पूज्यबुद्धि होती व त्यांचे ठायीं जें प्रेम होतें तें हल्लीं पुष्कळच कमी झालें आहे. आम्हांस वरील दोन्हीही गोष्टी कबूल नाहींत. मागलें अज्ञानदर्शेतलें प्रेमही आम्हांस पसंत नाहीं, व आलीकडचें दुराग्रहजन्य अप्रेमही आम्हांस मान्य नाहीं. केवळ तिऱ्हाईतपणानें आम्हांस जी गोष्ट खरी वाटते ती आम्ही येथें नमूद करणार. तर आतां इंग्रेजी राज्यापासून आम्हांस फायदे कोणते झाले किंवा होण्यासारखे आहेत याविषयीं प्रथमतः विचार करूं.

६. युरोपांतील लोकांचें आलीकडे विद्येंत पाऊल पुष्कळ पुढें सरकलें असल्यामुळें त्यांची कल्पना अशी झाली आहे कीं, सुधारणा काय ती आमच्या खंडांत; एशियांतले सारे लोक गैरसुधारलेले ! हीच कल्पना इंग्रेज लोकांची एतद्देशीयांविषयीं आहे हें सर्वप्रसिद्धच आहे. आतां हींत वस्तुतः पाहतां जरी थोडाच अर्थ आहे तरी हल्लींच्या स्थितींत आम्हांस युरोपस्थांकडून पुष्कळच नवीन माहिती करून घेण्यासारखी आहे हें उघड आहे. वास्तव आपणांहून विद्वान् असणाऱ्या मनुष्याशीं समागम घडला असतां जसा आपणांस नेहेमीं फायदा असतो; त्याप्रमाणेंच सध्यां इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांचा जो निकट संबंध जडला आहे त्यापासून विशेषतः हिंदुस्थानास बहुत लाभ होण्यासारखे आहेत हें कोणासही कबूल करणें भाग आहे. एकाद्या शाहण्या मनुष्याच्या बरेंचसें भांडवल हवालीं केलें असतां

तो जसा लवकरच दामदुप्पट करून दाखवतो, व उत्तरोत्तर बहुगुणित अर्थ-संचय त्यापासून निष्पन्न करतो, त्याप्रमाणेंच प्राचीन ग्रीक, रोमन, हिंदु, आरब वगैरे लोकांपासून पाश्चात्यांनीं जें ज्ञान संपादन केलें तें त्यांनीं आपल्या उद्योगानें आलीकडे पुष्कळच वाढवलें आहे यांत संशय नाहीं. पूर्वीं जीं अनेक शास्त्रें होतीं तीं त्यांनीं नवीन शोध सामील करून पुष्कळच वाढविलीं आहेत, व दुसरीं तर पूर्वीं अज्ञात असलेलीं नवीं काढून त्यांचा बहुत विस्तार केला आहे. तेव्हां हल्लीं हें अपरंपार भांडवल आयतेंच आमच्या स्वाधीन होणारें आहे; मग हा काय लहानसहान लाभ म्हणावा! त्यांतून कोणत्याही उद्देशानें म्हणा, हें सर्व अपूर्व भांडार आमच्या राज्य-कर्त्यांनीं बळेंबळें आमच्या गळ्यांत बांधण्याचा हा आज वीस पंचवीस वर्षें अव्याहत उद्योग चालला आहे, व त्यास यशही पुष्कळ आलें आहे. तेव्हां आमचा व इंग्रेजांचा समागम झाल्यापासून हें एक मोठें फल आम्हांस प्राप्त झालें आहे.

दुसरी गोष्ट व्यावहारिक-कलांचें ज्ञान. या कला आलीकडे साऱ्या युरोपांत व अमेरिकेंत किती वाढल्या आहेत, व त्यांच्यापासून मानवजातीचें किती कल्याण झालें आहे व होण्यासारखें आहे हें आजच्या मित्तीला कोणालाही सांगण्याची जरूर उरली आहे असें नाहीं. छापखाना, आगगाडी, आगबोट, तारायंत्र, प्रकाशालेख्य, गिरणी, वगैरे गोष्टींकडे जो क्षणभर लक्ष पुरवील त्यास सहाव्या पुस्तकांतील 'तीन राक्षसां' च्या धड्याची आठवण झाल्याशिवाय खास राहणार नाहीं. केवढ्या अद्भुत या शक्ति! 'महाभारतांत—' वेषधारी नलराजाच्या सारथ्यकर्माचें वर्णन केलेलें आहे कीं, ऋतुपर्ण राजाचा शेला रथवेगाच्या सपाट्यांत उडून खालीं पडला, तेव्हां बाहुकानें त्यास सांगितलें कीं, "तो राहूं द्या आतां, एक योजनभर तो मागें राहिला आहे!' * वरील इतिहासांतच अर्जु-

* "त्या नृपवार्ष्णेयांचे दाटति पाहोनिया जवास गळे।
तों स्यंदनावरुनि भूपृष्ठीं साकेत—राज—वास गळे॥
"भूप म्हणे पडला गा भूपृष्ठीं उत्तरीय—पट थांब।
बाहुक म्हणे पडों द्या तो योजन एक राहिला लांब॥
'वनपर्व'—२०

नाच्या हस्तलाघवाचें वर्णन केलें आहे कीं, त्यानें एका बाणाच्या टोकाला पत्र लावून तें आपल्या बापाच्या कचेरींत धाडून दिलें. त्याप्रमाणेंच कर्णानें पृथ्वी उचलिली, मारुतीनें सूर्यबिंबाच्या ग्रासार्थ उड्डाण केलें, दुर्वासऋषीनें एकदम ऐंठ्यांयशीं सहस्र ऋषींचा तांडा आणून पांडवांच्या आश्रमाशीं 'अलक' म्हणून गर्जना केली, व येवढा जबरदस्त भोजनसमारंभ काम्यकवनांत घडाविला ! वरील सर्व आचाट गोष्टी आज एकोणिसाव्या शतकांत प्रत्यक्ष घडूं लागल्या आहेत ही केवढी अजब बात आहे ! आमच्या गुर्जर देशाधिपतींस जेव्हां परवां अग्निरथांत घालून चाळीस तासांत पूर्वसमुद्रतीरचें मद्रपूर दाखविलें, तेव्हां त्यास ऋतुपर्णाचा हेवा करण्यास थोडेंच कारण राहिलें असेल ! मोठमोठ्या राजेरजवाड्यांच्या डोक्यांवरून सफाई हात फिरवून लॉर्ड डालहौसी साहेब जेव्हां थकले भागले होत्साते हरि हरि म्हणायला परत निजधामास गेले, व लंडनांतल्या तारागृहांतून त्यांनीं हिंदुस्थानची आलबेली विचारली, * तेव्हां अर्जुनाच्याच कृतीचा नमुना उतरला नाहीं काय ? वरील भारती वीराच्या प्रतिपक्ष्यानें 'सप्तद्वीपा पृथ्वी' मोठ्या प्रयासानें सारीं चार अंगुळें उचलिली; आज एकोणिसाव्या शतकांत तर तिला तागडींत घालून तिचें वजनही काढून मंडळी मोकळी झाली आहे ! अंतरालांत लाखों कोस उड्डाण एका क्षणांत करण्याचें अद्भुत साधन आज मानवजातीस उपलब्ध झालें आहे हें कोणास माहीत

---

* वरील लाटसाहेबांनीं आपली कारकीर्द आगगाडी, तारायंत्र, टपाल, विद्याखातें वगैरे अनेक गोष्टी मोठ्या झपाट्यानें अमलांत आणून चोहोंकडे गाजवून दिली हें इतिहासज्ञांस सांगावयास नकोच ! त्यांनीं अयोध्येचा शेवटचा गोड घांस माजी कुंपिणीबाईस चारून स्वदेशवास जेव्हां केला, तेव्हां नूतनस्थापित विद्युद्यंत्राच्या द्वारें त्यांनीं तेथून इकडचें क्षेमकुशल पुसलें, कीं अयोध्या प्रांतांत सर्व सामसूम आहेना ? इकडूनही उत्तर गेलें,—ऑल् वेल् ( आलबेल ) ! वरील आलबेलीच्या पाठोपाठ केवढी गलबल झाली, व कुंपिणीबाईस लाटसाहेबांनीं जें बळकट अजीर्ण करविलें त्याच्या योगानें तिचीं बिचारीचीं पुरीं शंभर वर्षें भरून तिचा अपूर्व अवतार कसा आटपला हें आबालवृद्धांस श्रुत आहेच ! अयोध्येंत पाऊल पडल्यावर राम म्हणण्याचा योग येणें हेंही साहजिकच आहे !!

नाहीं ? त्याप्रमाणेंच वरच्यासारखा दाढीवाल्यांचा कंपू जर एकदम येऊन उतरला, तर तिनक्यांची अन्नसामग्री एका सपाट्यास तयार करण्याची तजवीज या अद्भुत शतकांतल्या एखाद्या सार्वजनिक महानसांत सहज होण्यासारखी आहे. बोळवणी करतांना प्रत्येक ऋषिजनास वस्त्रदान करायाचें मनांत आणल्यास तेंही तसेंच सुकर आहे ! सारांश रावणानें जसे सर्व देव काबीज करून कोणाची पाककर्मावर, कोणाची सम्मार्जनावर, वगैरे नेमणूक करून सर्व्यांस सारखें राबविलें होतें, त्याप्रमाणेंच आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांनीं सर्व महाभूतें वठणीस आणून त्यांजपासून ते चोपून कामें घेत आहेत ! ! ऽ

मग अशा अद्भुत प्रभावाच्या राष्ट्राशीं जर आपला आयताच योग जमून आला आहे तर ही केवढी सुदैवाची गोष्ट समजली पाहिजे ! रशियाचा पहिला बादशहा पीटर दि ग्रेट् यास आपला देश सुधारावयाचा होता तर हातचें राजवेत्र टाकून व बादशाही पोषाक फेकून देऊन मजुराचा धडधाकट डगला व हत्यारांची पेटीही त्यास पत्करावी लागली. मग पाश्चात्यांची अपूर्व विद्या जर आपल्या पायांनीं आमच्या देशास चालून आली आहे तर ही केवढी मोठी सोय आम्हांस झाली आहे बरें !

तिसरा लाभ मानसिक उन्नति. मानसिक उन्नति म्हणजे देशाभिमान, जात्यभिमान, स्वाभिमान, अनुचित कर्मापासून निवृत्ति, स्वातंत्र्याभिलाष, दैन्यवर्जन, इत्यादिकांविषयीं ज्या मानसिक स्थितीपासून स्फूर्ति होते ती. ही स्थिति असणें हेंच देशोन्नतीचें प्रधान साधन होय, व तिचा अत्यंताभाव म्हणजे देशाच्या अपकर्षाची परमावधि होय ! आतां हा लाभ इंग्रेजी राज्यापासून होईल हें म्हणणें पुष्कळांस सकृद्दर्शनीं विरुद्धोक्तीसारखें भासेल;

ऽ हल्लीं आमच्या प्रभूंनीं पंचमहाभूतें आकळून त्यांजवर जें स्वामित्व चालविलें आहे त्यावर मागील पौराणिक वर्णनास अनुसरून किती विचित्र कवित्व करतां येणार आहे ! 'रामायणा'त व 'कुमारसंभवा'त त्यांतील प्रतिनायकांच्या वैभवाचें वर्णन आमच्या प्राचीन कविवरांनीं केलेलें आहे. आलीकडील थोडा मासला 'पद्यरत्नावली' तील एका प्रकरणांत सांपडेल.

पण मागील इतिहासावरून जो प्रत्यंतर पाहील त्याच्या ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे, कीं विद्येचा संस्कार हा सामान्यतः वरील उन्नतीस कारणीभूत होतोच आणि त्यांतून ग्रीक, रोमन, इंग्लिश वगैरे विद्यांचा तर वरील प्रभाव स्पष्टच आहे ! युरोपखंड जें गाढ अज्ञाननिद्रेत शतकांचीं शतकें घोरत पडलें होतें त्यांतून त्याची जागृति कशाच्या योगानें झाली बरें ? ग्रीक व रोमन लोकांची प्राचीन विद्या—दुसरें कांहीं नाहीं. या विद्येचें पुनरुज्जीवन, हल्लीं जसें संस्कृताचें कांहीं होत चाललें आहे, त्याप्रमाणें पंधराव्या शतकांत सुरू झालें. या अमृतवल्लीचा थोडाबहुत रस पोंचतांच मृतप्राय जें युरोपखंड त्याच्यांत एकाएकीं चळवळ उत्पन्न होऊन लवकरच तें खडखडीत जागें झालें. मग काय विचारतां ! गलिव्हर जागा होतांच त्यानें छोटेखानी लोकांचे पाश जसे तडातड खाडदिशीं तोडून टाकले, आणि मोकळा झाला; त्याप्रमाणेंच वरील खंडाचीही अवस्था झाली. प्राचीन ग्रीक व रोमन ग्रंथकारांचें अध्ययन करतांच त्या राष्ट्रांची वीरश्री इंग्लिश, फ्रेंच, जर्मन वगैरे लोकांचे ठायीं संचरली, आणि अनेक बंधनांतून ते भराभर मोकळे होत गेले. प्रथमतः रोमनगरीं पोप महाराजांनीं कित्येक शतकें बंड माजवून ठेविलें होतें त्याच्यावर हल्ला पडला. वरील धर्मप्रभूचा अंमल अर्ध्या युरोपानें एकदम झुगारून दिला, व जिकडे तिकडे ज्याला जसा वाटला तसा त्यानें निराळाच पंथ काढला ! याप्रमाणें आपल्या पारलौकिक पारतंत्र्याचा नाश करून युरोपचीं राष्ट्रें आपल्या ऐहिक प्रभूंवर उलटलीं, आणि राजा म्हणजे ईश्वरी अंश होय इत्यादि असमंजस कल्पनांचा त्याग करून त्यांनीं आपापले हक्क शाबीत केले. या कृत्यांत आमचे राज्यकर्ते हे तर सर्वांत प्रमुख झाले. त्यांनीं एका राजाशीं युद्ध करून येथल्या प्राचीन वेनराजाप्रमाणें त्यास मारून टाकलें, व त्याचेच चिरंजीव पुनः तेच तेच चार जेव्हां करूं लागले तेव्हां त्यांसही पदच्युत करून तिसऱ्यालाच राजपदावर प्रतिष्ठापित केलें. फ्रान्स देशांतही हा दंगा तीन वेळां होऊन हल्लीं तेथें प्रजासत्ताक राज्यच चालू आहे. याचप्रमाणें जर्मनी, रशिया वगैरे राष्ट्रांतून हीच चळवळ सुरू आहे. अमेरिकेंतल्या लोकांनीं गेल्या शतकांत काय प्रकार केला तो तर जगजाहीरच आहे. असो; तर एकंदरींत हें सांगावयाचें कीं सज्ञान दशेचें

फळ देशोन्नति हें होय. यास्तव आमच्या देशांत जों जों इंग्रेजी विद्येचा प्रसार होत जाईल तों तों सुधारणा, स्वातंत्र्य, सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार ! एक इंग्रेजी विद्येचें वज्र आमच्या हातांत असलें, म्हणजे मग लिटन्शाही, टेंपल्शाही चाट्फील्ड्शाही, मूरशाही, वगैरे शंभर शाह्यांस सुद्धां आम्ही दाद देणार नाहीं ! !

याखेरीज इतर जे अनेक लाभ प्रस्तुत राज्यापासून या देशास झाले आहेत ते सर्वांस महशूर आहेतच. पूर्वी ज्या प्रकारची स्वस्थता देशास बहुधा कधींही प्राप्त झाली नसेल तशा प्रकारची गेल्या पन्नास साठ वर्षेंभर येथें नांदत आहे. इंग्रजी होण्याच्या पूर्वी प्रत्यहीं घडणाऱ्या ज्या गोष्टी, म्हणजे लढाया, मारामाऱ्या, पेंढारी दंगा वगैरे त्या आतां साऱ्या स्वप्नवत् झाल्या आहेत. पाश्चात्य राज्याच्या विस्तीर्ण छायेखालीं हें अवघें भरतखंड खुशाल झोपेंत घोरत आहे असें म्हटलें तरी चालेल ! आढ्याला पाय लावून बिनधोक निजण्याचा काळ या राष्ट्रास यापूर्वी असा कधींही लागला नाहीं ! काठीला सोनें बांधून काशीपासून रामेश्वरापर्यंत जावें अशी जी सदरील कारकीर्दीची लोक तारीफ करतात ती अगदीं वाजवी आहे. त्याप्रमाणेंच पूर्वी या देशाचा व्यापार जो अगदीं संकुचित होता तो आतां साऱ्या जगभर होण्याच्याही उत्कृष्ट सोई झाल्या आहेत. आगगाड्या, आगबोटी, तारायंत्रें, टपाल या सर्वांपासून व्यापारी लोकांचा किती फायदा होत आहे व होण्यासारखा आहे हें कोणालाही उघड करून सांगावयाला पाहिजे असें नाहीं. त्याप्रमाणेंच एकंदर लोकांचेंही वरील यंत्रविद्येपासून किती हित झालें आहे व होण्यासारखें आहे याविषयींही येथें कांहीं लिहिण्याची जरूर नाहीं. त्याप्रमाणेंच मानसिक स्वातंत्र्य हाही या कालांत सर्वांस झालेला एक मोठाच लाभ आहे. मानसिक स्वातंत्र्य म्हणजे हवा तसा विचार करण्याची व ते विचार वाग्द्वारा किंवा लेखद्वारा प्रसिद्ध करण्याची मोकळीक. हिंदु राज्यांत या प्रकारची मोकळीक जरी बरीच होती, तरी मुसलमानांच्या राज्यांत यासंबंधानें बराच अटकाव होता हें इतिहासप्रसिद्धच आहे. औरंगजेबानें महंमदाची निंदा केल्याबद्दल संभाजीमहाराजांची जीभ कापून टाकली. टिप्पूच्या त्रासानें दोन हजार वैष्णवांनीं एकदम आत्महत्या करून घेतली; इत्यादि प्रकार प्रस्तुत

राज्यांत केवळ अश्रुत आहेत. मिशनरींच्या द्वारें परस्पर काम झाल्यास बरेंच असा जरी इंग्रेज सरकारचा अंतःस्थ हेतु आहे, तरी उघडपणें ख्रिस्ती धर्माच्या प्रीत्यर्थ कोणाही मनुष्यास या राज्यांत बिल्कुल इजा पोंचत नाहीं, व आजपर्यंत पोंचलीही नाहीं. प्रख्यात वक्ता पिट्ट यानें एके ठिकाणीं आपल्या देशाच्या राज्यव्यवस्थेची तारीफ करून एके प्रसंगीं असें म्हटलें आहे कीं, "इंग्लिश मनुष्याचें घर हा त्याचा किल्ला आहे." * हीच गोष्ट बऱ्याच प्रकारें आमच्या देशासही लागू झाली आहे. मागें मोगलाईत किंवा पेशवाईत जसें राजानें हवें त्याला उचलून बंदींत टाकावें किंवा त्याचा प्राणही घ्यावा तसा प्रकार प्रस्तुतचें राज्य परकी लोकांचें असतांही येथें होऊं शकत नाहीं. हें तर काय, पण टेंपलसाहेबांस एकीकडे मानपत्र मिळतें व एकीकडे प्रत्येक सभासदाच्या हातांत टेंपलशाहीचा इंग्रेजी पोवाडा पडतो; मूरसाहेब आज जकातीचे धरे होयवा रावबहादुरांच्या मान डोलवण्यावरून पास करतात, व दुसऱ्या दिवशीं पुणेशाही 'छोकऱ्यां'नीं थोडीशी गडबड केली न केली तों 'बुढ्ढे' मंडळीस सरकारांतून खाशी थप्पड येते, इत्यादि गोष्टींकडे जो कोणी क्षणभर लक्ष पुरवील त्याची अशी खात्री झाल्यावांचून खास राहणार नाहीं, कीं हल्लींच्या राज्यांत आम्हांस जितकें स्वातंत्र्य आहे तितकें

---

* "The proudest Government that exists upon the face of the earth is that of Great Britain. And the great Pitt, her proudest statesman, when he would tell of Britain's crowning glory, did not speak, as he might have done, of her wide-spread dominion upon which the Sun never sets. He did not speak of martial achievements, of glorious battle-fields and of splendid naval conflicts. But he said, with swelling breast and kindling eye that the poorest man of Great Britain in his cottage might bid defiance to all the force of the Crown. It might be frail, its roof might shake, the wind might blow through it, the storm might enter, the rain might enter; but the king of England could not enter it ! In all his forces he dared not cross the threshold of that ruined tenement ! "

यापूर्वी स्वदेशीय राजांच्या उत्कृष्ट कारकीर्दीतही कधीं नव्हतें. त्याप्रमाणेंच आमचे लोकच अत्यंत साहसशून्य व अगदीं पोंचट होऊन गेले आहेत, नाहीं तर या स्थितींतही त्यांचा किती उत्कर्ष होण्यासारखा आहे हेंही बहुधा सर्वांच्या लक्षांत येण्यासारखें आहे !

कारचि बरी निरयगाति परवशता शतगुणें करी जाच ।
' विराटपर्व '

१. मागील अंकांत प्रस्तुतच्या राज्यापासून आमच्या देशास कोणकोणते फायदे झाले आहेत व होण्यासारखे आहेत ते सांगितले. आतां त्यांत वरील राज्यापासून आमचें आजपर्यंत काय काय नुकसान झालें व पुढें कितपत होण्यासारखें आहे याविषयीं विचार करूं.

२. इंग्रजी राज्यापासून आमची पहिली मोठी हानि कोणती झाली म्हणाल तर स्वातंत्र्यनाश. स्वातंत्र्याची स्थिति पारतंत्र्यापेक्षां किती सुखावह असते हें कोणालाही सांगायाला नकोच. यदृच्छेनें अंतरालांत फिरणाऱ्या व वनगहनांत यथेच्छ आहारविहार करणाऱ्या पक्ष्यांत आणि मोठ्या सोन्याच्या किंवा रत्नखचित पिंजऱ्यांत कोंडलेल्या पोपटांत किती अंतर ! ज्याचा ईश्वरदत्त अधिकार हा, कीं त्यानें आपल्या सुंदर पक्षांच्या बळावर हवा तिकडे अनिरुद्ध संसार करावा, नानाविध फळांचा रसास्वाद घ्यावा, स्वजनांत राहून संसारसुख अनुभवावें, त्यानें टीचभर जागेंत राहून सदोदित ' लटपटपंची ' करीत राहावें ही केवढी दैन्यावस्था ! हीच गोष्ट राष्ट्रांसही लागू आहे. वस्तुतः पाहतां ज्या त्या राष्ट्रानें आपापली व्यवस्था ठेवावी व इतरांशीं जो संबंध ठेवायाचा तो फक्त व्यापाराच्या वगैरे संबंधानें ठेवावा, हा सचोटीचा मार्ग. प्रत्येक गृहस्थानें जसें आपलें घरदार, कुटुंब व जिनगी हीं सुरक्षित ठेवून आपल्या शेजाऱ्यास उपद्रव लावूं नये, ही नीति होय; त्याप्रमाणेंच एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं जो व्यवहार ठेवायाचा तोही माणुसकीस अनुसरूनच ठेवणें उचित होय. गोमाजीनें उठून तिमाजीच्या घरावर दरवडा घालावा, त्याची चीजवस्त लुटून त्याचा जीव घ्यावा, बायको

उपटावीं, मुलामाणसांस बंदेगुलाम करून आपल्या घरीं न्यावें, हा प्रकार जितक्या दुष्टपणाचा व पाजीपणाचा आहे, तितकाच दुसऱ्याच्या मुलखावर स्वारी करणें, हजारों माणसांचे लढाईंत प्राण घेणें, सारा देश उध्वस्त करून त्यास कंगाल करून सोडणें, हाही होय. पण असें असतां आजपर्यंत जगाचा क्रम पाहिला तर काय आढळेल बरें? दुसरें काय, लठ्ठालठ्ठी, मारामारी, रक्तपात, लुटालूट, जाळून पोळून फस्त,—हाच काय तो! त्यांतून ज्या वेळेस सद्धर्माचा उदय झाला नव्हता, व खऱ्या देवाची ओळख कोणास नसून खोटे देवच साऱ्या देशांतून माजले होते, शिवाय सुधारणेचा ध्वज आलीकडे जसा चोहोंकडे फडकूं लागला आहे तशीही जेव्हां स्थिति नव्हती, तेव्हां वरील दांडगाईचे व अन्यायाचे प्रकार जिकडे तिकडे दृष्टीस पडत असत यांत कांहीं नवल नाहीं. पण हल्लीं चालू असणारें एकोणिसावें शतक हें तर सुधारणेच्या संबंधानें पहिल्या प्रतीचा बाणा मिरवीत असतां, व या शतकांत सद्धर्माचे पवित्र प्रेषित आकाशांतली दिवटी घेऊन सारें भूमंडळ आक्रमीत असतां व येशूच्या दयामय धर्माचो जिकडे तिकडे गजर करीत असतां, कंठस्नानाचा व झोटिंगपाच्छाईचा प्रचार पहिल्यापेक्षां आतां काडीभरही कमी आहे असें नाहीं. हें शतक सुधारणेंत जसें सर्वांत पुढें आहे त्याप्रमाणेंच रक्तपातांतही त्याची सरशीच आहे. मागें भूमातेला तिचीं पवित्र लेकरें रक्तचंदनाचा नुसता सडा टाकून शोभवीत असत, आतां तर तीं जों जों शहाणीं होत चाललीं तों तों तिला वारंवार रुधिरस्नानाची महापर्वणी लाधते! असो; तर मनुष्याचें अंतर्गत हें अद्याप पहिल्यासारखेंच मलिन आहे, व त्याची परस्वापहरणाविषयींची जी लालसा तिचें फळ तूर्त आम्ही भोगीत आहों!

आतां या एका स्वातंत्र्यनाशाच्या पायीं आमचीं कितीक नुकसानें झालीं आहेत पहा. एक तर आमचें जगांतून अस्तित्वच नाहींसें झाल्यासारखें झालें आहे. केवळ प्राणधारण करून आम्ही आहों इतकेंच काय तें! गेल्या शतकांत हिंदु लोकांचें राज्य, हिंदु लोकांची संपत्ति, हिंदु लोकांची विद्या, वगैरे शब्दांत जसा अर्थ होता तसा आतां कांहीं राहिला आहे काय? सांप्रत आमचे लहानमोठे सर्व राजे म्हटले म्हणजे सरासरी बुदबळांतलेच होत. हालतां नये, बोलतां नये, बडे साहेबांच्या सदोदित

यापूर्वी स्वदेशीय राजांच्या उत्कृष्ट कारकीर्दीतही कधीं नव्हतें, त्याप्रमाणेंच आमचे लोकच अत्यंत साहसशून्य व अगदीं पोंचट होऊन गेले आहेत, नाहीं तर या स्थितींतही त्यांचा किती उत्कर्ष होण्यासारखा आहे हेंही बहुधा सर्वांच्या लक्षांत येण्यासारखें आहे !

---

फाराचि बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच ।

'विराटपर्व'

१. मागील अंकांत प्रस्तुतच्या राज्यापासून आमच्या देशास कोणकोणते फायदे झाले आहेत व होण्यासारखे आहेत ते सांगितले. आतां त्यांत वरील राज्यापासून आमचें आजपर्यंत काय काय नुकसान झालें व पुढें कितपत होण्यासारखें आहे याविषयीं विचार करूं.

२. इंग्रजी राज्यापासून आमची पहिली मोठी हानि कोणती झाली म्हणाल तर स्वातंत्र्यनाश. स्वातंत्र्याची स्थिति पारतंत्र्यापेक्षां किती सुखावह असते हें कोणालाही सांगायाला नकोच. यदृच्छेनें अंतरालांत फिरणाऱ्या व वनगहनांत यथेच्छ आहारविहार करणाऱ्या पक्ष्यांत आणि मोठ्या सोन्याच्या किंवा रत्नखचित पिंजऱ्यांत कोंडलेल्या पोपटांत किती अंतर ! ज्याचा ईश्वरदत्त अधिकार हा, कीं त्यानें आपल्या सुंदर पक्षांच्या बळावर हवा तिकडे अनिरुद्ध संचार करावा, नानाविध फळांचा रसास्वाद घ्यावा, स्वजनांत राहून संसारसुख अनुभवावें, त्यानें टीचभर जागेंत राहून सदोदित 'लटपटपंची' करीत राहावें ही केवढी दैन्यावस्था ! हीच गोष्ट राष्ट्रांसही लागू आहे. वस्तुतः पाहतां ज्या त्या राष्ट्रानें आपापली व्यवस्था ठेवावी व इतरांशीं जो संबंध ठेवायाचा तो फक्त व्यापाराच्या वगैरे संबंधानें ठेवावा, हा सचोटीचा मार्ग. प्रत्येक गृहस्थानें जसें आपलें घरदार, कुटुंब व जिनगी हीं सुरक्षित ठेवून आपल्या शेजाऱ्यास उपद्रव लावूं नये, ही नीति होय; त्याप्रमाणेंच एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राशीं जो व्यवहार ठेवायाचा तोही माणुसकीस अनुसरूनच ठेवणें उचित होय. गोमाजीनें उठून तिमाजीच्या घरावर दरवडा घालावा, त्याची चीजवस्त लुटून त्याचा जीव घ्यावा, बायको

उपटावा, मुलामाणसांस बंदेगुलाम करून आपल्या घरीं न्यावें, हा प्रकार जितक्या दुष्टपणाचा व पाजीपणाचा आहे, तितकाच दुसऱ्याच्या मुलखावर स्वारी करणें, हजारों माणसांचे लढाईंत प्राण घेणें, सारा देश उध्वस्त करून त्यास कंगाल करून सोडणें, हाही होय. पण असें असतां आजपर्यंत जगाचा क्रम पाहिला तर काय आढळेल बरें ? दुसरें काय, लढालढी, मारामारी, रक्तपात, लुटालूट, जाळून पोळून फस्त,—हाच काय तो ! त्यांतून ज्या वेळेस सद्धर्माचा उदय झाला नव्हता, व खऱ्या देवाची ओळख कोणास नसून खोटे देवच साऱ्या देशांतून माजले होते, शिवाय सुधारणेचा ध्वज आलीकडे जसा चोहोंकडे फडकूं लागला आहे तशीही जेव्हां स्थिति नव्हती, तेव्हां वरील दांडगाईचे व अन्यायाचे प्रकार जिकडे तिकडे दृष्टीस पडत असत यांत कांहीं नवल नाहीं. पण हल्लीं चालू असणारें एकोणिसावें शतक हें तर सुधारणेच्या संबंधानें पहिल्या प्रतीचा बाणा मिरवीत असतां, व या शतकांत सद्धर्माचे पवित्र प्रेषित आकाशांतली दिवटी घेऊन सारें भूमंडळ आक्रमीत असतां व येशूच्या दयामय धर्माचा जिकडे तिकडे गजर करीत असतां, कंठस्नानाचा व झोटिंगपाच्छाईचा प्रचार पहिल्यापेक्षां आतां काडीभरही कमी आहे असें नाहीं. हें शतक सुधारणेंत जसें सर्वांत पुढें आहे त्याप्रमाणेंच रक्तपातांतही त्याची सरशीच आहे. मागें भूमातेला तिची पवित्र लेकरें रक्तचंदनाचा नुसता सडा टाकून शोभवीत असत, आतां तर ती जों जों शहाणी होत चालली तों तों तिला वारंवार रुधिरस्नानाची महापर्वणी लाधते ! असो; तर मनुष्याचें अंतर्गत हें अद्याप पहिल्यासारखेंच मलिन आहे, व त्याची परस्वापहरणाविषयींची जी लालसा तिचें फळ तूर्त आम्ही भोगीत आहों !

आतां या एका स्वातंत्र्यनाशाच्या पायीं आमचीं कितीक नुकसानें झालीं आहेत पहा. एक तर आमचें जगांतून अस्तित्वच नाहींसें झाल्यासारखें झालें आहे. केवळ प्राणधारण करून आम्ही आहों इतकेंच काय तें ! गेल्या शतकांत हिंदु लोकांचें राज्य, हिंदु लोकांची संपत्ति, हिंदु लोकांची विद्या, वगैरे शब्दांत जसा अर्थ होता तसा आतां कांहीं राहिला आहे काय ? सांप्रत आमचे लहानमोठे सर्व राजे म्हटले म्हणजे सरासरी बुदबळांतलेच होत. हालतां नये, बोलतां नये, बडे साहेबांच्या सदोदित

मुठींत, जवळ फौजफाटा म्हटला तर केवढा,–बुदबळांतलाच सरासरी प्रकार! तो ही आज कितीक दिवस सरकारच्या डोळ्यांत खुपतोच आहे! आमची संपत्ति म्हटली तर एकाद्या वेश्येपाशीं जशी असते तशा प्रकारची. कोणी वस्ताद आला आणि तोंडांत मारून घेऊं लागला, तर तिचा बचाव करण्यापुरतीही आमच्यांत ताकद नाहीं. रोमन लोकांनीं ब्रिटन देश अचानक सोडून दिला त्याप्रमाणे जर उद्यां आम्हांवर पाळी आली, तर आमच्या मुंबापुरींतल्या एकेका ढेलाची काय त्रेधा उडून जाईल बरें! चार चार घोड्यांच्या गाडींतून जीं प्रस्थें घराच्या बाहेर पडावयाचीं त्यांची हरी रामोशाशीं गांठ पडल्यावर त्यांजवर केवढा प्रसंग गुजरेल हें सांगावयाला नकोच! दोन वर्षांपूर्वींच एका यःकश्चित् दरवडेखोरानें साऱ्या दक्षिणेंत केवढी धामधूम करून दिली या एका गोष्टीवरूनच आमच्यांत दिवसां-दिवस किती मर्दुमकी येत चालली आहे हें कोणाच्याही सहज लक्षांत येणारें आहे. हाच प्रकार आमच्या विद्येचा, व धर्माचाही. आमची अलीकडील विद्वत्ता म्हणून जी आम्ही येवढ्या डौलानें मिरवतों, ती वस्तुतः पाहतां पाश्चात्य विद्येचा एक रजःकण आहे; तींत आमचें स्वतःचें बहुधा कांहींच नाहीं, व आहे तीही प्रायः शब्दज्ञानात्मकच आहे. उद्यां जर आमचें सरकार आम्हांस सोडून गेलें तर तिला दीडदमडीलाही कोणी विचारील कीं नाहीं कोण जाणे! इंग्रेज लोक जर एकदम आमच्या देशां-तून अंतर्धान पावले, तर आमच्या बड्या विद्वानांत कोणी रेल्वे एंजिन करणारा मिळेल किंवा तारायंत्र जुळवून देणारा मिळेल याचा वानवाच वाटतो! त्याप्रमाणेंच शेंकडों प्रकारचे कारागीर जे आमच्या देशांत आज शेंकडों वर्षें नांदत आले ते आलीकडे एकामागून एक जे नाहींसे होत गेले व चालले आहेत, ते तरी पुनः उत्पन्न व्हावयाचे म्हणजे केवढी दुरापास्त गोष्ट आहे! सारांश, जसा एकादा आयदोजी असतो, व त्याला पाटावर बसवून ठेवून त्याचें सर्व कामकाज दुसऱ्यांनीं करावें, त्यासारखी आमची स्थिति दिवसांदिवस होऊं पाहत आहे. असें होतां होतां लवकरच काडीचाही वकूब नाहीं असें आम्ही नादान होऊन जातो कीं काय कोण जाणे! हल्लीं आमची धर्माच्या संबंधानें कोणत्या प्रकारची स्थिति होऊन गेली आहे ती तर

सांगायाला नकोच. जुन्या धर्माची आम्हांस अतिशय लाज वाटून ख्रिस्ती लोकांचें पोकळ अनुकरण करणें हाच ईश्वराराधनाचा व लोकनीति सुधारण्याचा काय तो मार्ग आहे असें आम्हांस वाटूं लागलें आहे.

तेव्हां एकंदरींत पाहतां आम्ही तूर्त जगांतून उठल्यासारखेच झालों आहों. ज्यांस आम्हीं प्रथमतः थारा दिला, व जे आमच्या पुढें पुढें कित्येक दिवस करीत होते तेच आतां आमचे धनी होऊन बसले आहेत; व साऱ्या देशांतली जमीन सरकारची, जंगलांतील प्रत्येक झाड व झाडाचें प्रत्येक पान सरकारचें, सरकारास हवे तसे कर बसविण्यास पूर्ण अधिकार आहे, व त्या पैशाचा हवा तसा विनियोग करण्यास ' केसरी हिंद् ' चे कुलमुकत्यार वैसराय साहेब यांस मुभा आहे, देशांतील लोक म्हणजे सारे बैल, त्यांस आम्ही जसें वागवूं तसें त्यांनीं वागलें पाहिजे, त्यांस वस्तुतः म्हणजे कांहीं हक्क नाहींत, आम्ही मेहेरबानी करून काय हक्क देऊं तेवढे घेऊन त्यांनीं मुकाट्यानें रहावें व आमची निरंतर स्तुति गात बसावें, असें जो न करील तो राजद्रोही समजला जाईल, अशा प्रकारची एकंदर आमची हालहवाल आहे. हा सर्व प्रकार कशामुळें ? तर एक स्वातंत्र्य गमावल्यापासून.

३. आतां आमच्यांपैकीं कित्येक सुखावलेल्या मंडळींचा वरील उल्लेखावर असा आक्षेप येणार आहे कीं, " स्वातंत्र्य हें वस्तुतः अत्यंत इष्ट आहे खरें; पण तें आम्हांस काय उपयोगी ? " बाळमित्रां " त ' मुलें जीं स्वातंत्र्य व्हावयास इच्छीत होतीं ' हा धडा आहे, त्यांत जशी त्या वेड्या मुलांची हौस त्यांच्या विपत्तीस कारण झाली; किंवा इस्पितळांस कोंडलेले वेडे एकदम सोडून दिले, अगर गोठ्यांतलीं गुरें मोकळीं सोडून दिलीं, तर जसा अनर्थ होईल; त्याप्रमाणेंच आम्हांसारख्या मूर्ख लोकांस स्वातंत्र्य प्राप्त झालें असतां मोठा कहर गुदरणार नाहीं काय ? " ही वेडी समजूत आजपर्यंत आमच्यांतील अर्वाचीन विद्वज्जनांनीं हृदयाशीं धारण केली होती, व अद्यापही ती सुटली आहे असें नाहीं. आमच्या राज्यकर्त्यांचा तरी बोलून दाखवायाचा बाणा हाच कीं हे हिंदुस्थानांतले सारे लोक निवळ वेडे आहेत व यांच्यांत सामर्थ्य बिलकूल नाहीं, यास्तव यांचा पतकर आकाशांतील प्रभूनें आमच्याकडे

सोंपवून दिला आहे; तर यांचा यथायोग्य प्रतिपाळ करून यांस शहाणे केलें की आम्ही चाललों; आमचें येथें काय आहे ! हाच कोटिक्रम लढवून लॉर्ड डालहौसी साहेबांनीं पंजाब तोंडांत टाक, नागपूर गिळून टाक, सातारा, झांशी वगैरेंची चटणी कोशिंबीर कर, अयोध्येच्या नबाबास गादीवरून खालीं ओढ, हा आठ वर्षे सारखा सपाटा चालवला, आणि आपलीं घोर कर्मे बिचाऱ्या क्यानिंग साहेबास पुढें निस्तारायाला लावलीं ! * तेव्हां आम्ही

---

* लॉर्ड डालहौसी साहेबांनीं आमच्या कल्याणार्थ आम्हांस नागवण्याचा जेव्हां एकसारखा तडाखा चालवला, तेव्हां हिंदुस्थानाचे हितचिंतक म्हणविणारे आणि स्वातंत्र्याचे व सदाचरणाचे अभिमानी मेकॉलेसाहेब यांनीं येणेंप्रमाणें आपला अत्यंत संतोष प्रदर्शित केला:—

" I am happy, to say, that, since this passage was written, the territories both of the Rajah of Nagpore and of the king of Oudh have been added to the British dominions ( 1857 ). "

History of England ( note )

लखनौ व नागपूर येथील दौलत आपल्या देशबंधूंस यथेच्छ लुटायाला सांपडली हें ऐकून आमच्या साहेबांस जे आनंदाश्रू आले ते लवकरच दुःखाश्रू झाले:—

" Horrible news from India: massacres of Europeans at Delhi, and mutiny. I have no apprehensions for our Indian Empire; but this is a frightful event. Home; but had no heart for work. I cannot settle to work while the Delhi affair is undecided. "

Life and Letters of Lord Macaulay.

वरील दोन उताऱ्यांवरून आमचे साहेब निःपक्षपात इतिहासकार होण्यास किती नालायक होते हें कोणासही सहज कळून येणारें आहे. इंग्रेजांच्या घरांत पैसा जात असला म्हणजे मग तो दरवडे घालून जाईना, त्याबद्दल साहेबांस आनंदच. पण त्या दरवड्यांपासून पुढें जर कांहीं बरीवाईट गोष्ट घडून आली, तर मात्र त्यांनीं तेवढें हिरमुसलेलें तोंड करा-

[ पुढें चालू ]

आपला स्वतःचा कारभार करण्यास अगदीं नालायक आहों, व स्वातंत्र्य हें आम्हांस हितकारक न होतां उलटें अत्यंत अनिष्टप्रद होणारें आहे, हा एक मोठा मुद्दा आमच्या पाश्चात्य बंधुजनांनीं काढला आहे, व त्याचा अनुवाद आमचे अर्वाच्य पंडित आपल्या नेहेमींच्या पद्धतीस अनुसरून आजपर्यंत करीत आले आहेत व अद्यापही करीत आहेत. * आतां वस्तुतः पाहतां त्यांत किती अर्थ आहे याविषयीं जो पूर्वापार इतिहासाकडे नजर देऊन विचार करील त्याच्या ध्यानांतसुद्धां ही गोष्ट सहज येणार आहे कीं, या जगांत इंग्रेज लोक जर मुळींच नसते तर त्यांच्या वांचून म्हणजे आम्ही

---

[ मागील पृष्ठांवरून पुढें चालू ].

वयाचें ! वाः मेकॉले बोवा ! धन्य तुम्हीं, तुमची नीति, तुमची स्वदेशप्रीति, आणि तुमचा खिस्ती धर्म ! !

अरेरे ! गेल्या शतकांत हेस्टिंग्सच्या नांवानें दांत ओठ खाणारा बिचारा बर्क, आणि या शतकांत डालहौसी, लिटन्, बीकन्स्फील्ड यांचे पोवाडे गाणारा बिचारा राबर्ट नैट् हे किती खुळे लोक बरें ! त्यांनीं वरील इतिहासकाराप्रमाणें आपला संतोष देश्यांनीं कोठेंच प्रदर्शित केला नाहीं ! या निमकहरामीपणाबद्दल आकाशांतील बापानें त्यांस परलोकीं काय भयंकर शासन नेमून ठेवलें असेल तें असो ! !

* वरील विषयाचा खल नुकता झालेलाच आहे. यास्तव वरील प्रकरणीं आणखी न लिहितां आलीकडे सांपडलेलें एक ताजें सर्टीफिकिट येथें दाखल करतों म्हणजे झालें:—

" India has produced in modern times as great administrators as ever existed in England: Porneah, of Mysoor and Nana Farnavese, the Mahratta minister, might claim to be on a level with the most celebrated of our English statesmen as will be plain to any one who reads their history from the pens of the Duke of Wellington, Elphinstone, and others who, statesmen themselves, were able to discern the qualities which make a statesman. "

The way to regain India.

रसातळास जाऊन पोंचलों असतों असें कांहीं नाहीं; त्यांनीं आमच्याकरतां येवढी तसदी घेऊन खोट्या सह्या करा, दिवसाढवळ्या दरवडे घाला, असा क्रम आरंभून या देशाचें आधिपत्य जें स्वीकारलें ते जर ते न करते, व आपल्या श्वेतद्वीपाच्या आंतल्या आंतच जर ते राहते, तर आम्ही आज कोणत्या स्थितींत असतों हें सांगायला नकोच. हें खरें आहे कीं, आज जेथें आगगाड्या आहेत तेथें आमच्या जुन्या बैलगाड्याच राहत्या, व तारायंत्राच्या जागीं सांडणीस्वार किंवा जासूद हीच पुरातनची पद्धति अद्याप कायम राहती. त्याप्रमाणेंच सात समुद्र जाऊन आटलांटिक, पासिफिक, भूमध्यसमुद्र हेही त्यांच्या जागीं येऊन न बसते; पण हल्लीं जो जिकडे तिकडे सुधारणेचा कळस दृष्टीस पडत आहे, कीं साहेबी बूट खाऊनही लोक चाकरी करायाला तयार असतां कोणास पोटभर अन्न नाहीं, जिकडे तिकडे रोगराई, अशक्तता, दैन्य इत्यादिकांचा प्रचार, जेथें शेकडों हजारों वीर हां हां म्हणतां गोळा व्हावयाचे तेथें आतां कोणास स्वप्नींही तरवारीचें किंवा बंदुकीचें दर्शन नाहीं, ही दुबळेपणाची व शोचनीय स्थिति तरी आम्हांस नसती! इंग्रेजांनीं आपले घोडे बेताबेतानें पुढें सरकवण्यास सुरवात केली त्यावेळीं आम्हीं मुसलमानांस जिकडे तिकडे जेर करून आपल्या बाहुबळानें व बुद्धिबळानें वश करून टाकिलें होतें; चुलत्यानें गिलच्यास अटकेची पैलथडी दाखविली तों पुतण्यानें दक्षिणेंत नबाब साहेबांची व सुलतान साहेबांची खोड मोडावी येथपर्यंत आमची मजल येऊन ठेपली होती. मग वेलेस्ली साहेबांनीं परोपकारबुद्धीनें मध्यें पडून शिंद्याचा मोड कर, होळकरांच्या पाठीस लाग, पेशव्यास आणून गादीवर बसव, वगैरे जे ढवळाढवळीचे प्रकार केले व सरतेशेवटीं साऱ्यांस गुंडाळून टाकून आम्ही 'केसर्–इ–हिंद्' हिंदुपदबादशाही हा जो ध्वजारोप केला त्याची काय जरूर होती बरें? ज्यास केवळ लोककल्याणार्थ उद्योग करावयाचा आहे त्यास येवढा खटाटोप करण्याची जरूर आहे काय? आम्हांला तर मुळींच दिसत नाहीं. शिवाजी महाराजांनीं आपलें सारें राज्य गुरुपदीं वाहिलें, तेव्हां गुरुमहाराजांच्या जिभेला पाणी सुटून त्यांनीं जर पुढील पेशवाईंतला प्रकार त्याच वेळेस युक्तियुक्तीनें अमलांत आणला असता:— म्हणजे आपली भिक्षेची कुबडी हळूच एकीकडे ठेवून देऊन समशेर हातांत

घेतली असती, आणि साऱ्या फौजेवर हुकमत ठेवून 'शापादपि शरादपि' * असें साव्यसाचित्व पतकरलें असतें, आणि आपल्या शिष्यास रायगडावर किंवा साताराच्या किल्ल्यावर टाकून राज्यसुखाचे सोहळे भोगण्यास आरंभ केला असता आणि सिंहासनावर बसून निरंतर जप काय ?—

**मना वासना दुष्ट कामा नये रे मना सर्वथा पापबुद्धी नको रे ।**
**मना सर्वथा नीति सोडूं नको हो मना अंतरीं सारवीचार राहो ॥**

असें जर झालें असतें, तर आजपर्यंत समर्थ महाराजांचा केवढा नांवलौकिक मागें राहता बरें ! ! तर आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंस जर खरोखरच आमची येवढी कींव आली होती, कीं आम्ही आपापसांत मारामारी करून विनाकारण आपलें नुकसान करून घेत आहों, किंवा काबूल कंदहारांतल्या दुष्ट लोकांच्या झुंडीच्या झुंडी इकडे येऊन ते या समृद्ध देशाचा धुडगूस उडवतात हेंही जर त्यांच्यानें पाहवत नव्हतें, तर वरील राजगुरूंनीं आपल्या 'शिवबा' स ऐहिक व पारलौकिक असा दोहों प्रकारचा उपदेश करण्याचा जसा अधिकार घेतला होता तसा त्यांनीं घ्यावयाचा होता; अगर वॉशिंग्टन् यानें आपल्या देशबांधवांस इंग्लिशांच्या त्रासापासून सोडवून स्वतंत्र केलें, आणि तें महाकार्य आटोपल्यावर पुनः शिंगें मोडून तो जसा वासरांत शिरला आणि एका सुतळीच्या तोड्यालाही न शिवतां अगदीं अलिप्तपणें राहून त्यानें शेवटपर्यंत कालक्रमणा केली,—तसा तरी प्रकार घडावयाचा होता. पण प्रकृत प्रसंगीं पाहतां वरच्यांपैकीं एकही प्रकार घडला नाहीं. येथला प्रकार निराळाच. 'इसापनीतींतल्या' स्वारानें जसें घोड्यांस सांगितलें, कीं "बा रे तूं म्हणतोस खरें, पण आतां नाहीं माझ्यानें तुला सोडवत; तूं इतका उपयोगी आहेस हें मला पूर्वीं माहीत नव्हतें; तर तुझ्या पाठीवरचें खोगीर कधीं निघेल ही आशा सोडून दे." मग हा प्रसार सारा धडधडीत डोळ्यांपुढें दिसत असतां आम्ही हिंदुस्थानच्या कल्याणाकरतां येथें आलों आणि तें कल्याण झालें म्हणजे आम्ही येथून जाणार, हा 'मतलबासिंधु' ज्या बिचाऱ्या भोळ्या भाविकांस आजपर्यंत खरा वाटला व अद्यापही वाटत आहे त्यांची धन्य म्हटली पाहिजे; दुसरें काय !

---

* वरील शब्द प्रसिद्ध भारती ब्राह्मणवीर द्रोणाचार्य यांच्या संबंधाचे आहेत. यांचीं आयुधें दोनः—शाप आणि शर !

४. तेव्हां आमच्या देशावर इंग्रेजांचें जें राज्य झालें आहे त्याविषयीं आमचें मत तर असें आहे कीं, आमचें कल्याण होण्यास त्यावांचून म्हणजे दुसरा मार्गच नव्हता असें कांहीं नाहीं. आम्ही आज तीन चार हजार वर्षें जे या देशांत नांदलों, येवढालीं राज्यें चालविलीं, कायदेकानू केले, शास्त्रें निर्माण केलीं, कला उदयास आणल्या, ऐहिक व अध्यात्म विचार केले. ते सर्व या आंग्लभौम मंडळीच्याच जिवावर काय ? आमच्या पोरस्* राजानें जगद्विजयी शिकंदराशीं पंजाबांत टक्कर दिली, तेव्हां क्लैव् व वेलेस्ली साहेब कोणीकडे होते बरें ? आमच्या जगद्गुरूंनीं बौद्धांस वादांत जर्जर करून त्यांस चिनांत व लंकेंत पळवून लाविलें, त्या वेळेस रेवरेंड मंडळी कोणीकडे लपून बसली होती ? महेश्वरानें डमरूनाद करून येवढी अवाढव्य गीर्वाणवाणी, पण तिलाही गुंडाळून टाकण्यासारखीं चवदा सूत्रें प्रगट करून पाणिनीस अर्पण केलीं, तेव्हां मेकॉले साहेबांच्या प्रपितामहाचे प्रपितामह कोणत्या स्थितींत असतील बरें ? या तर प्राचीन काळच्या गोष्टी झाल्या. ह्या वेळेस आमच्या प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांचे पूर्वज जनावरांचीं कातडीं पांघरून व आंगाला रंग लावून आमच्या अर्वाचीन नाटकांतल्या विदूषकाप्रमाणें नुकतें कोठें या जगाच्या रंगभूमीवर नाचूं लागले होते हें सर्व प्रसिद्धच आहे. तेव्हां त्या वेळची गोष्ट राहूं

---

* आलीकडे वृथाभिमानी व अल्पज्ञ इंग्रेज ग्रंथकारांनीं आमच्या देशाच्या संबंधानें ज्या कल्पना चोहोंकडे पसरून दिल्या आहेत, व ज्या आमच्या स्वतःच्या मूर्खत्वास्तव व शोधाभावास्तव आम्हीही खऱ्या धरून चालत आलों आहों, त्यास प्राचीन व अर्वाचीन इतिहासावरून एकंदरींत पाहतां फारच थोडा आधार मिळतो. शिकंदराचें सैन्य येवढा दिग्विजय करून पंजाबावर चालून आलें असतां तेथें त्यास कित्येक निकराच्या लढाया कराव्या लागल्या. विशेषतः पोरस् राजाची हकीकत तर ग्रीसच्या इतिहासांत फारच मौजेची आढळते. ती बरीच लांब असल्यामुळें येथें देववत नाहीं. ही प्राच्य व पाश्चात्य आर्यांची लढाई शतद्रु नदीच्या कांठीं झाली. 'शतद्रु'चा अपभ्रंश 'सतरंजी' असा आलीकडे झाला आहे. हीस ग्रीस लोक 'हैडास्पीज' म्हणत व इंग्रेज लोक 'सतलज' म्हणतात.

च्या. पण अगदीं आलीकडच्या काळाविषयीं जरी विचार केला, तरी काय आढळेल बरें ? बापानें टाकून दिलेल्या पंधरा सोळा वर्षांच्या पोरानें मावळांतल्या दऱ्याखोऱ्यांतून हिंडून वनचरांस आपले सवंगडे केले, आणि यवनाक्रांत झालेल्या भूमीचा भार हरण करण्याचा प्रचंड संकल्प योजून तानाजी मालुसरे, बाजी फसलकर, येसाजी कंक, असल्या पोंगड्या वीरांस अफझलखां, झुल्फिकारखां, रुस्तुमखां असल्या बादशाही मंडळीशीं झुंझायला लावून त्यांची खाखा मोडली, आणि हिंदूंची चिरनष्ट राजसत्ता पुनः उदयास आणून मराठेशाहीची टोलेजंग इमारत उभारून दिली,—हा सर्व विभु रचतांना शिवाजी महाराजांनी इंग्रेजी शिपाईगिरी किंवा इंग्रेजी मुत्सद्देगिरी चार हजार कोसांवरून उसनी मागून आणली होती काय ? त्याप्रमाणेंच कारकुनी पेशानें वागणाऱ्या बाळाजीपंतानें शाहूच्या राजमंडळांत शिरतांच दिल्ली अटकेपर्यंत नजर पोंचवून अवघ्या बादशाईस आपल्या जाळ्यांत गुदरविलें, आणि येवढी शिकार आपल्या देशबांधवांच्या आटोक्यांत आणून दिली, हें करतांना तरी वरील पेशव्यानें आपली बुद्धि एखाद्या आंग्लभौम विद्यालयांत पाजळून घेतली होती काय ? पण इतकेंही दूर जावयाला नको. नुकत्या वीसपंचवीस वर्षांमागच्या गोष्टींकडेच अंमळ लक्ष पुरवलें असतां आम्ही कुचकामाचे आहों, आम्ही राजकारण व युद्धाला या दोहोंविषयीं अगदीं अडाणी आहों, आम्हांस इंग्रेज लोक शिकावितील तेव्हांच आम्ही शहाणे होणार, वगैरे मूर्ख कल्पनांचा तेव्हांच ऱ्हास होणारा आहे. सत्तावन सालच्या भयंकर बंडाविषयीं जो जो शांतपणें विचार करील ( असा विचार करण्याची वेळ आतां आली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ) त्यास त्यावरून एकंदर राष्ट्राविषयीं कोणकोणत्या कल्पना होण्यासारख्या आहेत बरें ? आम्हांत कुवत नाहीं, धैर्य नाहीं, ज्ञान नाहीं, या कल्पना वरील सालच्या इतिहासावरून होतील काय ? आतां या बंडांत आमच्या लोकांच्या हातून पुष्कळ अत्यंत क्रूरपणाचीं कृत्यें घडलीं, व इंग्रेजी कवायतीपुढें त्यांचें कांहीं न चालून येवढा बंडावा झाला असतांही तो लवकर मोडण्यांत आला, शिवाय अनेक इंग्लिश सरदारांचें अतुल धैर्य वरील प्रसंगीं प्रगट झालें, हें सर्व खरें; पण ब्रह्मावर्तचा एक यःकश्चित् शागिर्द काय, आणि तो ' लंडन टैम्स ' चे

बातमीदार रसेल् साहेब यांच्या हातचें सर्टिफिकिट काय मिळवितो, * त्याप्रमाणेंच झांशी संस्थानचें तें काय, आणि त्याची माजी मालकीण एक रांडावलेली बाई काय, आणि तिनें सर ह्यू रोज याच्याबरोबर सामना काय दिला! S—तेव्हां हा सगळाच चमत्कार नव्हे काय? तो ध्यानांत आणून ज्यास आमच्या वास्तविक स्वरूपाची प्रतीति वडणार नाहीं त्या महापुरुषाचें डोकें कांहीं विचित्रच असलें पाहिजे!!

तेव्हां आमच्या लिहिण्यांतील एकंदर आशय हा आहे कीं, आमचे राज्यकर्ते आमच्या संबंधानें जो मोठ्या डौलाचा आव नेहेमीं घालीत असतात, कीं तुम्ही नेणतीं लेकरें आहां व आम्ही आतां यापुढें तुम्हांला काय सज्ञान करूं ते करूं; बाकी आम्ही येथें येण्याच्या पूर्वींची तुमची

---

* अं. १२, पृष्ठ ३७ टीप.

S वरील स्त्रीरत्न जर युरोपच्या एखाद्या देशांत निपजलें असतें तर त्याचें किती चीज झालें असतें हें सांगतां पुरवत नाहीं. तिजवर किती नाटकें व किती कादंबऱ्या झाल्या असत्या, व किती इतिहासकारांनीं व चरित्रकारांनीं तिचा वृत्तांत मिळवून जगास जाहीर केला असता! एका इंग्रेजी इतिहासकारानें तीस फ्रान्स देशांतील प्रसिद्ध सेनानायिका जोन् ऑफ् आर्क हिची उपमा दिली आहे. हें पुस्तक परवांच्या आगींत जळाल्यामुळें त्यांतील उतारा देववत नाहीं. ग्रंथकाराचें व पुस्तकाचें नांव आम्हांस आठवतें, तेवढें मात्र येथें दाखल करतों:—British India from 1757 to 1857, a book of confessions—by Torrens, M. P.

माजी 'दंभहारका' च्या एका अंकांत प्रस्तुत विषयावर एक उतारा आला होता, तो येथें दाखल करण्यासारखा आहे:—

"Among the native rulers who have heroically resisted foreign invaders, none have shown stronger qualities than Lakshmi Baee, the Rani, or Queen of Jhansi; whose wonderful generalship held the British army in check; and who headed her troops in person, dressed as a cavalry officer, and was killed on the field. Sir Hugh Rose declared that the best man on the enemy's side was the Rani of Jhansi!"

स्थिति म्हणजे केवळ अज्ञानाची व रानटीपणाची होती,—हा सर्व निवळ भ्रम आहे. ज्या त्या राष्ट्राला आपापली घमेंडी वाटतच असते, आणि त्यांतून एका राष्ट्रानें दुसऱ्यास जिंकलें म्हणजे तर तें विजयी राष्ट्र काय म्हणेल ती पूर्वदिशा असा प्रकार होत असतो, तेव्हां याच कारणावरून वरील मत आजपर्यंत माजलें आहे. वस्तुतः पाहतां इंग्रेजांनीं म्हणजे आमचा पतकर घ्यावयाला पाहिजे होता असें कांहीं नाहीं. ते जर इकडे आले नसते तर त्यामुळें आमचें कांहीं अहित न होतां उलटें हितच होण्याचा अतिशय संभव होता. स्पेनच्या लोकांनीं क्रमाक्रमानें जसें मुसलमानांस आपल्या देशांतून पार आफ्रिकेंत घालवून दिलें, आणि अर्धचंद्राच्या जागीं माकल्यान आपला क्रूस आणून त्यांनीं चोहोंकडे स्थापित केला त्याप्रमाणेंच चालू शतकांत सारें भरतखंड निर्यवन होऊन पुनः आर्यराष्ट्राचें सार्वभौमत्व होण्याचा योग आला होता. पण आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंनीं छिद्रान्वेषण आरंभून भाऊबंदकी साधल्यामुळें त्याजवर विरजण पडलें !

असो; तर आम्ही स्वातंत्र्याच्या स्थितीला योग्य नाहीं, व तसें असल्यामुळें आमचें प्रस्तुतचें पारतंत्र्य अत्यंत हितावह होय, हीं दोन्हीं मतें निवळ खोटीं आहेत असें आम्हांस वाटतें व हीं आलीकडे आमच्या हृदयाशीं खिळून गेलीं आहेत हेंच प्रस्तुत काळीं आमची स्थिति सुधारण्यास मोठें प्रतिबंधक आहे यांत संशय नाहीं. आधीं तीरावरच ज्यानें हातपाय गाळले तो काय पोहणार ? रडतराव घोड्यावर कितीसे खंबीर स्वार होणार हें कोणीही सांगेल !

५. पण हा सारा वाद प्रस्तुत विषयाच्या संबंधानें पाहतां गौण आहे. त्याचा खरोखरी पाहतां मागील व पुढील काळाशीं जितका संबंध आहे तितका वर्तमान काळाशीं नाहीं. यास्तव सध्यांच्या स्थितीविषयींचें विवेचन आरंभलें आहे तेंच पुढें चालवूं.

वर इंग्रेजी राज्यापासून आमचें कोणकोणतें अहित झालें आहे तें सामान्यतः सांगण्यांत आलेंच आहे. एक पारतंत्र्य म्हटलें म्हणजे तें दरएक ठिकाणीं नडत असतें. या गोष्टीचा प्रत्यय सध्यां या देशांतील लोकांस पदोपदीं आहे. पहा कीं, आम्हीं व्यापारांत लक्ष घालूं म्हटलें तर आमचें कांहीं

चालणार आहे काय? इकडे मोठे भगीरथ प्रयत्न करून जरी देशी माल उत्पन्न केला, तरी कायदेकौंसलांतून एकादा वटहुकूम सुटला कीं पुरें, आमचे सारे कारखाने चीत! म्यांचेस्टरवाले सरकारचे देशबंधु पडल्यामुळें त्यांनीं तिकडे हाकाटी करून येथील जकात काढली, कीं इकडे आमचे हातपाय मोडले! इकडे उरस्फोड करून तपांचीं तपें विद्याध्ययनांत घाल-वावीं, आणि शेवटीं नोकरी मागितली म्हणजे आमचे चान्सेलर साहेब आम्हांस प्रेमपूर्वक उपदेश करणार ' कीं, "लाडक्यांनो, तुम्हांस आम्हीं येवढ्या औदार्यानें विद्यादान जें केलें, तें सरकारापुढें हात पसरण्याकरतां कां रे! अरे तुम्हीं आपला देश सुधारावा, लोकांस सज्ञान करावें, त्यांचे हक्क त्यांस समजावून द्यावे, आपल्या राज्यकर्त्यांचें निरंतर स्तुति-स्तोत्र करून आकाशांतील बापाच्या पायांपाशीं त्यांच्या कल्याणार्थ डोळे मिटून प्रार्थना करावी, विलायतेस जावें, अमेरिका पालथी घालावी, जॉन-सनसारखे ग्रंथ लिहावे, बर्कसारखें वक्तृत्व करावें, लूथरप्रमाणें धर्मसुधारणा करावी, मंगो पार्कप्रमाणें देशाटनें करावीं,—हें सर्व करायाचें सोडून देऊन खुळ्यासारखे चाकरीच्या रे काय नादीं लागतां? उदरपोषण हें काय रे विद्योपासनेचें पर्यवसान? सरकारानें तुम्हांस विद्या दिली ती दिली, आणि तुम्हांस नोकऱ्या देण्याचाही पतकर त्यांनींच घेतला पाहिजे काय? छे छे, एकून तुम्ही या युनिवर्सिटी जननीस व्यर्थ शिणविल्याच श्रेय घेऊं पाहत आहां, दुसरें कांहीं नाहीं!!" याप्रमाणें आमच्या झगेवाल्या मंडळीच्या कानीं विद्यादेवीच्या निष्काम उपा-सनेचा तत्त्वोपदेश दरवर्षी पडतो खरा; पण इकडे व्यवहारांत जों पाहावें तों त्याची प्रतीति फारशी येत नाहीं. जे आमचे प्रभु येथील विद्वानांस वरील ब्रह्मज्ञान शिकवतात तेच दरवर्षास वीस लाखांचा फन्ना उडवून 'कूपर्स हिल्ल' वासी मंडळीस इकडे पाचारण करतात, व आपल्या सनदी नोकरांस आगबोटीवर पाय ठेवल्यापासून तीनशें रुपयांचा तनखा चालू करतात. याखेरीज आमच्या दाक्षिण विद्यालयांतील प्रसिद्ध विद्यारण्यासारखे व मागें आलेल्या एका छिन्नांगुष्ठ विद्यागुरूंसारखे एकेक जाडे विद्वान् विद्या-खात्यावर गुदरून दिले जातात ते निराळेच! एतावता तात्पर्य काय, कीं सर्वोपरी नागवलेले जे आम्ही त्या आमच्या वांट्याला वरील कोरडें

विभाग ... ३
११
३९

अन्नदान आणि ज्यांस उदरनिर्वाहाच्या शेकडों इतर सोई आहेत ते जसे काय सरकारचे जांवई; नाहीं तेथून त्यांची भर झाली पाहिजे !

पण पारतंत्र्यापासून होणारी सर्वांतली मोठी हानि अजून सांगावयाचीच राहिली आहे. ती ही कीं, त्यापासून मानसिक उन्नति अगदीं नष्ट होऊन जाते. ज्याच्या परवशता ही कालेंकरून अंगवळणीं पडते तो हळू हळू मानधनता, लज्जा, धैर्य वगैरे सर्व सद्गुणांस पारखा होत जाऊन वरच्याच्या उलट जे दुर्गुण ते त्यास सहजीं जडूं लागतात, व उत्तरोत्तर मूळ स्थितीपासून तो भ्रष्ट होत जातो. ही परमावधि हल्लीं आमच्या देशांत बहुधा सर्वत्र दृष्टीस पडूं लागली आहे. जन्मास येऊन करावें काय, तर परदास्य करावें, यजमानाची खुशामत करावी, लांड्यालबाड्या कराव्या, लोकांच्या मुंड्या मुरगळाव्या, वरिष्ठाची थुंकी झेलून हाताखालच्यांस गांजावें; व शेवटीं पैशाची गांठोडीं उराशीं घट्ट आवळून धरून एकादे दिवशीं मरून जावें,—हें एकंदर तत्त्वज्ञान आलीकडे माजलें आहे. ‘ इसापनीती ’ तील कुतरा लांडग्यास जसा आपला सुखसोहळा निवेदन करीत आहे तशी सांप्रत बहुतेक मंडळीची स्थिति आहे. पूर्वींच्या लोकांत अकिंचन स्थितींत राहणारे, निःस्पृह, स्पष्टवक्ते अशा प्रकारचे पुरुष जसे पुष्कळ आढळत असत, तसा प्रकार आतां अगदीं विरळा. आतां हुशार व शहाणा मनुष्य कोण, तर जो साहेबांचे बूट उचलील, वरिष्ठानें कितीही पुष्पवृष्टि केली तरी ती जो प्रेमानें झेलील, आंगमस्तीपर्यंत वेळेनुसार येऊन ठेपली तरी ख्रिस्त प्रभूच्या उपदेशाप्रमाणें जो दुसरा गाल खुशाल पुढें करील, आपल्या यत्किंचित् स्वार्थाकरतां किंवा नुसती बहादुरी मिळण्याकरतां जो देशाशीं मात्रागमनीपणा करतांना बिलकुल शरम बाळगणार नाहीं, तो. आमच्या देशांत आलीकडे विद्येचा फैलावा थोडा झाला आहे असें नाहीं; पण या विद्येच्या योगानें जें वास्तविक ज्ञान निष्पन्न व्हावें, व जी मनाची थोरवी वाढावी, त्यांतलें अजून कांहींच दृष्टीस पडूं लागलें नाहीं असें म्हणावयास हरकत नाहीं. त्यांतून इंग्रेजी विद्या ही तर वस्तुतः पाहतां वाघिणीसारखी आहे; तिच्या दुधावर जो पोसला तो लेंचापेंचा कधींच निपजूं नये. * उत्साह, धैर्य, अश्लाघ्य

* इंग्रेजी भाषा शिकल्यापासून केवढा फायदा आहे, व या भाषेच्या

 [ पुढें चालू. ]

कर्मांचा तिरस्कार, स्वावलंबन इत्यादि उदात्त गुण वरील भाषेंतील ग्रंथांच्या अध्ययनीपासून उत्पन्न होणारे आहेत; पण आजपर्यंतच्या तऱ्हेवाईक शिक्षणपद्धतीनें म्हणा, अगर जितका संस्कार आमच्या आर्यांस अद्याप दिला नसल्यामुळें म्हणा, वरील गुणांचा उदय अद्याप तर कांहींच झालेला दृष्टीस पडत नाहीं. जिकडे पहावें तिकडे 'हां जी,' 'जी हां,' 'खुदावंत,' 'खावंद' हाच श्ववृत्तीचा प्रकार नजरेस येतो. यःकश्चित् मराठी कारकुनापासून तों मुनिसिपल कमिशनर, कौन्सिलर, दिवाणसाहेब, यांच्यापर्यंत एक मासला;—खावंदचरणारविंदीं मिलिंदायमान होणारी सारी मिंधी मंडळीं ! बाकी सभेंत उभें राहून नुसतें मुखपांडित्य करायला सांगा, त्यांत ज्याची त्याची तयारी; यंव करावें त्यंव करावें;—चुटक्यांच्या मांडवाला किती उशीर ! पण अंग मोडून मेहेनत करण्याची पाळी येऊं द्या; किंवा पदरचा एकादा पैसा खर्च करण्याची मात्र वेळ यावी, म्हणजे 'इसापनीतीं' तील सांबराची अवस्था ! कुत्र्यांचा शब्द कानीं पडतांच वरील सांबराची जशी गाळण व्हावयाची, त्याप्रमाणेंच वरील अवसानघातकी वीरांचा आव. एकंदर एका संस्कृत कवीनें वेदांताच्या संबंधानें जें विनोदानें म्हटलें आहे तेंच आमच्या फांकड्या मंडळीस लागू पडतें:—

वागुच्चारोत्सवं मात्रं तत्क्रियां कर्तुमक्षमाः ।
कलौ वेदांतिनो भांति फाल्गुने बालका इव ॥

---

**राजन् दुधुक्षसि यदि क्षितिधेनुमेनां**
**तेनाद्य वत्समिव लोकममुं पुषाण ।**

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू ]

अध्ययनानें फ्रेंच लोकांची स्थिति एकदम किती सुधारली, हें ज्यास माहीत करून घेणें असेल त्यानें बकल्चा इतिहास, भाग २, खंड ५ हें वाचावें.

यस्मिंश्च सम्यगनिशं परितुष्यमाणे
नानाफलैः फलति कल्पलतेव भूमिः ॥ *
'नीतिशतक.'

१. मागील दोन अंकांत इंग्रेजी राज्यापासून आमच्या देशास फायदे कोणते झाले व तोटे कोणते झाले याविषयीं निरूपण केलें. आतां या अंकांत आमच्या राज्यकर्त्यांचीं या देशाच्या संबंधानें कर्तव्यें कोणकोणतीं आहेत याविषयीं विचार करूं.

२. हा विचार करतांना अगोदर आमचें सरकार म्हणजे कोण याविषयीं विवेचन करणें आवश्य होय. सध्यांचें हिंदुस्थानचें राज्य ही तऱ्हा अगदींच विलक्षण आहे. यास्तव तिच्या संबंधानें प्रथमतः वाचकांचा समज बरोबर केल्याखेरीज पुढें जाऊन उपयोग नाहीं. आजपर्यंत या देशाचें आधिपत्य एतद्देशीय किंवा परदेशीय लोकांकडे जें होतें त्याचा प्रकार असा असे कीं, एक तर राजा व राजमंडळ हें या देशांतल्या देशांतच असे. मुसलमानांनीं दूरदूरच्या मुलखांतून येऊन जरी हा देश काबीज केला, व येथें अनेक राज्यें स्थापन केलीं तरी त्यांनीं येथल्या येथेंच तळ दिला होता. त्यामुळें हिंदुप्रजेपैकीं जर कोणास विचारलें असतें, कीं, तुमचा राजा कोण ? तर अकबर बादशहा, किंवा आदिलशाहा, असें त्या वेळेस सांगतां आलें असतें. पण इंग्रेजी राज्यांत तसा प्रकार मुळींच नाहीं. सन १८५८ सालापूर्वी जी व्यवस्था होती ती तर राहूं द्याच. पण हल्लीं केसरहिंदशाही अंमल सुरू झाला असतांही जर येथील एकाद्या कुणब्यास किंवा जुन्या गृहस्थास विचारलें, कीं तुमचा राजा कोण, तर त्यानें काय सांगावें ? गव्हर्नर साहेबांची गाडी कधींमधीं कोणाच्या येथें जाफतीला जातांना पाहिली असली, तर हे आमचे प्रभु असें त्यास क्षणभर वाटणार आहे. पण गव्हर्नर साहेब हे आमचे हिताहित

---

* " प्रजा हाच कीं वत्स भूधेनुकेचा
नृपा तूं करी फार सांभाळ याचा ।
स्ववत्साचिया जाण वात्सल्ययोगें
अभीष्टार्थ देईल हे भूमि वेगें ॥

वामन.

करण्यास सर्वस्वी मुकत्यार आहेत काय ? छे, त्यांच्या डोक्यावर हिंदुस्थानचे वैसराय ( प्रतिनिधि ) लाटसाहेब आहेतच. बरें, लाटसाहेब हे तरी आमचे कुलमुकत्यार आहेत काय ? त्यांनीं १८७७ सालच्या आरंभीं दिल्लीच्या बादशाही दरबारांत अध्यक्षस्थान पत्करलें होतें; व शिंदे, होळकर, निजाम, गायकवाड, अशा बड्या बड्या संस्थानिकांचे त्यांनीं सलाम घेतले; तेव्हां सकृद्दर्शनीं कोणास असा भ्रम होणें साहजिक आहे, कीं अश्वमेध केल्यावर युधिष्ठिर जसा भरतखंडाचा अधिपति झाला, किंवा साऱ्या प्रतिस्पर्ध्यांस निवडून टाकून अवरंगजेबाची स्वारी जशी दिल्लीच्या तक्तावर आरूढ होऊन हिंदुपद बादशहा बनली, त्याप्रमाणेंच नेक नामदार लॉर्ड लिटनसाहेब हे मुक्तेश्वराच्या ओवीप्रमाणेंच—

**प्राची प्रतीची दक्षिणोत्तरा । चारी दिशा चतुःसमुद्रां ॥**
**आक्रमूनि महीमहींद्रां । सुरेंद्र जैसा भूलोकीं ॥**

या सोहळ्याचे भोक्ते झाले. पण ही भ्रांति दवडण्यास मध्यभागाच्या सिंहासनावर मांडलेल्या तजविरीकडे अंमळ नजर फेकणें एवढें बस झालें असतें. ही तसबीर कोणाची होती हें सांगावयाला नकोच; मालिका माअझमा महाराणीसाहेब, हल्लीं केसरी हिंद, यांची ती प्रतिमा होती. तेव्हां या साऱ्या देशाचें प्रभुत्व हें लाट साहेबांकडून इंग्लिस्तानच्या तक्ताच्या मालकिणीकडे गेलें. बरें, आतां हें तरी प्रभुत्वाचें परम पद ठरणार काय ? छे, छे, हेंही राजसत्तेचें अत्युच्च शिखर नव्हेच ! तेथपर्यंत पोचण्यास आणखी मार्गक्रमण करणें जरूर आहे. मालिका माअझमा बाईसाहेबांनीं केसर्–इ–हिंद् ही किताबत जी घेतली, ती शिवाजीनें आपणास राजपद घेतलें, किंवा हैदर नाइकाचे चिरंजीव आपणास सुलतान म्हणवूं लागले, अथवा नेपोलियन यानें ख्रिस्ती धर्माचे जगद्गुरु पोपसाहेब यांच्या आशीर्वादाक्षता घेऊन सार्वभौमत्वाचा स्वीकार केला, अशांपैकीं तऱ्हा मुळींच नव्हती. तर मुख्य प्रधान माजी बीकन्स्फील्ड साहेब यांनीं आपल्या बहादुरीवर वरील समारंभ करवून एतद्देशीय राजेरजवाडे जीं पूर्वीं दोस्त सरकारें होतीं त्यांस मांडलिक करून महाराणीसाहेबांस चक्रवर्तिनी पदावर चढविलें. तेव्हां 'ते मंत्राः ब्राह्मणाधीनाः ब्राह्मणो मम दैवतं' या न्यायानें पाहतां महाराणी व्हिक्टोरिया यांच्यापेक्षां वरील यहुदी लॉर्ड साहेब यांची

पायरी वरची झाली. बरें तर, लॉर्ड बीकन्स्फील्ड हे आमचे धनी होते असें म्हणूं! असें म्हणावयाचें असेल, तर इंग्लंडांत नुकतेंच जें प्रभ्वंतर झालें, व जी मामळभाटी झाली, तिजकडे अगोदर लक्ष पुरवायाला पाहिजे. बीकन्स्फील्ड साहेब व त्यांचें पंचायतन * यांचें एकाएकी बारा वाजून जो 'मंगळमूर्ति मोरया' चा प्रकार झाला, व या उत्तरपूजेच्या समयीं कांहीं देवतांस मुष्टिमोदक नैवेद्यही समर्पण झाला, ती सारी धुमश्चक्री क्षणभर मनांत आणली पाहिजे. ती आणली असतां कोणासही सहज कळून येणारें आहे कीं, जे यहुदी उमराव आज सारे राज्यपुत्र हातांत वागवताहेत, आणि उद्यां पाहावें तों फूस कांहीं नाहीं, ते कसचे आमचे प्रभु! आतां बेकी आणि अंमळशानें फुकी ही ज्या सत्तेची शाश्वती तीस सत्ता कोण म्हणेल! तेव्हां लॉर्ड बीकन्स्फील्ड साहेब हेही उडाले! मग शेवटीं आमचें सरकार ठरलें तरी कोणतें? तर अवघ्या इंग्रेजी राष्ट्राचा अभिप्राय. या अभिप्रायानें बीकन्स्फील्ड यांस क्षणभर प्रभुत्व दिलें; त्यासरशीं चोहोंकडे लढाया सुरू झाल्या, दिल्लीचा सार्वभौमाभिषेक झाला, मुद्रणयंत्रावर मुद्रा बसली, उदीमपट्टी निघाली, इत्यादि प्रकार झाले. पुढें अफगाण लोकांनीं डोळे वटारून दोस्त इंग्लिश सरकारास आपल्या मुलखाच्या पार घालवून दिलें, आफ्रिकेच्या दक्षिण भागच्या लोकांनीं आमच्या सरकारच्या फौजांचा चांगला समाचार घेतला, जवळचें ऐर्लंड गडबड करूं लागलें, त्यासरशीं बीकन्स्फील्ड बोवांची सद्दी आटोपली, आणि लगेंच त्यांस बुक्का लागला! ते खालीं बसतांच त्यांचे प्रतिपक्षी ग्लाडस्टन् साहेब कंबर बांधून उठले, व त्यांनीं आपला डाव सुरू केला. सारांश, आमचें सरकार कोण याचा मुळींच पत्ता नाहीं म्हटलें असतां चालेल; अमक्या एका मनुष्याच्या किंवा मंडळीच्या खुषीवर आमचें बरेंवाईट करणें अवलंबून

---

* वरील पंचायतन कोणतें हें आमच्या वाचकमंडळीस थोडेंबहुत तरी माहीत असेलच. तें लॉर्ड लिटन्, सर रिचर्ड टेंपल्, सर जॉन् स्ट्राची, व मुंबईचे माजी गवर्नर सर बार्टल फ्रीयर, हें राजमंडळ होय. गेल्या दोन तीन वर्षांचा जो इतिहास लिहील त्यास वरील बड्या मंडळीचे पोवाडे किती गावे लागतील!

आहे अशांतला मुळींच प्रकार नाहीं. तर आंग्लभौमराष्ट्ररूप महोदधीवर जी कालवशात् यदृच्छेनें लाट उठेल तिजसरसें आम्हीं हेलकावत जावें हीच आमची राज्यव्यवस्था, व वरील लहर हेंच आमचें सरकार ! !

तर आमच्या देशाच्या राजसत्तेचें अशा प्रकारचें स्वरूप आहे. हें स्वरूप इकडील देशांत तर अगदींच अदृष्टपूर्व आहे हें सांगायाला नकोच. आतां कांहीं अंशीं तें आम्हांस हितावह आहे व कांहीं अंशीं गैरफायद्याचें आहे हें थोडा विचार केला असतां कोणासही दिसून येणारें आहे. एकच मनुष्य राज्यपदावर नियुक्त असला म्हणजे तो ज्या तऱ्हेचा मनुष्य असेल त्याप्रमाणें प्रजेचें हित किंवा अहित होण्याचा संभव असतो. थोरल्या माधवरावासारखा किंवा अकबर बादशाहासारखा प्रभु असला म्हणजे सारी प्रजा आबादानी भोगते व सुख पावते; तीच शेवटल्या रावबाजी-सारखी किंवा महंमद तघलखासारखी स्वारी सिंहासनारूढ झाली म्हणजे झाली ' बेबंद नगरी व झोटिंग पाच्छाई ' सुरू ! हा प्रकार प्रस्तुतसारख्या राज्यांत घडण्याचा संभव बहुधा नाहींच म्हटला असतां चालेल. कां कीं, वैसरॉय साहेब झाले तरी त्यांस कायद्याचें बंधन आहेच. इकडे दूरदूरच राहून चार दिवस घाशीरामी चालवण्याचा जर त्यांनीं घाट घातला, तर लागलींच त्यांस तिकडून थप्पड येईल. व वॉरन् हेस्टिंग्जची आठ वर्षें धिंड निघाली तशी शोभा निजधामास गेल्यावर होईल ती निराळीच ! बरें, हा इकडून फायदा पाहावा तर दुसरीकडून गैरफायदाही आहे. प्रति-निधिसाहेबांस एका बाजूनें जसा कायदा अडवतो, तशीच दुसऱ्या बाजू-नेंही त्यांस आडकाठी आहेच ! एडमंड बर्क किंवा परोपकारी जॉन हॉवर्ड जरी यदाकदाचित् गवर्नर जनरल झाला, तरी त्यास पदोपदीं वरीलच कायदा आडवा येईल. त्यानें असें मनांत आणलें, कीं मल्हाररावावर उगीच आरोप येऊन तो बिचारा गादीला मुकला, किंवा निजामचा वऱ्हाड प्रांत अडवून ठेवला आहे ही निवळ बळजबरी आहे, किंवा फुलर साहेबांनीं शिपायाचा खून केला तर त्यास जॉर्ज नेर्न्सच्या सोबतीला पाठविलें पाहिजे, अशा गोष्टी जर तो नुसत्या मनांत आणील तर तें सुद्धां वरील कायद्यास कितपत खपेल हें सांगायाला नकोच ! वरच्यासारखें ' ब्र ' तोंडांतून काढल्याबरोबर तिकडून लाटसाहेबांस चांगले खरपूस समज

येतील, कीं आपणांस तुकारामबोवांचा किंवा ख्रिस्त महाराजांचा अवतार बनायाचें असेल तर ती वेळ अद्याप आली नाहीं. पुढें होणारें प्रभु येशूचें सहस्रवार्षिक राज्य अद्याप यावयाचें आहे. त्या वेळेस तुमची पाहिजे तर नेमणूक करूं; सध्यां आपण एकाद्या टेंपल, फ्रीयर, किंवा आंडर्सन्‌सारख्या हुशार मनुष्याच्या स्वाधीन शिक्केकटार करून मार्गस्थ व्हावें हें बरें! तर याप्रमाणें आमच्या प्रस्तुत राज्यकर्त्यांची कारकीर्द व पूर्वींच्या राजेरजवाड्यांची कारकीर्द यांत महदंतर आहे.

३. आतां सांप्रतच्या सरकारानें या देशाच्या संबंधानें काय काय केलें पाहिंजे याविषयीं विचार करूं. हा विचार तीन प्रकारांनीं केला असतां चालेल; एक आमचें सरकार आपणास ख्रिस्ती म्हणवितें म्हणून, एक नीतिदृष्ट्या, आणि तिसरा सामान्य व्यवहाराच्या दृष्टीनें.

४. आमचें सरकार ख्रिस्तधर्मी ऊर्फ सद्धर्मानुयायी आहे हें आमच्या वाचकांस सांगणें नलगेच. ख्रिस्ती धर्माचा मुख्य सिद्धांत असा आहे कीं, जगांतील इतर धर्म सर्व खोटे आहेत, व खरी नीति काय ती त्यांतच सांगितली आहे; क्लैव साहेबांनीं जसे दोन तहनामे तयार केले होते, एक खरा आणि एक खोटा,—त्याप्रमाणें आकाशांतील प्रभूच्या स्वदस्तुरची सनद म्हटली म्हणजे ‘ पवित्रशास्त्र ’ हें होय, व वेदकुराणादि ग्रंथ तांबड्या तहनाम्यादाखल होत. आपल्या परम दयाळू महाराणीसाहेबांनीं सन १८५८ च्या जाहिरनाम्यांत आम्हांस असेंच कळविलें आहे कीं, वरील ईश्वरप्रणीत व मोक्षैकमार्गभूत धर्मावर त्यांचा पूर्ण निर्धार आहे. शिवाय दरवर्षी वरील पवित्र धर्माच्या प्रीत्यर्थ आमच्या खजिन्यांतले लाखों रुपये उडत असून मिशनरी ऊर्फ प्रेषित मंडळी तर शहरोंशहरीं गांवोंगांवीं रस्तोरस्तीं सद्धर्माचा प्रकाश पाडीत आहेत व त्यांचा महिमा गात आहेत हें सर्वांस मशहूर आहेच. तेव्हां आमचे राज्यकर्ते हे येशू महाराजांचे केवढे परमभक्त आहेत हें कोणालाही दिसणार आहे. आतां ही ख्रिस्तभक्ति आणि गेल्या शंभर सवाशें वर्षांतला येथील कारभार यांचा वस्तुतः पाहतां किती अत्यंत विरोध आहे हें कोणालाही सांगायाला नकोच. जो कोणी पवित्रशास्त्रांतर्गत येशूचरित्र आणि क्लैव, हेस्टिंग्स्, डालहौसी, टेंपल या चतुष्ट्याची चरित्रावली वाचील आणि दोहोंची परस्पर तुलना करील, त्यास

वरील मंडळीची खिस्तलोकीं काय संभावना होण्यासारखी आहे हें समजण्यास फार आयास पडतील असें नाहीं. त्याप्रमाणें रे० मिचेल, टेलर वगैरे मंडळी हिंदु धर्माच्या संबंधानें असंबद्ध प्रलाप करण्यांत जो व्यर्थ कालक्षेप करते, तोच जर पवित्रशास्त्रांतलें एकेक वचन घेऊन त्याचें स्पष्टीकरण हिंदुस्थानच्या इतिहासांतून करूं लागेल तर केवढीं मनोरंजक व्याख्यानें होतील बरें! पण याविषयीं तूर्त आम्हांस विचार कर्तव्य नाहीं. 'गतं न शोचामि कृतं न मन्ये' या न्यायास अनुसरून मागें होऊन गेलेल्या गोष्टींचा काथ्या कुटण्यांत कांहीं हाशील नाहीं. क्लैव, हेस्टिंग्स् वगैरे मंडळीविषयीं त्यांच्या समकालीनाचे जे अभिप्राय होते ते खरे असोत, *

---

* क्लैवच्या संबंधानें जॉन्सनच्या भाषणांत पुढील उल्लेख आहे:—

" The ingenious Mr. Brown told me, that he was once at the seat of Lord Clive, who had returned from India with great wealth; and that he showed him at the door of his bed-chamber a large chest, which he said he had once had full of gold: upon which Brown observed, ' I am glad you can bear it so near your bed-chamber ! "

हेस्टिंग्स्वर बर्कनें केलेला भडिमार तर प्रसिद्धच आहे:—

" At length the orator concluded. Raising his voice till the old arches of Irish oak resounded, "Therefore," said he, "hath it with all confidence been ordered by the Commons of Great Britain, that I impeach Warren Hastings of high crimes and misdemeanours. I impeach him in the the name of the Commons House of Parliament, whose trust he has betrayed. I impeach him the name of the English nation whose ancient honour he has sullied. I impeach him in the name of the people of India, whose rights he has trodden under foot, and whose country he has turned into a desert. Lastly, in the name of human nature itself, in the name of both sexes, in the nme of every age, in the name of every rank, ' I impeach the common enemy and oppressor of all ! "

—Macaulay's Essay on Warren Hastings.

किंवा मेकॉलेप्रभृतींनीं त्यांस जागोजाग जें प्रेमालिंगन दिलें आहे तें यथार्थ असो; तूर्तच्या पक्षीं आम्हांस दोन्हीही लेख सारखेच होत. यास्तव ह्लीं आपण असें समजूं कीं, ' इसापनीतींत ' त जुपिटरानें जसा एक भला मोठा ओंडा अचानक आकाशांतून खालीं सोडून दिला, आणि हा तुम्हांला राजा घ्या असें बेडकांस सांगितलें, त्याप्रमाणेंच आकाशांतील प्रभूनें आमचे सांप्रतचे प्रभु आम्हांकरतां पाठवून दिले आहेत. अशी कल्पना केली असतां प्रस्तुत सद्धर्मी राज्यकर्त्यांनीं येथील सत्ता कोणत्या तऱ्हेनें वहिवाटली पाहिजे हें पाहूं.

येशू ख्रिस्त व त्यानें स्थापलेला धर्म याविषयीं आमच्या वाचकांस कितपतशी माहिती असेल हें आमच्यानें सांगवत नाहीं. कां कीं, एक तर इंग्रेजी शाळांतून व विद्यालयांतून तर त्याविषयीं कधीं फार करून नांवही काढीत नाहींत; व एतद्देशीय भाषांतून वरील विषयावर म्हणण्यासारखा एकादाही ग्रंथ झाला असेल असें म्हणवत नाहीं. आजपर्यंत पाद्रीखात्यानें येथें आपल्याकडून अट्टाहास करून पुस्तकांच्या, शाळांच्या व व्याख्यानांच्या द्वारें सदरील विषय लोकांच्या मनांत आणून देण्याचा पुष्कळ यत्न केला आहे हें खरें; पण त्यांच्या तऱ्हेवाईक पद्धतींमुळें प्रस्तुत धर्म हें कांहीं तरी खूळ आहे इतकी मात्र लोकांची समजूत दृढ होऊन बसली आहे. यास्तव प्रस्तुत विषयाच्या अनुषंगानें येथें इतकें सांगतों म्हणजे बस आहे कीं, सदरील धर्माचा पैगंबर हा युधिष्ठिर, बुद्ध, साक्रेटीस, तुकाराम या लोकांच्या कोटींतला होता. अशा विभूति ' भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम् ' या महाकविवचनास अनुसरून या भूतलावर कधींमधीं अवतीर्ण होत असतात; तर तोच मासला परम शठ जे यहुदी लोक त्यांच्यांत ' भांगेंत तुळस ' या न्यायानें वरील महापुरुषाच्या रूपानें दृष्टीस पडला. त्यानें तीसपासून तेहेतीस वर्षांपर्यंतच काय तो धर्मोपदेश केला, पण त्या तीन चार वर्षांत पेरलेल्या बीजाचेंच फळ येवढ्या प्रचंड व वैभवयुक्त रूपानें साऱ्या पृथ्वीभर आज कित्येक शतकें दृष्टीस पडत आहे. आतां वरील उपदेश काय होता हें जर पाहिलें, तर सर्वांवर दया करावी, प्रत्यक्ष शत्रूंचीही क्षमा करून त्यांजबद्दल ईश्वरापाशीं करुणा भाकावी, एका गालावर मारली असतां दुसरा

पुढें करावा, सारें मनुष्यमात्र हीं परमेश्वराचीं लेकरें होत यास्तव अमुक मंडळी देवाची लाडकी आणि अमुक नावडती या कल्पना कुत्सित होत, याप्रमाणें अत्यंत सात्त्विकपणाचा तो होता. तुम्ही आपल्या देशांतून उठा आणि परमुलखावर जाऊन धाड घाला, ज्यांनीं तुम्हांस कधीं काडीचाही उपद्रव दिला नाहीं त्यांचे मुलूख काबीज करा, ज्यांनीं सालसपणानें तुम्हांस आश्रय दिला त्यांच्यावर उठून अरेरावी करा, रणवाद्यें वाजवा, जयस्तंभ उभारा, खोट्या सह्या करा, दुसऱ्यांच्या बायका उपटा, दिवसां-ढवळ्या दरवडे घाला, वाटेल त्यास उचलून फाशीं द्या, यांपैकीं एकही प्रकार 'शुभवर्तमानां' त आढळत नाहीं. वरील सर्व प्रकार मुसल-मानांच्या पैगंबरानें केलेल्या उपदेशास कांहींसे साजणारे आहेत; कां कीं जरी वरील घोर कर्मांचा त्यानें साक्षात् उपदेश केला नाहीं, तरी तर-वारीच्या लखाखीनें सद्धर्माचा प्रकाश साऱ्या दुनियेवर पाडण्याची त्यानें आज्ञा दिली असल्यामुळें एकंदरींत तोच पर्याय झाला. पण बिचाऱ्या येशूनें तीही आज्ञा आपल्या शिष्यांस दिली नाहीं, व स्वतः तरवारीस तो कधीं शिवलाही नाहीं. उलटा त्याच्या चरित्रकारांचा तर असा उल्लेख आहे कीं, त्यास सुळावर चढवतांना त्यानें अत्यंत थोरपणाची गंभीरवृत्ति धारण करून लोकांच्या अज्ञानाबद्दल कारुण्य प्रगट केलें, आणि त्यांच्या कल्याणार्थ आपल्या पित्यापाशीं मनोभावेंकरून प्रार्थना केली ! मग हें सर्व जर खरें आहे, तर गुरूंत व शिष्यांत हें केवढें महदंतर ! आमची तर पक्की खातरी आहे कीं, हेस्टिंग्स्, डालहौसी, लिटन्, टेंपल, फीयर अशासारख्यांस खिस्ताच्या शिष्यांत सामील करणें म्हणजे 'वेषधारी लांडग्यांस' मेंढ्यांत गणणें, किंवा डंकनरोडवासी अखंड सुवासिनींचे 'सीता मंदोदरी तारा' या वर्गांत परिगणन करणें यासारखेंच होय ! 'पवित्रशास्त्र' म्हणजे 'इसापनीति' जर नसेल, आणि 'आकाशांतील बापा'नें जर खरोखरच सिनिया पर्वतावर मोश्याला 'आज्ञादशक' दिलें असेल, तर वरील खाशा मंडळीची व त्यांच्या लक्षावधि देशबंधूंची इतउत्तर काय व्यवस्था होणारी असेल ती असो ! ! ¶

---

¶ "Sydney Smith well remarked, 'If you wish to convert the heathen, you must first burn your Bibles which,

[ पुढें चालू ]

तर ज्या अर्थी आमचें सरकार आपणास खिस्ती म्हणवितें, त्या अर्थी वरील धर्माप्रमाणें एक आणा तरी त्याचें आचरण येथें उतरायला पाहिजे हें उघड आहे. येवढा हिंदुस्थान देश आम्हीं इतक्या थोड्या काळांत व इतक्या अल्प आयासानें क़ाबीज केला हें आमचें सामर्थ्य नव्हे, तर परमेश्वरानें आपले अचिंत्य हेतु सिद्धीस नेण्याकरतां हा येवढा खाऊ आमच्या हातावर अचानक आणून ठेवला, याप्रमाणें आज कितीक दिवसांपासून पाश्चात्यांनीं ज्या लक्षवेळां उक्ति प्रगट केल्या आहेत त्या जर केवळ वायफळ नसतील व जगाच्या समाप्तीनंतर पितापुत्रांचें मोठें जगड्व्याळ कमिशन बसून त्यांत सर्वांचा निवाडा होणें आहे हा जर आमच्या सद्धर्मी राज्यकर्त्यांस निवळ फार्स वाटत नसेल तर आमच्या देशाचा कारभार आजपर्यंत ज्या तऱ्हेनें चालला, आणि या घटकेला जसा चालला आहे ती तऱ्हा त्यांनीं अगदीं टाकून दिली पाहिजे. जरी घटकाभर असेंही मानलें, कीं आमचा कारभार करण्याकरतां सदरील पाश्चात्य मंडळीस आकाशांतील प्रभूनें मुनीम नेमून ठेवलें आहे, तरी ही मुनीमी ते कोणत्या रीतीनें बजावतात हें पाहावयास नको काय ? आमच्याकडे मुकत्यारी दिली आहे असें तोंडानें म्हणून 'इसापनीती' तल्या खवाखाऊ वानराप्रमाणें जर आमच्या सरकारनें कृति केली तर चालेल काय ? आम्ही भरतभूमीचीं वेडीखुळीं लेकरें यांच्या लक्षांत जरी आम्हांवर नेमलेल्या मुनीमांची लबाडी आली नाहीं, तरी सर जॉन् स्ट्राची आपला अक्कलआढावा देवबापापासून लपवूं शकतील असें त्यांस वाटतें काय ? गवर्नर साहेबांनीं सात सेक्रेटरी-

---

[ मागील पानावरून पुढें चालू. ]

instead of exhibiting you as Christians, will only prove you to be impostors.' At another period Burke remarked, 'The English who double the cape, generally contrive to unbaptise themselves.' Had Burke lived to see the annexation of Oudh, he would perhaps have criticised the morals of a government which based its acts of spoliation and violence on the requirements of the Christian religion."

The way to regain India.

यटांच्या आंत जरी आपलें 'सीक्रिट डिपार्टमेंट' (गुपचुपीचें खातें) लिहून ठेवलें, तरी तें येशूला व त्याच्या बापाला काय होय? त्याचा छडा त्यांस लागणार नाहीं असें होईल काय? आंतां आमच्या राज्यकर्त्यांस असें वाटत असेल, कीं आम्ही धर्मकृत्याकडे हिंदुस्थानच्या खजिन्यांतले लाखों रुपये प्रतिवर्षी उडवतों, जिकडे तिकडे चर्च व चापलन् यांची गर्दी आम्हीं करून दिलीच आहे, शिवाय आमच्या आश्रयानें व मदतीनें शेंकडों मिशनें येथें येऊन उतरलीं आहेत व प्रभूच्या नामाचा गजर त्यांच्या मुखें सदोदित चालूच आहे, शिवाय मूर्तिपूजकांच्या देवस्थानांवर आम्हीं डोळा ठेवला असून खऱ्या देवाच्या सान्निध येण्याबद्दल लोकांस आमचें हस्तें-परहस्तें प्रोत्साहन चालूच आहे,—मग इतक्या परींनीं प्रभूची प्रसन्नता संपादन करण्याविषयीं आम्ही सदोदित झटत असतां आणखी तें काय पाहिजे? असें आमच्या सरकारचें मनोगत असेल तर मग आमचें कांहीं बोलणें नाहीं. आमचे शेवटचे राजमणि बाजीराव साहेब यांचाही खाक्या अशाच मासल्याचा होता. वडिलांच्या हातून चुकून गफलतीनें गोत्रजहत्या घडली, तर त्यांनीं 'बापसे बेटा सवाई' हा न्याय अमलांत आणून प्रत्यक्ष विठोबास खडा साक्षिदार करून ठेवून ब्रह्महत्येचा डंका स्वपूर्वजार्जित 'ब्रह्मबाच्छाही' भर वाजवून दिला, आणि सारी पुण्यनगरी रांडवाडा करून सोडून आपली पवित्र ज्ञाति भ्रष्ट करविली, आणि या सर्व महाकृत्यांबद्दल चित्रगुप्ताच्या वहीवर दुसऱ्या बाजूला जमा काय,—तर ब्राह्मणभोजनें, नऊ लाख आंबराई, विठोबाला पोषाख, गंगेला सबंध पेनशनाचें समर्पण, इत्यादि! तर 'नागेश्वराला नागवून सोमेश्वराला वात लावायाची' यापेक्षां उंची दराची धर्मवासना जर आमच्या राज्यकर्त्यांच्या ठायीं वसत असेल, तर त्यांनीं आपली खिस्तनिष्ठा सध्यांपेक्षां फार निराळ्या तऱ्हेनें प्रगट केली पाहिजे हें उघड आहे.

हें एक प्रकरण झालें. वस्तुतः पाहतां यांत मोठासा अर्थ आहे असें नाहीं. कां कीं आमच्या राज्यकर्त्यांची नाटकी भाषा ज्यास कळली नाहीं त्यास मात्र राणीसाहेबांचा जाहिरनामा किंवा फ्रीयर साहेबांची खिस्तभक्ति हीं फसवूं शकतील. बाकी वस्तुतः पाहतां इंग्रेजी आभार (thanks), इंग्रेजी खेद (regret), इंग्रेजी आनंद (pleasure) वगैरेंत जितपत अर्थ असतो,

तितपतच ' आमची ख्रिस्ती धर्मावर पूर्ण निष्ठा आहे ' इत्यादि तिल-गुडोपम कर्णमधुर वाक्यांची मीमांसा करावयाची. सणावाराच्या दिवशीं जसें घरांतील वस्त्रप्रावरण व लेणें सगळें काढून आंगावर घालण्याची सर्वांची रीत आहे, त्याप्रमाणेंच दरबारी भाषणांतून व जाहिरनाम्यांतून फुकाची ख्रिस्तनिष्ठा मिरविण्याची साऱ्या पाश्चात्य राष्ट्रांची चालच आहे. बिचारा येशू ख्रिस्त दोन हजार वर्षांपूर्वी हालअपेष्टा होऊन मरण पावला; त्याच्या नांवावर आज हवें त्यानें हवें तें कृत्य करावें. तो आकाशांतून उतरून कोणाचा हात धरायला येतो आहे असें कांहीं नाहीं, किंवा बीकन्सफील्ड महाराज व त्यांचें पंचायतन यांच्या ' सीक्रेट डिपार्टमेंटां 'त तो थोडकाच डोकावून पाहतो आहे, मग त्याचें फुकाचें नांव घेऊन त्याखालीं जर हवें तें दडपून द्यावयाला सांपडतें आहे तर कशाला कमी करा ! पंढरपूरच्या विठोबानें दामाजीपंताबद्दल जशी एकदम भरपूर रसद पोंचवून दिली, त्याप्रमाणें वरील प्रभूनें आपल्या रक्तानें आपल्या क्रोधाविष्ट पित्यास संतुष्ट करून पुढच्या व मागच्या सर्व पापांबद्दल साऱ्या मनुष्यजातीची हमी भरून भरभक्कम ऐवज स्वर्गीच्या दरबारीं एकदम पटवून दिला आहे. तेव्हां आतां ख्रिस्तभक्तांच्या आचरणांत वैगुण्य काढण्याची प्रत्यक्ष आकाशांतील बापाचीही पुण्याई नाहीं ! !

५. दुसरा विचार नीतीचा. ' नीति ' शब्दाचा येथें संस्कृत अर्थ घ्यावयाचा नाहीं. S तर ' न्यायीपणा, ' ' रास्तपणा ' या प्राकृत अर्थी

---

S संस्कृत भाषेंत ' नीति ' शब्दाचा अर्थ ' राजनीति ' हा होय. व राजनीति म्हणजे दुसऱ्याचें पागोटें घेण्याची विद्या. महाभारतांतील कणक-नीति व मुद्राराक्षसांतील ' मंत्रिमुख्या 'ची नीति आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. भर्तृहरीच्या नीतिशतकांतील राजनीति-विषयक श्लोक पुढें भाषांतररूपानें सादर करतों, त्यावरूनही प्रस्तुत विषयाचें स्वरूप लक्षांत येईलच:—

**केव्हां सत्य वदे वदे अमृत ही केव्हां वदे गोड ही**
**केव्हां अप्रिय ही दयालु हि असे केव्हां करी घात ही ।**
**जोडी अर्थ हि जे यथेष्ट समयीं कीं वेच्च हीं आदरी**
**ऐशी हे नृपनीति भासत असे वारांगनेचे परी ॥**

**वामन.**

ल्याचें ग्रहण करावयाचें. या नीतीविषयींही आमच्या राज्यकर्त्यांचा पाहिल्यापासून मोठा बाणा आहे. मेकॉलेसाहेबांच्या एतद्देशाविषयक दोन निबंधांत वरील प्रकरणीं तर मोठेंच विवरण केलेलें आहे, आणि इंग्रेजी लोकांचा नीतिमत्तेंत साहेबांनीं पहिला नंबर बिनदिक्कत ठोकून दिला आहे ! ऽ शिवाय नीतीचीं म्हणजे सदाचरणाचीं तत्त्वें खिस्ती धर्म प्रगट होण्यापूर्वीं या भूतलावर बहुधा अज्ञातच होतीं, तीं वरील उजेड आकाशांतील बापानें पाडल्यावर काय तीं जगांत पूर्णपणें प्रगट झालीं. ही स्वधर्माची पोकळ फुशारकी सहस्रशः पाश्चात्य ग्रंथकारांनीं आजपर्यंत गाइली आहे. + तर आतां केवळ न्यायाच्या दृष्टीनें पाहतां आमच्या देशांतील कारभार कसा काय चालला आहे तो पाहूं.

ऽ अंक ३० पृष्ठ १९ पहा.

+ वरील प्रौढीवादाचें निरसन पुढील उताऱ्यांवरून होण्यासारखें आहेः—

" That the system of morals propounded in the New Testament contain no maxim which has not been previously enunciated. and that some of the most beautiful passages in the Apostolic writings are quotations from pagen authors, is well-known to every scholar; and so far from supplying, as some suppose, an objection against Chirstianity, it is a strong recommendation of it, as indicating the intimate relation between the doctrines of Christ and the moral sympathies of mankind in different ages. But to assert that Christianity communicated to man moral truths previously unknown, argues, on the part of the asserter, either gross ignorance or else wilful fraud !

Buckle's History.

" I have just read these words in a pielece of declamation in fourteen volumes, entitled, The History of the Lower of Empire–"The chiristians had a morality, but the Pagans had none."

Oh. M. Le Beau ! author of these fourteen volumes, where did you pick up this absurdity ? what becomes of the morality of Socrates of Zeleucus, of Charondas, of Cicero, of Epictetus, and of Marcus Aurelius ?

Voltaire's Philosophical Dictionary ( Morality. )

राजानें प्रजेशीं यथान्याय व्यवहार करावयाचा म्हणजे काय हें प्रायः स्पष्टच आहे. प्राच्य देशांत राजाविषयीं ज्या समजुती आहेत, कीं राजा हा साऱ्या प्रजेचा मालक आहे, व तो काय पाहिजे तें करील, त्यास विचारण्याचाही कोणाला अखत्यार नाहीं, या खऱ्या असोत किंवा प्राचीन काळीं कांहीं पाश्चात्य राष्ट्रांत राजाविषयीं ज्या समजुती असत, व आतां तर प्रायः सर्वत्र आहेत, कीं राजा हा केवळ प्रजेचा चाकर आहे, आणि तो जर चुकेल तर त्यास विचारण्याचा तर काय, पण शासन करण्याचाही अधिकार प्रजेस आहे; हीं मतें यथार्थ असोत. दोहोंतील आशय मिळून सामान्यतः एकच आहे. इकडे राजाविषयीं जरी पूज्यभाव फार आढळतो तरी तो जर दुर्वृत्त निघाला तर त्यास कोणी नांवें ठेवीत नाहीं किंवा त्याशीं विरोध करीत नाहीं, असें नाहीं. राघोबादादा येवढा जोरावर होता, पण त्याची कोणी डाळ शिजूं दिली नाहीं, व ज्या चांडाळणीस पुण्यास राज्य करावयाचें होतें तिच्या कपाळीं वैधव्यदशेंत कारागृहवास मात्र आला; त्याप्रमाणेंच दोघांच्या पोटीं जे कुलदीपक जन्मास आले त्यांसही शेवटपर्यंत कोणींही बरें म्हटलें नाहीं. आमच्या हल्लींच्या सरकारानें त्यास अपमतलबासाठीं हातीं धरलें म्हणून, नाहीं तर ऐन पुण्यावर लढाई ठोकून जो बहादर चढून आला होता त्याच्या हातानेंच बहुधा रावबाजीच्या कारकीर्दीची अखेर होण्याचा रंग आला होता! मुसलमानांच्या इतिहासांतही हुमायुनास पदच्युत करून शेरशाहानें गादी बळकावल्याचीं वगैरे उदाहरणें आहेतच. तेव्हां इकडे तरी लोकांचा अंतर्गत अभिप्राय हाच आहे कीं, राजाकडे जरी सर्व अधिकार सोंपवून दिलेला आहे तरी तो जोंपर्यंत त्याचा यथार्थ विनियोग करील तोंपर्यंतच. वरील अधिकाराच्या जोरावर जर तो प्रजेस अतिशयित गांजूं लागला, तर मूळचा पूज्यभाव तेव्हांच नष्ट होऊन जातो. तर कोणत्याही राष्ट्रांत पाहिलें तरी राजाविषयींच्या कल्पना बहुधा सारख्याच आहेत. त्या ह्या कीं, त्यानें प्रजेचें रक्षण करावें, तीस सुमार्गास लावावें, देश समृद्ध करावा, सर्व लोक एकमेकांस उपद्रव न करतां जेणेंकरून आनंदानें व संतोषानें राहतील अशा तजविजी कराव्या, इत्यादि. राज्यधुरेचा ज्यानें अंगीकार केला, त्यानें वरील सारी जबाबदारी आपल्या अंगावर घेणें जरूर आहे. ती न घेतां प्रभुत्वापासून मिळणाऱ्या सुखोपभोगाची व मानसन्मानाचीच मात्र जो अपेक्षा करील

तो प्रजारक्षक नव्हे, तर प्रजाभक्षक होय. जसा सिंह हा पशूंचा राजा, किंवा गरुडपक्षी हा पक्ष्यांचा राजा, तसाच वरील नरपति होय; म्हणजे सिंहाच्या आधिपत्याचा जसा इतकाच अर्थ, कीं त्यानें आपल्या प्रजेवर झाप घालून हवें त्यास वाटेल तेव्हां फाडून खावें, व गरुडपक्षानेंही तोच प्रकार दुर्बळ पक्ष्यांवर निःशंकपणें करावा, त्याप्रमाणेंच वरच्यासारख्या नृपाधमानें पाहिजे त्यास बुचाडावें व पाहिजे तिजवर बलात्कार करावा येवढाच त्याच्या राजेपणाचा अर्थ ! पण जो आपणास सुज्ञ म्हणवतो त्याच्या हातीं सत्ता आली असतां तिचा तो वरच्याप्रमाणें कधीं दुरुपयोग करीत नाहीं. मग आमचें सरकार जर आपणास शहाण्यांतलें शहाणें म्हणवितें, व ख्रिस्ती धर्मांतील पवित्र आचरणाचा बाणा बाळगतें, तर त्याची प्रजानियमनाची पद्धति तर किती निर्दोष व स्तुत्य असावी ! पण लिहिण्यास दिलगीर वाटते कीं पहिल्यापहिल्यानें म्हणजे अव्वल इंग्रेजींत जरी न्यायीपणाचा व दयाळूपणाचा प्रकार या देशांत पुष्कळ दृष्टीस पडत गेला, तरी आतां हळू हळू वरील दोन्ही वृत्तींचा ऱ्हास होत जाऊन प्रभुत्वाचीं खरीं लक्षणें दिवसेंदिवस विरलतरतेनें आढळूं लागलीं आहेत. मुंबईचे पहिले गवर्नर अल्पिष्टन् साहेब यांच्यांत व परवांची राजमूर्ति टेंपल्साहेब यांच्यांत केवढें जमीनअस्मानचें अंतर ! सत्तावीसचे कायदे आणि आलीकडचे एकेक दिव्य आक्ट यांत केवढी थोरली तफावत ! सती, ठगी, बालहत्या वगैरेंबद्दल हळहळणारी व बंदोबस्त करणारी बेंटिक्प्रभृति मंडळी कोणीकडे, आणि खुद्द कलेक्टरास दुष्काळांत लोक मरतात येवढा उल्लेख केल्याबद्दल तावडतोब अर्धचंद्र देणारे व लक्षावधि प्रजा मरणाच्या दारीं बसली असतां दिल्लीस दिवा लावणारे बीकन्स्फील्ड्प्रमुख महापंचायतन कोणीकडे ! एक ना दोन, ज्या ज्या गोष्टींत पाहावें तींत तींत पंचवीस तीस वर्षांमागच्या स्थितीला व आज चोहोंकडे आढळणाऱ्या स्थितीला कांहींच मेळ दिसून येत नाहीं. हल्लीं आमच्या ख्रिस्ती व नीतिमान् म्हणविणाऱ्या राज्यकर्त्यांचें राज्यसूत्र हें एक जबरदस्त आढळतें कीं, जेणेंकरून द्रव्यप्राप्ति होईल तो उपाय कसाही असला तरी अवश्य करावा. राजेरजवाड्यांशीं झालेले तह, आज कितीक काळापासून चालत आलेले लोकांचे हक्क, आपण स्वतः वेळोवेळीं प्रजेस दिलेलीं वचनें, वगैरेंची व्यवस्था

आमचें सार्वभौम सरकार मनास मानेल त्या रीतीनें करीत असतें. जी गोष्ट त्यांच्या पथ्यावर पडेल व जेणेंकरून गोऱ्या लोकांच्या पोतड्या भरतील तो कायदा ! एकंदरींत पाहतां आलीकडच्या काळांत आणि त्यांतून दिल्लीपदावर बादशाही गाजल्यापासून आमच्या पाश्चात्य प्रभूंनीं जो वर्तनक्रम सुरू ठेवला आहे तो बहुतेक अंशीं केवळ अन्यायाचा आहे, व ही गोष्ट दिवसेंदिवस येथें आबालवृद्धांच्याही प्रचीतीस येत चालली आहे. यापूर्वी सारे लोक मोगलाईस व पेशवाईस नांवें ठेवून इंग्रेजी राशियतीची जी तारीफ करीत असत ती स्थिति आतां गेली. आतां अगदीं उलट प्रकार होत चालला आहे असें म्हटलें असतांही चालेल. पूर्वीची तिस्मारखानी व पेंढारशाही सुद्धां पुरवली, पण हा इंग्रेजी चरक फार भयंकर, असें आलीकडे सर्वांस वाटूं लागलें आहे !

६ येथवर प्रस्तुत विषयाचा दोन गोष्टींच्या संबंधानें विचार झाला. आतां तिसरा प्रकार नुसता जगांतील व्यवहार येवढ्याच दृष्टीनें प्रस्तुत राज्यरीतीविषयीं विचार करूं. हा विचार असा कीं, आमचें सरकार खिस्ती धर्म झूट समजून यास मुळींच मानीत नाहीं, व नीतीसही बिलकूल ओळखीत नाहीं, असें गृहीत धरलें असतां आमच्या प्रस्तुतच्या स्थितीवरून काय विचार मनांत येण्यासारखे आहेत तें पाहूं.

वरील विवेचन करतांना असें मनांत आणलें पाहिजे कीं हा विस्तीर्ण देश ही एक दुभती गायच आमच्या प्रभूंस सांपडली आहे. वरील उपमा जरी विषयनिरूपणार्थ येथें यदृच्छेनें घेतली आहे तरी अनेक अंगांनीं तिच्या ठायीं यथार्थत्व किती आहे हें बहुधा कोणाच्याही लक्षांत येऊन चुकणार आहे. सहनशीलपणा, संतोषवृत्ति, उपयुक्तत्व, इत्यादि गुणांत आमच्या राष्ट्राचें व वरील पशुविशेषाचें साम्य किती उत्कृष्ट जुळतें हें सांगावयास नकोच ! त्याप्रमाणेंच गाय कितीही सौम्य असली तरी समयविशेषीं ती जशी लाथ उचलायाला सोडीत नाहीं, त्याप्रमाणेंच या आर्यभूमिधेनूचाही अनुभव तिच्या परराष्ट्रीय धन्यांस आहेच. नुकती परवां जेव्हां ती एकाएकीं बिथरून गेली व दावें तोडून शिंगें मारायाला लागली तेव्हां तीस चुचकारतां चुचकारतां व पुनः ताब्यांत आणतां आणतां कोण अट्टाहास झाला ! आतां आलीकडे आमच्या शहाण्या प्रभूंनीं अधिक बंदोबस्त करून तिचे पायच बांधून टाकले आहेत व मुसकटही

असें आवळून टाकलें आहे कीं, तिचा हंभारवही बाहेर न फुटे, हें खरें; त्याप्रमाणेंच परवांच्या महाप्रलयांत जेव्हां लक्षाहुतीवर लक्षाहुति होत होत्या तेव्हां इतके वत्स पटापट प्राण टाकतांना पाहूनही तिनें मुकाट्यानें काय दुःखाश्रु जागच्या जागीं गाळलेले असतील ते असतील; बाकी पूर्वी विश्वामित्राच्या कारकीर्दीत तिचा एक वत्स बांधून चालविला असतां तिनें जें अकाण्ड-तांडव केलें, आणि—

**पकडो लियो हकालो बे बिसवामितर भाग जावे गा।**

अशी गर्जना करणाऱ्या मंडळीच्या हातून त्याच्या सैन्याची एका क्षणांत वाताहत करून सोडली, तें तेज हल्लीं तिच्यांत कांहींही उरलें नाहीं. बिचारी करते काय ? एकेक धुरंधर के. सी.एस्.आय्.(क.स.इ.), नामदार टेंपल साहेब, नेकनामदार लिटन साहेब, आणि या साऱ्या शौंडिक मंडळीचे सद्गुरु पुण्यप्रताप माजी बीकन्स्फील्ड बोवा, अशांच्या पुढें तिचा काय पाड ? नाहीं म्हणायाला आतां एक उरलें आहे, कीं तिनें प्राच्य आर्यांच्या समजुतीप्रमाणें क्षीरसागराकडे पुनः धाव घेऊन परमेश्वरापाशीं करुणा भाकावी, किंवा पाश्चात्य आर्यांच्या मताप्रमाणें आकाशांतील बापाच्या नांवानें तरी हंबरडा फोडावा; म्हणजे त्याचा पुत्र तरी आपल्या लाडक्या भक्तमंडळीच्या हृदयांत वास करणाऱ्या पवित्र आत्म्यास जरा जागें करून सैतानप्रयुक्त जें पूर्वोक्त मूर्तित्रय त्यानें दिलेल्या दुर्धर पीडेचा कांहीं तरी उपशम होईल !

असो; तर या देशांतून निघेल तितका पैसा काढायाचा व आपली भर करून घ्यावयाची एवढ्याच दृष्टीनें जरी पाहिलें तरी आमच्या राज्यकर्त्यांनीं ‘ इसापनीती ’तील ‘ मनुष्य आणि हंसी ’ ही तरी गोष्ट चांगली मनांत आणावी. आमच्या हिंदुस्थानाची पहिल्यापासून सुवर्णभूमित्वेंकरून प्रख्याति आहे खरी; पण ज्या हंसीपासून प्रतिदिवशीं वरील अमूल्य द्रव्याची निष्पत्ति होणार ती जर जाग्यावर असेल तर सगळ्या गोष्टी ! इसापकल्पित शहाण्या मनुष्यानें सगळा लग्गा एकदम हातीं लागावा म्हणून जसा सुरीचा प्रयोग केला, किंवा गाय मोठी दुभती असली म्हणून दुधाच्या जागीं रक्त येईपर्यंत जर दोहनाचा सपाटा लावला, तर कांहीं उपयोग होणार आहे काय ? अर्थात् कांहीं नाहीं. हंसीचा धनी

ती मेल्यावर निराश होत्साता जसा हाका मारीत बसला, तशीच अवस्था व्हावयाची. तर आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंनी निदानपक्षीं येवढी तरी सावधगिरी ठेवावी म्हणजे झालें. सारा देश रंक होऊन बसल्यावर मग आमच्या दयाळू सरकारानें दररोज एक नवा कर बसविला तरी कांहीं चिंता नाहीं; व म्यांचेस्टरवाल्याकडे या गरीब प्रजेस नित्य वस्त्रदान केल्याबद्दल वैसराय् साहेबांनीं प्रतिवर्षी काबूलच्या माजी अमीराप्रमाणें खंडणी रवाना केली तरी सुद्धां हरकत नाहीं. परवां परत दयाळू टेंपलसाहेबांच्या राजवटींत या मुलखांतली लाखों प्रजा अन्न अन्न करीत जेव्हां रानोमाळ भडकत सुटली, तेव्हां अवघ्या भूमीचें दान तिनें आपल्या कृपावंत प्रभूस केलें नाहीं काय ? मागें पेंढाऱ्यांच्या अमदानींत फार तर आमचे लोक एका गांवांतून उठून दुसऱ्या गांवांत जात किंवा डोंगरकपारींत दडून बसत. पण अमळशानें वादळ शांत झालें कीं, सारा गांव पुनः पहिल्या-प्रमाणें गजबजलेला दिसत असे. पण हल्लींच्या सुधारलेल्या इंग्रेजी राज्यांत मागच्या वेडगळ प्रकारांपैकीं एकहि आढळावयाचा नाहीं. टेंपल साहेबांनीं खुदावंत होऊन खुदाच्या मुलाखतीला आपल्या मुलखांतील लाखों प्रजा एकदम रवाना करून दिली. परलोकचे दरवाजे खुले करून न येत्या गांवाला जाण्याचा हमरस्ता साहेब महसूफांच्या राशियतांत जसा धडक वाहत होता तसा मागें कधींही वाहिला नसेल, व पुढेंही देव करो आणि कधीं न वाहो ! मग अशा राष्ट्रविप्लवाच्या वेळीं सारी जमीनची जमीन जरी सरकारानें घशांत घातली तरी कांहीं किफायत आहे काय? तर आमचें राष्ट्र पिळून काढून त्यास भुकेबंगाल करून सोडण्यापूर्वी ही एक मोठी गोष्ट आमच्या राज्यकर्त्यांनीं मनांत आणली पाहिजे. दुसरी अशी कीं, कोणतेंही राज्य प्रजा संतुष्ट आहे तोंवरच सुरळीत चालत असतें; सारे लोक विथरून जाऊन त्यांच्या पोटांत जर सरकाराविषयीं दिवसेंदिवस अढी राहिली, तर वेळेनुसार कोणत्या थरावर गोष्ट जाईल याचा नेम नसतो. त्यांतून जेथें कोट्यावधि लोकांत थोड्याथोडक्या निवडक मंडळीनें अंमलदारी चालावयाची आहे तेथें तर निरंतर किती जपून वागणें जरूर आहे हें सांगायाला नकोच. त्यांतून असेंही करतां कधीं कांहीं गडबड न होतां इंग्रेज लोकांचें प्रभुत्व जरी येथें शतकांचीं शतकें असेंच राहिलें

आणि आम्ही अगदीं निःसत्त्व होऊन जाऊन निवळ मेंढ्या बनून गेलों तरी इकडूनही इंग्लंड देशाचें म्हणजे मोठें गौरव होईल असा प्रकार नाहीं. अमेरिकन इंडियन लोकांच्या संबंधानें स्पेन देशास जो अक्षय्य कालिमा लागून राहिला तोच इतिहासांत आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंवरही राहील. जें राष्ट्र इंग्लिश लोकांचे पाय येथें लागण्यापूर्वीं लक्ष्मी, सरस्वती, अन्नपूर्णा, वीरश्री इत्यादिकांनीं युक्त होतें तेंच सारी नासाडी करून टाकून साहाराचें वाळवंट करून सोडलें ही परम देदीप्यमान कीर्ति तरी आमच्या श्वेत-द्वीपीय बंधूंच्या वांट्यास येऊन तिचा ध्वज यावच्चंद्रदिवाकरौ फडकत राहील !

दैवेनोपहतस्य बुद्धिरथवा पूर्वं विपर्यस्यति । *

'मुद्राराक्षस'

१. मागील तीन अंकांत प्रस्तुत विषयाचा एक भाग आटपला; म्हणजे आमच्या प्रस्तुतच्या सरकाराच्या संबंधानें जें लिहावयाचें होतें तें लिहिलें. आतां दुसऱ्या भागाविषयीं विवेचन करूं. हा दुसरा भाग आमच्या राजेरजवाड्यांची स्थिति हा होय.

२. कोणत्याही देशांत पाहिलें असतां लोकांचे तीन वर्ग असतात. एक राजमंडळ, म्हणजे राजा आणि त्याचे आप्त व आश्रित; दुसरा वर्ग अमीर उमराव अगर जहागिरदार; आणि तिसरा वर्ग म्हटला म्हणजे रयत अगर साधारण लोक. हल्लीं आमच्या देशांत पाहतां हे तिन्ही वर्ग आहेत. पहिल्यांत आम्हांवर नियुक्त असलेले युरोपियन अधिकारी येतात; दुसऱ्यांत 'जनरल ऑफ दि एंपायर' (शिंदे सरकार) यांजपासून तों अगदीं छोटेखानी इनामदार यांच्यापर्यंत सारी मंडळी येते; आणि तिसऱ्यांत लहान थोर, श्रीमंत गरीब अशी सारी प्रजा येते. अलीजा बहादर शिंदे सरकार वगैरे मंडळीस आम्ही दुसऱ्या म्हणजे अमीर उमरावांच्या वर्गांत घातलें हें पाहून आमच्या कित्येक वाचकांस कदाचित् नवल वाटेल; पण वस्तुतः स्थिति तशीच आहे हें सर्वप्रसिद्ध आहे. माजी लॉर्ड बीकन्स्फील्ड महाराजांनीं महाराणी साहेबांस नवी फारसी किताबत देऊन त्यांच्या

---

* "अथवा ज्यास दुर्दैवानें घेरलें त्याच्या बुद्धीस प्रथमतः विपर्यास पडतो !"

बादशाही सिंहासनापुढें छप्पन्न देशचे राजे जे गोळा करून आणले, आणि प्राचीन दिल्लीपतींचा सार्वभौमत्वाचा थाट पांच वर्षांपूर्वी जो एवढ्या थाटानें मिरविण्यांत आला यांतलें तात्पर्य काय ? तात्पर्य हेंच, कीं पूर्वी निजाम, गायकवाड, शिंदे, होळकर वगैरे जीं अनेक दोस्त सरकारें होतीं तीं इतःपर मांडलिक झालीं हें जगजाहीर करायाचें. पूर्वींचा जो निदान बाह्यात्कारी तरी बरोबरीचा संबंध होता तो जाऊन यापुढें आम्ही राजाधिराज, नेटिव संस्थानिक हे आमच्या खालीं एक पायरी, आणि एरवींची हिंदु प्रजा ही त्याहूनही खालच्या पायरीची, हाच काय तो इत्यर्थ एकशें एक तोफांचा व त्या दिवशीं जागजागीं केसरिहिंदच्या नांवानें खंडोगणती दारू जाळून जे हजारों रुपये खराब केले, त्यांत होता. बाकी त्या समयास शेंकडों वर्तमानपत्रांनीं बीकन्स्फील्ड बोवांच्या नांवानें हाकाटी केली, कीं या बुढ्यानें हें काय खूळ काढलें आहे म्हणून ! चक्रवर्तिनी साहेबांच्या देशबंधूंनीं तर त्यांस निक्षून सांगितलेंच कीं, दूरच्या भरतखंडांत तुम्ही पाहिजे तीं सोंगें करा, पण येथें श्वेतद्वीपांत म्हणाल तर 'राणी' हीच किताबत आपल्यास बस आहे ! बाकी यहुदी उमरावजींच्या मनांत आमच्या महाराणी साहेबांस इंग्लिस्तानची ही बादशाहीण बनवून सोडायाचें होतें; व स्वतःला नुकतेंच बारावें वर्ष लागलें होतें, तेव्हां स्वतः वजिरातीची इभ्रत भोगायाची होती ! ! असो; तर आमच्या दयाळू राणीसाहेबांस म्हातारपणीं दिल्लीच्या तक्ताचा जो सोहळा भोगायला सांपडला त्यांतलें तात्पर्य पाहतां आमचे लहानमोठे सारे राजेरजवाडे हे इंग्रेजी बादशाहींतले अमीर उमराव झाले हेंच होय हें उघड आहे. कांहीं दिवसांपूर्वी नेटिव संस्थानिकांच्या फौजांवर जी घाड येणार होती तिचा मतलब काय हेंही कोणाला सांगायाला नकोच !

तर आतां अगदीं उंच पायरी जी इंग्रेज लोकांची तिजवरून उतरून वरील मध्यम प्रदेशावर येऊं, व येथील हालहवाल काय आहे ती लक्षांत आणूं.

३. या मध्यम लोकांची स्थिति एकंदरींत पाहतां फारच विचित्र आहे. जसा त्रिशंकु हा इंद्रानें वरून लोटून दिला असतां धड स्वर्गलोकीं नाहीं व धड भूलोकींही नाहीं अशी त्याची अवस्था झाली व अजून मृगनक्ष-

त्याच्या शेजारीं बिचारा मधल्यामधेंच आज युगानुयुगें लटकत राहिला आहे, त्यासारखीच आमच्या एतद्देशीय माजी राजमंडळाची आज स्थिति होऊन गेली आहे. जसा पर्जन्यकाळीं एकाद्या नदीस अपरंपार पूर यावा आणि कांहीं काळानें तो अगदीं ओसरून गेल्यावर त्या प्रचंड जलौघाचा अवशेष जागजागीं डबकीं होऊन त्यांच्या रूपानें राहावा, तसा प्रकार आलीकडे आमच्या सर्व संस्थानिकांचा झालेला आहे. कांहीं ठिकाणीं मोठालीं डबकीं, कांहीं ठिकाणीं लहान, कांहीं त्यांच्याहूनही लहान, अशा रीतीनें आमच्या माजी मराठीशाहीचीं खंडें या भरतभूमीवर जागजागीं राहिलेलीं आहेत. मागें चोहोंकडे धामधूम असे व धुमाळी उडत असे, तेव्हां वादळांनीं समुद्र व वातावरण हीं जशीं स्वच्छ राहतात, त्याप्रमाणें आमच्या राष्ट्राची तरतरी ही कायम होती. आज काय शिंद्यांची मोहीम हिंदुस्थानावर झाली, उद्यां होळकरानें पुण्यावर रोख धरून आपल्या 'कल्लोळोपम तुरंगसैन्यानें* आपल्या प्रतिस्पर्ध्यांची व दुष्ट यजमानाची खोड मोडण्याचा घाट घातला आहे, परवां भोसल्यांची धुमाळी बंगाल्यावर होऊन टोपीवाले कलकत्त्याच्या खंदकाच्या आंत दडून

---

* "Holkar, seeing himself thus completely hemmed in, and all his schemes of conquest about to be checked by the British, seems to have hastily determined to plunge into a contest with them. He threatened the territory of their ally the Rajah of Iyenagur; he made extravagant and even insulting demands: and in a letter to Sir A. Wellesley, he said, "Countries of many hundred coss shall be overrun and plundered, Lord Lake shall not have leisure; to breathe for a moment; and calamities will fall on lacks of human beings in continual war by the attacks of my army, which overwhelms like the waves of the sea!" At the same time he earnestly invited Scindia and the other princes who remained still independent, to unite against the English as a common enemy."

*Murray's British India.*

२८ ... १९२ ३९१३

राहिले, ऽ असा नेहेमीं तडाखा उडत असल्यामुळें देशांत बहुधा अस्वस्थता राहून रक्तपाताचा प्रसंग वरचेवर येत असे हें खरें, पण निदान, वेचर्डें तरी होतें कीं, आज जसे तोफेचे चित्र पाहायाचें असलें म्हणजे सचित्र इंग्रजी कोश उघडावा लागतो, किंवा अफगाणिस्थानांत जायला मनुष्यें पाहिजेत तर मारून मुटकून शिपाई सजवावा लागतो, अगर परवां जसे लक्षावधि लोक दांत वासून अन्न अन्न करून मेले व टेंपल साहेबांनीं खुशाल विलायतेस तारा पाठवाव्या कीं ' आरबी गोष्टी ' तील आंधळ्यां-च्या प्रमाणें हे सारे लबाड लोक मरणाचें सोंग घेत आहेत, असला तरी अत्यंत दैन्याचा व लाजिरवाणा प्रकार त्या वेळेस नव्हता ! इंग्रेजी भाषेंत एक म्हण आहे कीं, ' हत्याराचा नाश उपयोग केल्यानें जितपत होईल त्यापेक्षां गंजल्यानें तो त्वरित होतो, ' तर हीच म्हण व्यक्तिभूत मनुष्याच्या संबंधानें पाहतां किंवा एकंदर राष्ट्राच्या मानानें पाहतां खरी आहे. मनुष्य सुखावला आणि जागच्या जागीं बसला कीं त्यास आकावाईनें घेरलेंच म्हणून समजावें. यास उत्कृष्ट उदाहरण आमच्या राजेरजवाड्यांचेंच घ्या, दुसरें नको. महादजी शिंदा मुळीं लेकुरवाळा, त्यांतून पानपताच्या पूर्णा-हुतींत एक पाय गमावल्यानें लंगडशाई पदरीं आलेली, सारे भाऊ गनिमानीं खाऊन टाकल्यामुळें ' नास्ति बंधुसमं बलम् ' यांपैकीं कांहीं अनुकूल नाहीं, याप्रमाणें सर्व तयारी असतां ' क्रियासिद्धिः सत्त्वे भवति

---

ऽ वरील खंदकाचा घेर सात मैल होता असें आम्हीं एके ठिकाणीं वाचलें आहे. त्याच्यासंबंधानें मेकॉलेनें असें लिहिलें आहेः—

" Another leader, at the head of his innumerable cavalry, descended year after year on the rice-fields of Bengal. Even the European factors trembled for their magazines, less than a hundred years ago, it was thought necessary to fortify Calcutta against the horsemen of Berar; and the name of the Mahratta ditch still preserves the memory of the danger, "

*Lord Clive.*

महत्तां नोपकरणे ' * या कविवचनाप्रमाणें त्यानें पुढें केवढा अटोकाट विस्तु रचला ! दासीपुत्र असतां गादीचा मालक होऊन तिची इभ्रत त्यानें अतोनात वाढविली, मुसलमानांनीं पानपतानंतर उत्तर प्रांतांत धुडावा मांडला होता तो मोडून टाकून खुद्द दिल्लीपतीला आपल्या ताब्यांत घेतलें, येवढे शूर रजपूत पण त्यांशीं सतत झगडून त्यांवर आपला शह बसविला, पुण्याच्या दरबारीं आपलें वजन वाढवून शेवटीं तर नाना फडनवीसासारख्यालाही गुंडाळण्याचा त्यानें घाट घातला, फार तर काय-पण इंग्रेज ही त्याच्या पराकाष्ठेचें आर्जवानें असून त्यांच्या बंगाल प्रांता-वरही त्यानें चौथ व सरदेशमुखी नेली होती, आणि युद्धकथेवरून असें ऐकण्यांत आलें कीं, पाटील बोवांचा इरादा खुद्द लंडनवर भगवा झेंडा रोंवण्याचा होता ! ! ही एका व्यक्तीची गोष्ट झाली. दुसरी होळकरशाही-तली व्यक्ति घ्या. ते तरी दासीपुत्रच, पायानें नाहीं तर एका डोळ्यानें व्यंग, साऱ्या बंधूंची वरच्यासारखीच किंबहुना त्याहूनही वाईट गति झालेली, आणि स्वतः उघडून ना घर, ना दार, ना दौलत, ना सखासोयरा अशा अत्यंत विपरीत रानोमाळ सुटलेले,—हा पूर्वरंग; पण उत्तररंगांतली काय मजा सांगावी ! प्रावृट्काळीं गिरिशिखरावर वृष्टि झाली असतां हजारों ओहोळांचा एक लोट बनून जसा जबरदस्त लोंढा कडेपठारावरून व डोंगरावरून उड्या टाकीत खालीं येतो आणि चोहोंकडे दाणादाण करून सोडतो, त्याप्रमाणें पेंढार गोळा करीत करीत हळूं हळूं मोठा जमाव करून जेव्हां कां स्वारी पुण्यावर येऊन आदळली तेव्हां पुण्यपत्तनश्री त्रिकंपित झाली ! पुढें वानवडीच्या मैदानावर शिंद्याच्या कंपूवर व चौदाशें तोफांवर जेव्हां यशवंतरावानें एकच गर्दी केली आणि मारीन किंवा मरेन या कृतनिश्चयानें पाश्चात्य बृहद्यंत्रांच्या धूम्रकल्लोलांशीं जेजुरीच्या भंडाराची टक्कर दिली, तेव्हांची ती रणधुमाळी काय वर्णावी ! येवढा दौलतराव शिंद्याचा वड्डा सरंजाम, व जॉन पेरू, सवाई शिकंदर, जॉन बत्तीस वगैरे फराशीस सरदारांनीं केलेला तोफांचा भडिमार, पण पार धुव्वा उडवून दिला ! पुढें इंग्रेजांच्या हातें शिंद्याचा मोड झाला,

*" थोरांची कार्यसिद्धि जी होत असते ती त्यांच्या आंगच्या पराक्रमा-वरून होत असते; केवळ साधनांच्या साहित्यानें कांहीं होत नाहीं ! "

आणि तो हतवीर्य होऊन बसल्यावर ही स्वारी कंबर बांधून उठली. शिंद्याचें लष्कर मोठें खरें, पण तो स्वतः नामर्द असल्यामुळें त्याचा मोड वेलेस्ली साहेबानें तेव्हांच केला; पण यशवंतरावाची गोष्ट अगदीं निराळी. तो जातीनेंच शूर, व मराठी काव्यांत पुरा वाकबगार; तेव्हां जवळ विशेष साधन नसतांही त्यानें हुतुतूचा डाव अशा शिताफीनें आरंभला कीं कर्नल मॉन्सन्ची फटफजिती उडून जशरल् लेक सुद्धां जेरीस आला. परवां तात्या टोप्यानें वर्ष दोन वर्षें आमच्या सरकारच्या फलटणीस जसें खेळवलें व धनाजी जाधव मोगलांस जसा पुरून उरला होता, त्याप्रमाणेंच होळकरानें नर्मदानदीपासून जो घोडा पिटला तो त्यास थेट सिंधुनदी दाखविली! इंग्रेजांनीं त्याचा होईल तितका पाठपुरावा केला, पण असल्या पठ्यामागें कोठपर्यंत तोफांचा खटारा त्यांनीं ओढीत न्यावा, व त्याच्या गुलकावण्या-पुढें यांच्या हडेहप्पीचें काय चालणार! शिवाय हिंदुस्थानच्या शिवेपर्यंत पिटला, तरी गड्याचा दम आहे तो आहेच! तेव्हां आमच्या शहाण्या सरकारनें सरतेशेवटीं हार घेऊन वरील स्वारीस पुनः आणून आपल्या गादीवर बसविलें, व तंटा मिटवला! याप्रमाणें एक ना दोन,—शेंकडों उदाहरणें गेल्या दोन शतकांतली आहेत. पण तींच आतां मौज पहा. आतां महाराज शिंदे यांनीं मोठें शतकृत्य केलें म्हणजे काय, तर कलकत्यास एकाद्या 'बॉल' त कमांडर इन् चीफच्या वगैरे बायको-बरोबर नाचले; आणि महाराज होळकर यांनीं मोठी तरवार गाजवली म्हणजे काय तर एकादी गिरणी काढली! मागल्या रानवट काळीं आमच्या संस्थानिकांस वरच्ेवर कामगिऱ्या पडत; व आज काय नबाबावर स्वारी नेमली, उद्यां पट्टणावर चढाई करून जावयाचें, परवां गिलच्याच्या पारिपत्यास निघायचें, असे सरदारमंडळीस वरच्येवर यजमानाकडून तगादे असत; पण आतांच्या धर्मराज्यांत वरील रानटीपणाचा धोशा कांहीं एक उरला नाहीं. हिमालयापासून तों कन्याकुमारीपर्यंत अवघ्या भरतखंडास आमची श्वेतद्वीपस्थ माता खुशाल थापटून अंगाई करविते आहे, व गाढ झोंप येण्याकरतां इंग्रेजी सुधारणेची थोडीशी अफूही तिनें चारल्यामुळें तें बिनधास्त आज कितीक काळपावेतों बिचारें घोरत पडलें आहे! आमच्या संरक्षणाचा वगैरे सर्व कांहीं मक्ता आमच्या दयाळू राज्यकर्त्यांनीं

आपणाकडे घेतल्यावर मग आम्हांला आतां कशाचें भय उरणार ! यापूर्वी आम्हांला मुसलमानांनीं त्रासून टाकलें होतें, व आम्हीही मूर्खपणानें आपापसांत भांडून एकमेकांस उपद्रव करीत असूं; पण प्रस्तुतच्या सुधारलेल्या राज्यांच्या विस्तीर्ण छायेखालीं आतां कोणत्याही तऱ्हेचा कोणाला त्रास म्हणून उरला नाहीं. उत्तरेकडचे ऋक्षमहाराज जरी आमच्यावर गुरगुरले, किंवा त्यांच्या सान्निध्यानें अमीर साहेबांनीं जरी कधींमधीं उचल केली, तरी आमचें दयाळू सरकार वरील गोष्टींचा बंदोबस्त परभारेंच करतें; आमच्या झोपेंत बिलकुल व्यत्यय आणीत नाहीं. परवां दिल्लीच्या दरबारीं आमच्या अलीजा बहादरांस आंग्लभौम बादशाहीची सरदारी दिली म्हणून परवांच्या दंग्याधोप्यांत त्यांस इंग्रेज सरकारानें कांहीं त्रास दिला कीं काय ? छे तें त्यांचें शीलच नव्हे ! आमचें जुनें राजमंडळ जें एकदां आमच्या पाश्चात्य प्रभूंनीं पोटाशीं धरलें व तुमचें सर्व प्रकारें आम्ही रक्षण करूं म्हणून त्यांस एकदां जें त्यांनीं अभय दिलें, तें आतां ते विसरतील काय ! ज्यांच्या जिवाकरतां इंद्रप्रस्थ मुक्कामीं येवढा समारंभ करविला, व गोड गोड भाषणांनीं रिझवून व बडेबडे किताब देऊन ज्यांची सत्कारपूर्व बोळवणी केली, त्या सोनुकल्यास कां आयत्या वेळेस आयुब्खानासारख्या राक्षसाच्या दाढेंत द्यावयाचें ?

तर आमच्या राजेरजवाड्यांची सध्यां मोठी विलक्षण स्थिति झाली आहे. इंग्रेज लोकांनीं सगळा कारभार आटपल्यामुळें त्यांनीं चारी ठाव जेवावें व मन मानेल तितका ऐषआराम करावा येवढेंच त्यांस हल्लीं काम उरलें आहे. मागें वारंवार परचक्राचें भय असे, तेव्हां आतांसारखी चैन भोगण्यास फुरसतच नसे; नेहमीं घोडा व भाला यांशीं काम ठेवावें लागत असे. आतां परचक्राची पिढ्यानपिढ्या ही वार्ता नसल्यामुळें 'सुखं च मे शयनं च मे' येवढा काय तो प्रकार उरला आहे. इंग्रेजींत एक म्हण आहे कीं, रिकामें मन हें सैतानाचा कारखाना आहे; म्हणजे मनुष्य निरुद्योगी असलें कीं सैतानानें तेथें आपलें गबाळें ठेवलेंच म्हणून समजावें, मग तो तेथें काय काय विकार उत्पन्न करील याचा नेम नाहीं ! या म्हणीचें पूर्ण सार्थक्य हल्लीं आमच्या संस्थानिकाचे ठायीं सांपडेल. मद्यपान, व्यभिचार, अनन्वित आचार वगैरे सर्व कांहीं अनर्थ जिकडे

तिकडे ऐकण्यांत येतात. उघडच आहे; ' हितोपदेशां ' त एक श्लोक आहे:—

**यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वमविवेकिता ।**
**एकैकमप्यनर्थाय किमु तत्र चतुष्टयम् ॥**

" तारुण्य, धनाची विपुलता, राज्याधिकार, आणि विवेकशून्यता,—या चौकड्यांपैकीं एकेक जरी पाहिलें तरी अनर्थावह होय. मग सारीं एके ठिकाणीं जुळल्यावर तर काय विचारावयाचें आहे ! "

आतां हें खरें आहे, कीं आमच्या दयाळू सरकारानें आमच्या देशांत इतर जशीं शेंकडों सोंगें उभीं केलीं आहेत, त्याप्रमाणेंच दरएक राजारजवाड्याच्या मागें विद्याभ्यासाचें एक शुष्ककाष्ट लावून दिलेलें आहे. मोठमोठ्या संस्थानिकांपासून तों छोटेखानी जहागीरदारापर्यंत एकेका आरिस्टॉटलाची योजना करून दिलेली आढळते. पण इतक्यांच्या हातून अद्यापि एकही शिकंदर निपजला नाहीं. कशाला निपजेल ? सर्वच गोष्टी अनुकूल ! अगोदर मुळीं लक्ष्मीचें व सरस्वतीचें कितीसें सूत आहे हें पहिल्यापासून प्रसिद्धच आहे. तेव्हां ' यस्मिन् द्वयं श्रीश्च सरस्वती च ' * हा योग आधुनिक काळीं म्हटला म्हणजे कपिलाषष्ठीचाच म्हणायाला कांहीं हरकत नाहीं. त्यांतून जेथें वापजन्मीं कधीं म्लेंच्छ विद्येचा विटाळ झाला नाहीं तेथें तीस बळेंच घुसवून देण्याचा प्रयत्न करावयाचा म्हणजे काय ! वरील विद्या मुळीं तिकडील स्त्रियांप्रमाणें अवगुंठन केलेली; कोठें भरतखंड व कोठें श्वेतद्वीप ! तेव्हां तिची नुसती तोंडओळखही पक्की होण्यास एतद्देशीयांस केवढे प्रयास; ती स्वदेशीय विद्येप्रमाणें सुखप्रवेश तरी आहे ! त्यांतून वाग्देवीच्या साऱ्या मुलखांतलीच चाल, कीं ती अभिसारिके-

---

* कालिदासानें ' रघुवंशा ' च्या साहाव्या सर्गांत एका राजाचें येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे:—

निसर्गभिन्नास्पदमेकसंश्रयं
यस्मिन् द्वयं श्रीश्च सरस्वती च ।

" ज्याचे ठायीं स्वभावतःच ज्यांचें वैयधिकरण्य अशा लक्ष्मीचें व सरस्वतीचें एकत्र वास्तव्य आढळतें ! "

प्रमाणें आपण होऊन म्हणजे कोणाच्या गळ्यांत पडत असते असें नाहीं. * त्यांतून ही तर पाश्चात्य विद्या; तिच्या अंगीं तद्देशीय रमणींप्रमाणेंच पहिल्या प्रतीचा कुर्रा ! शंभरदां पायां पडून घेईल तेव्हां अवगुंठनाचा किंचित् निरास करून आपल्या वदनचंद्राची एकादी कला प्रगट करील ! तेव्हां हें अर्थात् सिद्ध झालें कीं, आमच्या राजबिंड्यास म्हटली म्हणजे वरील विद्येच्या संबंधानें सदोदित अमावास्याच बहुधा असणार. नाहीं म्हणायाला येवढें मात्र निष्पन्न व्हावयाचें कीं, यजमानास तर सरस्वतीचा लाभ जितक्यास तितकाच; पण ट्यूटर साहेबांनीं मात्र लक्ष्मीचा योग करून घ्यावा ! तर असल्या तुटपुंजीच्या विद्येनें आमच्या नेटिव संस्थानांचें काय कल्याण होणार ? शिवाय ज्यांच्या अंगावर राज्यकारभार टाकायचा त्याला इतिहास, भूगोल, व्याकरण, पदार्थविज्ञान हें सर्व मारूड शिकवून तरी काय करावयाचें आहे कोण जाणें ! वरील विषयांपेक्षां घोड्यावर बसणें, भाला मारणें, निशाण रोखणें, लष्करी कवाईत, वगैरे गोष्टी शिकविल्या तर अधिक उपयोग नाहीं काय ? किंवा न्यायमनसुबा कसा करावा, जमाबंदीची व्यवस्था कशी ठेवावी, या गोष्टींची माहिती आमच्या होतकरू राजबिंड्यांस जर करून दिली, तर ती त्यांस फायद्याची होणार नाहीं काय ? पण हें कोण करतो ! छे छे, ती गोष्ट मनांत सुद्धां आणूं नका. जें आमचें दयाळू सरकार आज कितीक वर्षें साऱ्या राष्ट्रास निःशस्त्र करून टाकून त्यास मीठही पुरतें खाऊं देत नाहीं, व ज्याची एतद्देशीय संस्थानिकांच्या चार शेंदाड शिपायांवर सुद्धां आज कितीक दिवस करडी नजर आहे, ते कां त्यांस कवायतीचे भिकार चाळे करायाला शिकवणार ? आमचा बचाव करण्याचा एकंदर मक्ता त्यानें घेऊन टाकला असतां आतां आम्हांला हडेल् हप् आणि फाट् फुट् ही

---

* प्रसिद्ध भूमितिकार यूक्लिड यांचें एक सुभाषित सर्वप्रसिद्धच आहे. एका राजानें त्यास विचारलें कीं, आपली विद्या आम्हांस आपण विशेष सुलभतेनें पढवाल कीं नाहीं ? त्यावर त्यानें उत्तर केलें, "There is no royal road to learning" (विद्याध्ययनास राजमार्ग नाहीं; म्हणजे लहानथोरांस एकच मार्ग !)

हावीं कशाला ? त्याप्रमाणेंच आमच्या देशांतले मल्हारराव व तात्यासाहेब हे हायकोर्टांतल्या जज्जाप्रमाणें प्रजेस न्याय द्यावयाला लागले; व वसुलबाकीच्या ताळेबंदाकडे लक्ष पुरवूं लागले, म्हणजे मग सात वर्षांपूर्वी बडोद्यास जी दंगल झाली, व विलायतच्या बारिस्टरांची बिदागी त्यांस पोंचली आणि अद्याप पावेतों सरटी महाराजांच्या हस्तें प्रजेस करटी मिळून श्वेतकायास जी वरचेवर खोबऱ्याची खिरापत खैरात होते, ती चंगळ कशी चालावी !!

असो; एकंदरींत पाहतां आमच्या राजेरजवाड्यांची हल्लींची स्थिति ही अत्यंत शोचनीय होय हें उघड आहे. सामान्य रयत लोकांची स्थिति सुद्धां पुष्कळ अंशांनीं बरी; कां कीं त्यांस हवें तें करण्याची मुखत्यारी तरी असते, व स्वतःस सुधारण्याचे मार्ग तरी त्यांस खुले असतात. पण आमच्या संस्थानिकांस तें कांहीं आहे काय ? जशीं कळसूत्री भावलीं असतात त्याप्रमाणें बडेसाहेब, दिवाणसाहेब, कारभारीसाहेब ज्याप्रमाणें वागवितील त्याप्रमाणें त्यांस वागणें प्राप्त ! रयतेपैकीं एकादा मनुष्य उठला, आणि साऱ्या मुलखावरून हिंडून यावयाचें असें जर त्यानें मनांत आणलें, तर तें त्यास सहज हवें तेव्हा करतां येणार आहे. पण एकाद्या राजेसाहेबांनीं तें कधींकाळीं मनांत आणलें तर अगोदर सतरा परवाने पाहिजेत. सामान्य मनुष्यांस शहाणपण येण्यासही शेकडों रस्ते असतात. मध्यान्हाचा निर्वाह हेंच अगोदर त्यास एक मोठे प्रेरक असतें, व जगाचे टोणपे हेही त्यांस पुष्कळ शहाणे करीत असतात. पण आमच्या हतभाग्य गर्भश्रीमंतांस त्यांच्यापैकीं काय अनुकूलता आहे बरें ? कांहीं नाहीं. जसा एकादा लाडका पोपट सोन्याच्या पिंजऱ्यांत ठेवावा आणि त्यास बसायला काय, तर सोन्याची दांडी; पानपात्र काय, तर रत्नखचित पेला; खायला काय, तर मसकतचीं डाळिंबें;—त्याप्रमाणेंच त्यांचा सारा प्रकार आहे. वरील श्रीमंती पोपटांत आणि खुशाल वनोपवनांतून हिंडणाऱ्या व आकाशपंथानें स्वच्छंद भराऱ्या मारणाऱ्या राघूमध्यें जितकें अंतर, तितकेंच राज्यरूप कारागृहांत वागणाऱ्या व ऐषआरामाच्या धुंदींत लोळणाऱ्या आमच्या नाटकी राजांत आणि एकाद्या सामान्य मनुष्यांत आहे.

याप्रमाणें आमच्या देशांतील राजेरजवाड्यांच्या हालहवालीच्या संबंधानें चार शब्द लिहिले. आतां एकंदर, देशाच्या संबंधानें त्यांचीं काय कर्तव्यें आहेत, व त्यांच्या संबंधानें आमच्या सांप्रतच्या सरकाराचीं काय कर्तव्यें आहेत याविषयीं थोडेसें निरूपण करून हें प्रकरण आटपतों.

४. प्रथमतः प्रस्तुतच्या राज्यकर्त्यांनीं आमच्या जुन्या संस्थानिकांशीं कोणत्या रीतीचा संबंध ठेवला पाहिजे याविषयीं जर विचार केला तर ही गोष्ट कोणासही कबूल करणें भाग येईल, कीं हल्लीं चोहोंकडे जें प्रस्तुत प्रकरणीं सरकारचें वर्तन आहे तें त्यास पुष्कळ अंशीं बदललें पाहिजे. मागील अंकांत इंग्रेज लोक आम्हां प्रजेचें काय लागतात याविषयीं जें बरेंच निरूपण केलें आहे तेंच या ठिकाणींही बहुतेक अंशीं उपयोगी पडण्यासारखें आहे. कां कीं मागें सांगितल्याप्रमाणें १८७७ सालापासून आम्ही व जुने राजेरजवाडे या दोहोंकडेही चक्रवर्तिनीच्या संबंधानें प्रजाधर्म आला आहे. वर सद्धर्मनिष्ठा, नीति आणि व्यवहार या तिहींसंबंधानें विचार करतां या राष्ट्राशीं भलेपणानें वागणें हें जसें आमच्या पाश्चात्य प्रभूंस उचित आहे, त्याप्रमाणेंच ज्या एतद्देशीय संस्थानिकांनीं त्यांस प्रथमतः आश्रय दिला त्यांशीं निदान न्यायानें तरी वागणें त्यांस जरूर आहे. ही गोष्ट आम्हांस कबूल आहे, कीं आमचे राजेरजवाडे हे मूर्ख, दुर्व्यसनी, अल्पदृष्टि वगैरे होते व अद्यापहि आहेत; व असें असल्यामुळेंच आमच्या राज्यकर्त्यांचा व त्यांचा गेल्या शतकांत जो संबंध होता त्याच्या अगदीं उलट तो या शतकांत झाला आहे. सेव्यसेवकभावाचा येवढ्या थोड्या काळांत जो केवळ विपर्यय झाला तो सामान्य कारणांनीं नव्हे हें उघडच आहे. आमच्या पाश्चात्य बंधूंच्या अंगीं आम्हांहून शौर्यादि गुण विशेष, तेव्हां त्यांचा आम्हांवर पगडा होऊन आम्ही डाव हरलों हें तर सर्वविश्रुतच आहे. तेव्हां आमच्या हतवीर्य होऊन बसलेल्या राजेरजवाड्यांच्या तर्फेनें बोलावयाचें म्हणून इतकेंच कीं, ते आज सार्वभौम सरकारचे सर्वथा अंकित होऊन गेलेले आहेत. पूर्वीच्या वैभवाची हळू हळू त्यांची आठवण सुद्धां बुजत चालली आहे. व आकाशांतील प्रभूनें जे धनी त्यांस पाडवून दिले आहेत त्यांच्या सेवेंत ते सर्व अत्यंत तत्पर आहेत. दिल्लीस या, आले; कलकत्त्यास चला, गेले; अमक्या अमक्या तऱ्हेनें वागा, वागले;—याप्रमाणें

त्यांचें सारें सूत्र केसरिहिंदूच्या प्रतिनिधि साहेबांच्या हातांत आलें आहे. मग इतक्या प्रतीची स्थिति येऊन पोंचल्यावर अजूनही आमच्या दयाळू सरकारचा त्यांच्यावर कटाक्ष कां असावा बरें ? राजे सर टी, राव बरवे, यांच्या सारख्या महादक्ष प्रधानजींनीं थोरल्या सरकाराची नोकरी येवढ्या शिताफीनें बजावण्याचें मनावर घेतलें असतां अद्यापही आमच्या देशांतील छोट्या सरकारांचा मलिकामा अझमा महाराणीसाहेबांस विश्वास येत नाहीं काय ? या हिंदुस्थानाचा कारभार यथास्थित चालण्यास आमच्या संस्थानिकांनीं आपल्या शिक्केकट्यारीला रजा देऊन बडे शेट बनल्याखेरीज दुसरा मार्गच नाहीं काय ? कोण जाणें बोवा ! भर्तृहरीनें सांगितलेंच आहे कीं, 'वेश्यांगनेव नृपनीतिरनेकरूपा' मग या रूपांची मीमांसा आमच्यासारख्यांनीं करून उपयोग काय ?
'तुका म्हणे उगें राहावें आणि जें जें होईल तें तें पहावें ! !'

५. आतां सरते शेवटीं आमच्या जुन्या संस्थानिकांनीं हल्लींच्या स्थितींत काय करावें याविषयीं थोडेंसे लिहून हा अंक संपावितों. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, त्यांची स्थिति आतां पूर्वीपेक्षां फार निराळी झाली आहे, व दिवसांदिवस होत चालली आहे. हल्लीं त्यांनीं फार तर आपल्या टापूंत काय थोडाबहुत कारभार करण्याजोगा असेल तेवढा करावा, आणि स्वस्थ बसावें; तेवढेंच त्यांजकडे राहिलें आहे. बाकी एकंदर देशाच्या राज्याशीं त्यांचा संबंध म्हटला म्हणजे इतक्या-पुरताच आहे, कीं कोठें एकादें दरबार झालें तर मुजरा करायाला जावें, किंवा कायदेकौंसिलांत खुर्चीवर बसून झोंप घ्यावी ! तेव्हां आतां आमच्या राजमंडळानें मागला आपला इतिहास सर्व विसरून जावा हेंच बरें. व आजपर्यंत त्यांस जी इतकी दगदग पडत असे तिजबद्दल त्यांचे दयाळू धनी त्यांस आज विश्रांति घ्यावयाला सांगताहेत, तर सरकारच्या वचनाला त्यांनीं मान द्यावा हें उचित आहे. सर्वांनींच हुतूतू घालून काय करायाचें आहे ? गेल्या शतकभर प्राच्य आर्यांचा डाव चालला होता; आतां पाश्चात्य मंडळी पुढें सरसावून आपली हौस पुरवते आहे,— ठीक आहे. तसेंच कां होईना ! तर या माजी पडलेल्या मंडळीनें आतां बसल्या बसल्या निराळ्या रीतीच्या उद्योगांत कालक्षेप करावा. हे निराळे

उद्योग म्हटले म्हणजे आपल्या देशबंधूंची स्थिति सुधारण्याचे उपाय अमलांत आणणें हें होय. देश जो भरभराटीस येतो तो केवळ मर्दुमकीवर व तरवारीच्या जोरावरच येतो असें नाहीं. ज्यास जागचें हलवत नाहीं असा मनुष्य सुद्धां देशाचें अपरिमित कल्याण करूं शकेल. पहा बरें, एवढा शिकंदर बादशाहा, की ज्यानें सारें भूमंडळ दणाणून दिलें, आणि एवढें भूमंडळ नाचायाला थोडें वाटून जो विषण्ण होत्साता रडला, पण त्याचें आतां काय राहिलें आहे ? त्याला मूठमाती कोठें दिली याचा सुद्धां आज पत्ता नाहीं. पण तीच त्याच्या गुरूची म्हणजे आरिस्टॉटल् याची, गोष्ट घ्या. शिकंदरच काय, पण सारें ग्रीक राष्ट्र आतां कीर्तिशेष होऊन याचा मागमूसही आतां उरला नसतां वरील पंडितश्रेष्ठाच्या ग्रंथांनीं आजपर्यंत मनुष्यजातीचें किती कल्याण केलें आहे ? येवढें रोमन् लोकांचें अवाढव्य राज्य सारी पृथ्वी व्यापून राहिलेलें, पण पुढें रानटी लोकांनीं त्याची धूळधाण करून सोडली, व आतां त्या काळचें एक चिटपाखरूं देखील राहिलें नाहीं; पण त्या लोकांचे कायदे व त्यांनीं संपादन केलेली विद्या अद्याप युरोपांत जागृत आहे व त्यांनीं बांधलेले रस्ते व नळ कायम आहेत. हीच गोष्ट आपल्या देशासही लागू आहे. राम गेले, युधिष्ठिर गेले, विक्रमादित्य अस्तंगत झाला आणि कायम मंडळी कोण ! तर वाल्मीकि, व्यास, कालिदास, पाणिनि, वाग्भट्ट, भास्कराचार्य, इत्यादि. तर शारीर प्रभाव व मानासिक प्रभाव या दोहींत इतकें अंतर आहे; एक वैद्युत तेजाप्रमाणें क्षणभर डोळे दिपवणारा खरा, पण पुढल्या क्षणीं कांहीं नाहीं. पण तीच दिनमणीच्या तेजाची गोष्ट पहा ! स्वारीला ज्या दिवशीं आदितीनें जन्म दिला तेंव्हांपासून आजपर्यंत किती भुवनांस तो आधारभूत होऊन राहिला आहे ! नाहीं तर विद्युल्लताबाई; आपल्या पित्याच्या अंकापासून च्युत होऊन काय घटकाभर कडकड चमचम करतील तेवढेंचि; पण अंमळशानें पाहावें तों मेघराजही नाहींत व त्यांची कन्याही नाहीं; दोघांचा बरोबरच लय ! पण दुसऱ्या दिव्य तेजाचें केवढें स्थैर्य व एकंदर जीवलोकास याचा केवढा आधार ! तेंव्हां आमच्या नृपमंडळानें आर्यमत्तीला जरी आपलें वैभव गाजविण्याचें मनांत आणलें तरी तसें होण्यास मार्ग नाहींसा नाहीं. खबुतरांचीं लग्नें, मक्केची चादर,

सेलर हौस, असल्या हौसा पुरवण्यापेक्षां आपल्या देशांतील प्राचीन नष्टप्राय विद्यांचें व कलांचें पुनरुज्जीवन करण्याचें श्रेय जर ते घेऊं पाहतील तर किती बरें होणार आहे ! त्याप्रमाणेंच दुर्व्यसनांत आपली व आपल्या राज्याची खराबी करण्याचें टाकून जर देशाटनांत ते पैशाचा व्यय करूं लागले, व ज्या राष्ट्रानें या देशास हां हां म्हणतां ग्रासून टाकलें, त्यांचें ऐश्वर्य व सामर्थ्य लक्षांत आणण्याचा जर त्यांनीं यत्न केला तर केवढी फायद्याची गोष्ट होईल बरें ? मागील राजेरजवाड्यांस हिंदुस्थान येवढेंच काय तें जग होतें, व कोणी बाहेर जावयाचा हिय्या केलाच असता तर पुष्कळ अडचणी होत्या; पण आतां केवढी मौज झाली आहे! अफाट दर्या व प्रचंड पर्वत यांनीं सुद्धां मानवी बुद्धीपुढें हात टेकले आहेत. तेव्हां राजाराम महाराज वगैरे कांहीं जणांनीं जो कित्ता घालून दिला तो वळविला असतां आमच्या संस्थानिकांचें व त्यांच्या द्वारें लोकांचें पुष्कळ हित होणार आहे. त्याप्रमाणेंच युरोपियन व्यापाऱ्यांपुढें टिकाव न निघून एतद्देशीय लोकांचा व्यापार जो बसला आहे, व शेंकडों कला नष्ट होऊन किंवा निदान नाहींशा होण्याच्या बेतांत येऊन ज्या बसल्या आहेत, त्यांसही हात देण्याचें वरील मंडळीनें मनावर घेतलें असतां सहज होणार आहे. आमच्या देशांत हल्लीं अशी कांहीं चमत्कारिक स्थिति आढळते कीं, सारी फुटाफूट आहे. ‘ दांत आहेत तों चणे नाहींत, आणि चणे आहेत तों दांत नाहींत ’ असा कांहीं विलक्षण प्रकार आहे. ज्यांच्यापाशीं पैसा मुबलक आहे त्यांस ज्ञानाचा संस्कार म्हटला म्हणजे बेताबेताचा, व देशहित हें तर स्वप्नींही माहीत नाहीं. त्यांनीं संपत्तीचें ऐश्वर्य भोगावयाचें म्हटलें म्हणजे चार घोड्यांच्या गाड्यांतून मिरवावें, युरोपियन कोचमन ठेवावा, आपल्या प्रभूस बडा खाना द्यावा, लाखों रुपये हातचे दवडून एकादा दोन तीन अक्षरांचा किताब आपल्या नांवापुढें लटकवून द्यावा, इत्यादि बालिशत्वाचे प्रकार करावे; पण लाखों लोक पटापट प्राण टाकताहेत, तर बेट्यांनीं एका छदामानेंही खराब होऊं नये. ही एका बाजूची हालहवाल झाली. दुसरीकडे वळावें, तों आम्ही यंव करूं, आम्ही त्यंव करूं, पार्लमेंट सभा काढूं, म्यांचेस्टरास हालवून सोडूं, कलाकौशल्य ऊर्जित दशेस आणूं, देशभाषांतून ग्रंथांची

५ आ. दे. स्थि.

रगाडी करून देऊं, इत्यादि प्रलाप मात्र ऐकावे; पण हातून व्हावयाचें आहे काय ? मारे अध्यक्ष नेमले, उपाध्यक्ष नेमले, व्यवस्थापक मंडळी बनली, चिटणीस लेखणी कानावर ठेवून पुढें सरसावले, खजीनदार तयार झाले,—सगळें झालें; पण खजिन्याची वाट काय ? ' बाजारांत तुरी ' या म्हणीसारखीच अवस्था ! सारी पाकशालेंतील मंडळी सिद्ध झाली, व मोठे बल्लवाधिपति पुढें येऊन उभे राहिले; पण फळ काय ? ' सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः ' ! तर आमच्या राजेरजवाड्यांपाशीं आज जी धनसमृद्धि आहे तिचा वेळेवर जर ते सदुपयोग करतील तर देशाचें अतिशयित कल्याण होऊन त्याच्या योगानें त्यांस मोठें भूषण प्राप्त होणारें आहे. नाहीं तर लक्ष्मी स्वभावतः चंचळ आहेच, ती कोठें म्हणजे स्थिर राहिली आहे असें नाहींच; तेव्हां तिच्या प्रवाहांत समयीं जर हात धुऊन न घेतले तर मग खुशाल तेच चोळीत बसावें !

---

## विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः । *

' नीतिशतक '

१. येथवर प्रस्तुत विषयाच्या दोन सदरांचा विचार झाला. आतां तिसरें सदर सामान्य लोकांची स्थिति हें होय. तर यावर आमच्या समजुती आजपर्यंत काय झाल्या आहेत त्या आतां वाचकांस सादर करतों.

२. सामान्य लोकांच्या स्थितीविषयीं ऊहापोह करायाचा म्हटलें म्हणजे त्यांत पुढील गोष्टी येतात. प्रथमतः चांगल्या स्थितींतलें एकादें राष्ट्र घ्यावें आणि त्याशीं आपली तुलना करून आपली अवस्था कोणत्या प्रकारची आहे हें पाहावें. ती पाहिली म्हणजे मग तिची उपपत्ति करण्याचा यत्न करावा. आणि हें उपपादन झालें म्हणजे मग आपली स्थिति सुधारण्यास उपाय कोणते याविषयीं विवेचन करावें. तर हा अनुक्रम धरून आतां पहिल्या कलमाला लागूं.

३. आपल्या राष्ट्राचें प्रत्यंतर पहावयास कोणत्या राष्ट्राच्या स्थितीचें अवलोकन करायास पाहिजे याविषयीं मोठी पंचाईत करायला नको हें

---

* " जे एकदां विवेकभ्रष्ट झाले त्यांची शेंकडों प्रकारांनीं हानि होत जाते ! "

कोणाच्याही लक्षांत येऊन चुकणार आहे. ज्या आरशांत आमचें रूप दृष्टिगोचर करून घ्यावयाचें तो अगदीं जवळच आहे. त्याची व आमची परमेश्वरानें सांगडच घालून दिली आहे. अत्यंत परिपक्क दशेस येऊन पोंचलेल्या राष्ट्राचें उदाहरण इंग्रेजांहून आपणांस दुसरें कोणतें आढळणार? व हें जवळचें असून दुसरें आपणांस पाहिजे तरी कशाला ! तर हल्लीं आमच्या लोकांची स्थिति जशी असावी तशी आहे कीं नाहीं या गोष्टीची प्रचीति पाहण्यास ' हातच्या कांकणाला आरसा कशाला ! ' या म्हणी-तल्यासारखीच आमची स्थिति आहे. यास्तव याच दोन राष्ट्रांची स्थिति ताडून पाहूं म्हणजे झालें.

४. कोणत्याही मनुष्याच्या स्थितीविषयीं विचार करायाचा झाला म्हणजे प्रथमची गोष्ट त्याला खायाला प्यायला आहे कीं नाहीं व त्यापाशीं पैसा आहे कीं नाहीं हिजविषयीं विचार करायाचा. हीच गोष्ट एकंदर राष्ट्रासही लागूं. या जगांत अन्नोदक हें प्राणधारणास अवश्यक असल्यामुळें सुखी राष्ट्राचें पाहिलें लक्षण म्हणजे सर्वांचा यथास्थितपणें निर्वाह चालणें हें होय. ज्याप्रमाणें सुखवस्तु कुटुंब म्हणजे कोणतें, तर ज्यांत कोणाला अन्नवस्त्राची ददात नाहीं तें; त्याप्रमाणें लक्षावधि, कोट्यावधि कुटुंबांचा समुच्चय जें राष्ट्र त्याची तरी चांगली स्थिति केव्हां समजायाची, तर जेव्हां कोणीही उद्योगी व प्रामाणिक मनुष्याला उदरनिर्वाहाची पंचाईत पडूं नये तेव्हां. * पण असें नसून जर ' घरांत

* फ्रान्सचा राजा चवथा हेन्री यानें थोडींच वर्षें पण फार उत्तम रीतीनें राज्य केलें. आपल्या प्रजेविषयीं त्याची इतकी कळकळ होती कीं प्रत्येक कुणब्याच्या थाळ्यांत दररोज कोंबडें पडेल अशा रीतीनें राज्याची व्यवस्था मी ठेवीन अशी त्यानें उमेद बाळगळी होती. नाहीं तर आमच्या परवांच्या राजमूर्ति ! यमपुरीचा रस्ता घडक दररोज वाहतो आहे, आणि टेंपल् साहेबांच्या व लिटन् साहेबांच्या इंग्लिस्तानच्या वाजि-रास तारा धूम चालल्या आहेत कीं, इकडे चोहोंकडे आबादानी आहे ! पुढील सुभाषितांत थोडा फरक केला असतां तें टेंपल साहेबांच्या मुंबा-पुरींतल्या पुतळ्याच्या चहुत्र्यावर किती उत्तम शोभेल बरें !—

वैद्यराज नमस्तुभ्यं यमराजसहोदर ।
त्वयि विन्यस्तभारोऽयं कृतांतः सुखमेधते ॥

वाजे नकारधंटा ' ही एकाद्या राष्ट्राची स्थिति असली तर मग तेथें कलाकौशल्याचा, विद्येचा, राजवैभवाचा वगैरे केवढाही थाटमाट दृष्टीस पडला तरी तें राष्ट्र भिकारच समजलें पाहिजे; व अशा राष्ट्राचा राजा यास प्रजापालक हें नांवही शोभत नाहीं. त्याचें नृपतित्व म्हटलें म्हणजे धनगर जसा आपल्या प्रजेस कोणाचा उपद्रव लागूं नये म्हणून व निवाऱ्याकरतां मेंढवाड्यांत कोंडून ठेवतो; पण तें सर्व कशाकरतां ? तर लोकर वाढली कीं कातरावी व गिऱ्हाईक आलें कीं ' अजापुत्रं बलिं दद्यात् ' या वचनास अनुसरावें म्हणून ! तर अशा प्रकारची ज्या राज्यांतली स्थिति असेल तेथल्या लोकांस किती सुख लागणार आहे हें कोणासही सांगावयास नकोच. तेव्हां निर्वाहाच्या साधनांच्या संबंधानें विचार केला तर इंग्रेज लोकांच्या व हिंदु लोकांच्या स्थितींत केवढें अंतर आढळेल बरें ? ज्या इंग्रेज लोकांचें पृथ्वीच्या चारी खंडांत राज्य आहे, ज्यांनीं सारें भूमंडळ आपल्या वाणिज्यानें ग्रासून टाकलें आहे, व ज्यांच्या देशांत हजारों टोलेजंग कारखाने आहेत ते कोणीकडे; आणि ज्या हिंदु लोकांचीं मोठमोठीं संस्थानें म्हणजे परकी लोकांच्या सर्वथा अंकित, त्यांतूनही त्यांत पाहिल्या प्रतीची अव्यवस्था, ज्यांचा व्यापार ( कीं ज्याच्या योगानें व्हेनेशियन लोक, फिरंगी, वलंदाजी हे एकेक पूर्वी गब्बर होऊन गेले, व ज्यामुळें या देशाची ' सुवर्णद्वीपकल्प ' अशी आख्या पडली होती ) आतां इतका मेट्याकुटीला आला आहे कीं, चूल पेटवायाच्या काडीपासून सुद्धां त्यास परकी लोकांच्या तोंडाकडे बघणें जरूर आणि ज्यांचें दयाळू सरकार तर त्यांवर इतकी मेहेरबानी करतें कीं खबरदार कोणी आमच्या झाडाचें पान तोडाल तर किंवा जमिनींतून मीठ काढाल तर !—ती विचारी दुबळी एतद्देशीय प्रजा कोणीकडे ! हल्लीं आमच्या लोकांत त्राण म्हटलें म्हणजे सात रुपयांवारी हडेलहपी करावी व आफगाणिस्थानांत थंडीनें कुडकुडून मरावें, पांच रुपयांवारी कुग्रामांत राहून गुराख्याचा धंदा करावा ( आणि खबरदार पांचाचे साहा केलेत तर; पांच रुपये पंचप्राणास हें त्रैराशिक का गैर आहे ! ) किंवा खांद्यावर असूड टाकून बैलांच्या पाठीवर राहावें, आणि या आर्यभूमीचें विलेखन करून मेघराजानें जर कृपा केली तर प्रथमतः सरकारची

पोतडी भरावी, राहिल्यासाहिल्यांत सावकारास फूल नाहीं फुलाची पाकळी वाहावी, आणि मग आपण खुशाल शानदार रागदारींत ‘ देवी श्रीविक्टुरिया सार्वभौमिणी ’ हीस कुडींत प्राण आहे तोंवर अत्यंत निष्ठापूर्वक आळवीत बसावें ! तेव्हां एकंदरींत पाहतां सुगींत व दुष्काळांत जें अंतर, अगर जेवणांत व भुकेंत जी तफावत, ती हल्लीं आमच्या राज्यकर्त्यांत व आमच्या राष्ट्रांत आहे !

५. आमच्या भाषेंत म्हण आहे कीं, ‘ अन्नमय प्राण व प्राणमय पराक्रम. ’ या म्हणीपैकीं वरील कलमांत एका अवयवाचा विचार झाला; अथवा त्यांतच दोहोंचेंही विवेचन झालें असें म्हणावयास हरकत नाहीं; कां कीं, पुढील प्रकार पहिल्यावरच सर्वथा अवलंबून राहणारा आहे. प्राणाला आधारभूत जें अन्न तेंच जर नाहीं, तर त्यावर ज्या पराक्रमाची इमारत त्याच्या उद्भवाची वार्ता कशाला हावी ! त्याप्रमाणेंच पराक्रमापासून निष्पन्न होणारी जी संपत्ति तिची कथा वरील मूलच्छेदन झाल्यानेंच आटपली म्हणून समजावें. ज्या बिचाऱ्यास निरंतर उदरनिर्वाहाची पंचाइत त्याच्या अंगीं हिंमत ती काय असणार ! त्यास केवळ उदरंभरित होऊन ज्याच्या त्याच्यापाशीं तुकडा खात लोळणें जरूर हें उघडच आहे. आज साठ सत्तर वर्षें या देशांत सारखी स्वस्थता नांदल्यानें व परकी लोकांचा जारी अंमल इतका काळपावेतों सारखा चालल्यानें आमच्या लोकांची किती शोचनीय स्थिति होऊन गेली आहे बरें ! इंग्लिश इतिहासकार हिंदुस्थानांतील शांततेचा मोठा महिमा गात असतात, पण ही शांतता त्यांच्या राष्ट्रास कितीही हितावह झाली असली तरी आम्हांस ती अत्यंत अनिष्टप्रद झाली आहे यांत संशय नाहीं.* मोठ्या भरभराटींत अस-

* आमच्या देशास इंग्रेज लोकांनीं केवळ हतवीर्य करून टाकून जी दुबळाई आणली आहे तीस स्वस्थता हें नांव देऊन तिचा महिमा ते कसा गातात तो पहाः—“ श्रीरंगपट्टणाच्या बाहेर एक मोठी थोरली निरुपयोगी मोडलेली तोफ पडली आहे. मोठमोठाल्या तोफांच्या गोळ्यांच्या राशी पडल्या आहेत. त्यांवर उगवलेल्या वेलांची हिरवींचार पानें त्या गोळ्यांचा तांबडा लाल जंग दोन्हीं एकत्र पाहिलीं असतां मोठी मौज दिसते. पुढें कधीं

[ पुढें चालू ]

णाऱ्या स्वतंत्र राष्ट्रांसही चिरकालिक स्वस्थता अपायकारक होते; मग ज्या दयाळू सरकाराची कदर इमल्याच्या खालच्या जमिनीपर्यंत, झाडावरच्या पानांपर्यंत, व जेवणांतल्या मिठापर्यंत, त्याच्या मगरमिठींत सांपडलेल्या बिचाऱ्या राष्ट्राची स्थिति तर काय सांगावी ? हल्लींच्या काळचा मनुष्य आणि पन्नास वर्षांमागचा मनुष्य यांची जर परस्पर तुलना केली, तर त्यांत केवढें अंतर दिसून येतें ! सध्यांचे जवान असले पठ्ठे आढळतात कीं त्यांस कोस दोन कोस मजल करायाची असली तरी सहसा गाडीवांचून व्हावयाचें नाहीं; तेच त्यांचे आजोबा वेळ पडल्यास तीस कोसांच्या मजलीलाही भीत नसत. हल्लींच्या तरुण विद्वानांस बचकभर भात असला कीं बस होतो, व शरीराचे असे मजबूत कीं युनिवर्सिटीच्या झग्यासकट वेळेनसार अल्हाद उडून जावयाचे; तीच बाजीरावसाहेबांची सव्वा शेराची व मक्याच्या कणसांची आख्या सर्वविश्रुतच आहे; व त्या वेळच्या शरीरसामर्थ्याचे मासले अद्यापही दृष्टीस पडत नाहींतसें नाहीं. मागला आयुर्दाय असा कीं, सवाई माधवरावाच्या बरोबर जनन झाल्याची निशाणी गज-

---

[ मागील पृष्ठावरून पुढें चालू ].

तोफेचा आवाज ऐकूं येणार नाहीं अशा वेळाचें एक मंगळदायक चिन्ह आहे ! ! ! " ( आमेन ! )

[ मॉरिसकृत हिंदुस्तानचा इतिहास ]

दुसरा धन्यवाद एतद्देशीय ग्रंथकारांच्या मुखें ऐका:—

" अशी पेंढाऱ्यांची समाप्ति झाली. जे शेंकडों मनुष्यांस अनिर्वाच्य पीडा देणारे त्यांच्या नाशार्थ इंग्लिश सरकारानें इतका मोठा श्रम केला हें त्या सरकारास मोठें भूषण होय. राज्याकरितां युद्धें करण्याची चाल सर्वत्र आहे, आणि हिंदुस्थानांतील राजांनीं आपण स्वतः फौजेच्या हातून प्रजा लुटल्याच्या आणि लुटारू बाळगल्याच्या कथा वर आल्या आहेत; परंतु लुटारू आणि हत्या करणारे ह्यांपासून प्रजेस सोडविण्याकरितां इतकें द्रव्य खर्चून श्रमानें युद्ध केल्याचें उदाहरण हें पहिलेंच आहे ! "

[ जांभेकरकृत हिं० इ० ]

नींची कुंची घातलेले एक भटजी येथें नुकते निवर्तले,* व 'शतायुर्वै पुरुषः' या श्रुतीची भरपाई तिच्या जनकापासून चोपून घेणारी, व एकादें दुसरें अधिकच पण कमी नाहीं, अशी मंडळी शेंकडों असे. पण आतां काय विचारतां? विशी म्हणजे ऐन उमेद (संसाराचा स्पर्शकाल!) तिशी म्हणजे मध्यम काल, व चाळिशी म्हणजे मोक्षकाल! मग काय, कोणी गटारांत बाटलाबाईच्या मिठीसकट जे कलंडले ते त्याच अप्सरेसकट इंद्रभुवनाच्या वाटेला लागले; कोणी युनिवर्सिटीच्या पदव्या व पदकें यांचा हव्यास धरून व खडतर अभ्यास करून खासे विलायती वकील बनले, पण ती सनद जेव्हां लोकांतरींच्या कोर्टावर रुजू करून घ्यावी तेव्हां उपयोगी; त्याप्रमाणेंच कोणीं साहेबाराधनेच्या कामीं असे काबाडकष्ट केले कीं शेवटीं त्यांच्या पांढऱ्या पायांपाशींच त्यांनीं राम म्हटला (अथवा छे छे! राम नव्हे; परमेश्वर ऊर्फ अल्ला)! याप्रमाणेंच पुरुषाच्या अंगीं अवश्य अपेक्षित असे जे शौर्यादि गुण त्यांचाही आलीकडे किती लोप होऊन गेला आहे हें सांगावयास नकोच. मागें सामान्य मनुष्याच्या अंगींही इतकी धमक होती कीं, येवढा राघोबा दादा, पण त्यास रामशास्त्री यांनीं देहान्त प्रायश्चित्ताचा खडखडीत जाबाब तोंडावर दिला. नाहीं तर आतांचे एकेक वीर महावीर! साहेब बहादूर म्हणतात ना अमुक अमुक गोष्ट करावी म्हणून; ठीक आहे, आम्ही कांहीं साहेबांच्या बाहेर नाहीं! आजपर्यंत ज्यांनीं आम्हांला भाकरी चारली, व ज्यांच्या कृपेनें आम्ही या अधिकारावर आलों आहों, त्यांच्याशीं कां निमकहरामी करायाची! छे छे. असला मात्रागमनीपणा आम्हीं केला तर तो कोठें फेडूं! आतां लोकांचे आम्ही मुकत्यार म्हणवतों खरें, व आमच्या बेवकुवीनें व लांगूलचालनानें एकंदर रयतेचें नुकसान होतें हेंही खरें; पण या गोष्टींचा विचार

* येथें शनवारांत एक भटजी अठ्याण्णव वर्षांचे होऊन वारले. त्यांचा जन्म सवाई माधवराव ज्या दिवशीं पुरंदरावर जन्मले त्या दिवशीं झाला होता. वरील पेशव्यांचा जन्म म्हणजे कोण आणीबाणीचा प्रसंग होता हें इतिहासज्ञांस किंबहुना इकडील सामान्य जनासही विदित आहेच; तेव्हां त्या दिवशीं जेवढीं मुलें जनन पावलीं तेवढ्यांस सरकारांतून गजनीच्या कुंच्या वाटल्या गेल्या! वरील मनुष्यानें महाराष्ट्र देशाची किती स्थित्यंतरें पाहिलीं म्हणायाचीं!!

करण्याची आम्हांला काय जरूर आहे ? साहेब आमचे मायबाप, त्यांची आज्ञा आम्हांला शिरसावंद्य आहे, येवढी गोष्ट आम्हांला समजते ! असो, तर हा जो पोंचटपणा व दुबळेपणा आलीकडे आम्हांस इतका खिळून राहिला आहे तो कशामुळें बरें ? तर ह्यास वरील दीर्घकालिक स्वस्थता व सरकारची कदर हींच दोन कारणें होत यांत संशय नाहीं.

आतां वरील गोष्टींत इंग्रेज लोकांची व आमची तुलना करावयाची म्हटलं म्हणजे जमीन व अस्मान किंवा रात्र आणि दिवस यांची तुलना करूं पाहण्यासारखेंच होय हें उघड आहे. आकाशपंथानें यदृच्छेनें गमन करणाऱ्या पक्ष्यांत व दोन्ही पांख उपटून लोळागोळा करून टाकलेल्या पांखरांत जें अंतर तेंच इंग्लंडच्या लोकांत व आम्हांत आहे. इंग्लिश लोक आपणांस आज सार्वभौम म्हणवीत आहेत; व आमची स्थिति पाहिली तर 'इसापनीती' तील खुळ्या मांजरांप्रमाणें झाली आहे. त्यांनीं आपल्या खव्याची पंचाईत जशी वानराकडे नेमिली, आणि त्या लबाडानें सारा तंटा गमतीनें मिटवून सारें भांडें पालथें घातलें, आणि सांगितलें कीं मी तुमच्या तंट्याचें कारणच नाहींसें करून टाकलें, आतां खव्याबद्दल चुरमुरे खात मुकाट्यानें चालते व्हा म्हणजे झालें; त्याप्रमाणेंच आम्हीं आपल्या भांडणांत परद्वीपस्थ लोकांस घालून 'धन्याला धत्तुरा आणि चाकराला मलिदा' अशी आपली स्थिति करून घेतली. * आतां

---

* वरील उल्लेख आमच्या वाचकांपैकीं कोणास कदाचित् मोठा भयंकर वाटेल अशी कोणास भ्रांति पडल्यास त्यानें मेकॉले साहेबांचे पुढील [illegible] —

"Dupleix was Perfectly aware that the most easy and convenient way in which a European adventurer could exercise sovereignty in India, was to govern the motions, and to speak through the mouth of some glittering puppet dignified by the title of Nabob or Nizam. The arts both of war and policy, which a few years later were employed with such signal success by the English, were first

( पुढें चालू )

येवढें बरें आहे कीं आमचे राज्यकर्ते मागल्या इमामदांडग्यासारखे रानवट नाहींत, व सद्धर्माचा प्रकाश त्यांच्या अंतःकरणांत फांकला असल्यामुळें ते आम्हांवर नीतीनेंऽ व दयेनें राज्य करीत आहेत; पहाः— शिवाय आमचें सर्वस्व हस्तगत करून घेण्यांत त्यांचा स्तुत्य उद्देश येवढाच आहे, कीं आम्ही जाणते होऊन आपली मालमत्ता वहिवाटण्याजोगे शहाणे व्हावें, म्हणजे त्यांची ईश्वरदत्त पालकता आटपली ! हा अमृतसिद्धियोग केव्हां यावयाचा असेल तो असो; पण हल्लीं तर आमची स्थिति फार शोचनीय झाली आहे. आम्ही आमच्या राज्यकर्त्यांच्या कच्छपीं लागून त्यांच्या उसन्या वैभवानें आपणास गौरवू पाहत

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

understood and practised by this ingenious and aspiring Frenchman. ”

“ Those names once so august and formidable, still remain. There is still a Nabob of the Carnatic, who lives on a pension allowed to him by the English out of the revenues of the province which his ancestors ruled. There is still a Nizam, whose capital is overawed by a British cantonment, and to whom a British resident gives, under the name of advice, commands which are not to be disputed There is still a Mogul, who is permitted to play at holding courts and receiving petitons, but who has less power to help or hurt than the youngest civil servant of the Company.”

*Lord Clive*

ऽ नीतिमत्ता हा इंग्रेजी राज्याचा जणूं काय अंगभूतच गुण हा सिद्धांत पुष्कळांनीं गृहीत धरल्यासारखा दिसतो. मेकॉले साहेबांची पुढील घमेंडी पहाः-

“ The only protection which the conquered could find was in the moderation, the clemency the enlarged policy of the conquerors. That protection, at a later peroid, they found. But at first English power came among them unaccompanied by English morality. ”

*Warren Hastings.*

आहों, व ' आमचा हिंदुस्थानचा खजिना, ' ' आमचें आफगाणि-स्थानांत गेलेलें लष्कर ', वगैरे प्रयोग बेधडक करतों. पण वस्तुतः आमचें तें काय आतां उरलें आहे ? आम्ही स्वतः तरी आपले आपण आहों काय ? उद्यां जर राशियाची स्वारी हिंदुस्थानावर झाली, आणि पिन्हस् राजानें टारेंटाईन लोकांवर किंवा नेपोलियननें फ्रेंच लोकांवर जशी सक्ती केली तशी या राष्ट्रांवर जर इंग्रजांनीं केली आणि हडेल् हप् करायाला लावून लाख दोन लाख नवी फौज बनवली, तर आम्हांला झक मारीत घरांतून निघायाला नको काय ? सरकारानें सांगायाला दुष्काळनिवारणार्थ आणि खरोखरी पाहतां गिलच्यांच्या मुलखांतील गृध्रपंक्तीच्या तर्पणार्थ जी येथें उदीमपट्टी सुरू केली ती लोकांच्या खिशांतले पैसे बेलाशक उपटण्या-खेरीज दुसरें काय आहे ? वरील कर म्हणजे उद्योगीपणावर कर व आळशीपणाला बक्षीस असा नव्हे काय ? पिन्या चांभार जोडे चांगले शिवतो, अमुक अमुक न्हावी चांगली हजामत करितो, कीं सरकार धांवलें त्याच्याकडे; टाक जास्ती पट्टी, नाहीं तर तुझी अरी व धोपटी ठेवूं अडकवून ! अमक्या अमक्यानें जास्त मेहनत करून आपला उदीम चांगल्या रंगरूपास आणला कीं बसलाच जास्त बोजा त्याच्या पाठीवर ! एकूण या करापासून मुक्त कोण, तर जो चोहोंचा आकडा ठोकून खुशाल घरीं बसेल तो, किंवा ब्रह्मदेवानें ज्याच्या कपाळावर ' ढ ' हा राजमान्य शिक्का मारला असेल तो ! या अनर्थापेक्षां गायकवाडी खिचडी, शिंद्यांचें लक्षभोजन, किंवा भटांची रमण्यांतली दक्षिणा हीं हजार वाट्यांनीं बरी नव्हेत काय ? पण ते सर्व रानटी प्रकार, व हीं सुधारलेली व प्रतिष्ठित पश्यतोहरता ! तर स्वातंत्र्य, पराक्रम, अभिमान, वगैरे गोष्टींत इंग्लंडांतील प्रजेची व येथील प्रजेची तुलना कशाला हावी ? नांवाला जरी दोन्ही राष्ट्रांतील मनुष्य-संख्या मलिकामा अझमा विक्टोरिया साहेबांची अंकित आहे, तरी तिकडचा प्रकार वस्तुतः पाहतां येथच्या अगदीं उलट आहे. तिकडे मलि-कामा अझमा बाईसाहेबांचा मानमरातब जरी सारे लोक यथास्थितपणें ठेवतात, तरी त्याचा जितका भाग त्यांस स्वतःच्या गुणावरून मिळतो

तितका त्यांच्या अधिकारावरून मिळत नाहीं. त्यांच्याच जागीं जर * मेरीसारखी एकादी कृत्या असती, तर याच प्रजेनें तिची अवज्ञा तरी केली असती, किंवा तिला गादीवरून तरी काढलें असतें. बाकी इंग्लंडचा राजाधिकार तेथील लोकांनीं आणतां आणतां इतका संपुष्टांत आणून ठेवला आहे कीं जसे देव देव्हाऱ्यांत असतात व त्यांनीं पंचोपचार-पूजा घ्यावी आणि मुकाट्यानें असावें, त्यासारखीच तेथील राजपदाची स्थिति आहे. लढाई किंवा तह करणें, कायदा कानू चालू करणें, कर बसवणें वगैरे सर्व गोष्टी मुख्यतः लोकांच्याच हातांत आहेत. महाराणी-साहेबांनीं तयार झालेल्या कायद्यावर आपली राजकीय मुद्रा ठोकावी, व सालीना सहकुटुंब सहपरिवार अमुक अमुक पेन्शन घेत जावें, इतकीच व्यवस्था आहे. पण तोच प्रकार इकडे काय आहे तो पहा! तिकडे लोकांचा काय तो अधिकार व राजाचा सरासरी कांहीं नाहीं; इकडे लोक म्हणजे गुराढोरांसमान व सरकार म्हणजे काय तें परब्रह्म! बाकी इकडे तरी सोंगें सारीं आहेत, नाहींतर्शी नाहीं. कायदेकौन्सिलांत मेंबर आहेत, म्युनिसिपालिटींत लोकांचे मुकत्यार आहेत, पुणेंमुंबईच्या लोकांस जुरी (पंच) हा अधिकार दिलेला आहे, नेटिव कारभारी आहेत, नेटिव सिविल सर्वंट होताहेत, कोणी येथून विलायतेस कोंवळ्या वयांत जाण्याची कंबर बांधील तर त्यास तिकडे सिविलियन होण्याची सोय ठेवलेली आहे, वर्तमानपत्रांत लिहिण्याची मुभा आहे. सर्व कांहीं आहे. पण हे सर्व प्रकार म्हटले म्हणजे केवळ आपातरमणीय होत. तोंडानें नाहीं म्हणायाचें तें हातानें नाहीं म्हणायाचें, किंवा न कर्त्याचा वार शनवार, यांतलीच एकंदर व्यवस्था! वरील सभांतलीं मेंबरें म्हटलीं म्हणजे म्हणतात ना,—

---

* मेरी ही एलिजाबेथ राणीची वहीण. दोघींचा धर्म अनुक्रमेंकरून क्याथलिक व प्रॉटेस्टंट हा होता. मेरीनें धर्माच्या बाबतींत काय कहर करून सोडला होता तो इतिहासांत विदित आहेच. याचें थोडेंसें स्वरूप पुढील उल्लेखावरून ध्यानांत येईल. मेरी बाईनें जी मंडळी जाळून मारली तिची याद इतिहासांत येणेंप्रमाणें आढळतेः—५ बिशप, २१ पाद्री, ८ गृहस्थ, ८४ व्यापारी, १०० शेतकरी, कुणबी वगैरे, ५५ बायका आणि ४ पोरें.

खायला अगडबंब आणि म्हणायला मुकस्तंभ, यांतलीच बहुतेक स्थिति; जुरीचा अधिकार आहे, पण त्यावर हायकोर्टाची मखलाशी ठेवलेलीच आहे; नेटिव्ह कारभारी आहेत, पण ते कोण? वटोदरपुरस्थ मद्रदेशोद्भव शल्यमामा (यांनीं सारथ्यकर्म जसें बजावलें, त्याप्रमाणेंच तद्देशोद्भव नगरपुंगव राज्यरूप शकटाची व्यवस्था करणार!) आणि करवीरस्थ आडनांवी बरवे! सदहूप्रमाणेंच नेटिव सिविल सर्वंट,—ते कोण? खानबहादुरांचे बेटे अगर रावबहादुरांचे चिरंजीव; विलायतेची यात्रा करून सिविलियन होण्याचा रस्ता खुला आहे, पण तें होणार केव्हां? तर लोणचें पापड बरोबर देऊन एकाद्या हौशानें आपल्या राजबिंड्याचें उपनयन जेव्हां मोक्षमूलर भट्टाचार्यांच्या करवीं टेम्सनदीच्या पवित्र तीरीं करविण्याचा संकल्प येथें सोडून ठेवावा तेव्हां. याप्रमाणेंच वर्तमानपत्रांचें स्वातंत्र्य, कोणावर कोणत्या वेळेस काय गदा येईल याचा नेम म्हणून नाहीं! सारांश इंग्लंडांतील प्रजेचें स्वातंत्र्य खरोखरच्या जलप्रवाहाप्रमाणें आहे; आणि इकडे जी केसरिहिंदची प्रजा आहे तिला मृगजलाचा लाभ करून दिलेला आहे. हें मृगजल अशा खुबीचें आहे, कीं जो दूरस्थ आहे त्यास अर्थातच तें थेट पाण्यासारखें वाटणार आहे, व वाटत आहे.

आतां विद्या, कला वगैरेंच्या संबंधानें भरतखंडवासी लोकांत व श्वेतद्वीपिय राष्ट्रांत कितीसें अंतर आहे तें पाहूं. हें अंतर वरच्या साऱ्या अंतरांप्रमाणेंच स्पष्ट आहे. अमेरिकेंत प्रतिवर्षीं नवीन विद्या व कला उदयास येत आहेत. आज काय नाद धरण्याची युक्ति सांपडली,—ती अशी कीं अमक्या अमक्यानें आज वक्तृत्व केलें, किंवा अमकी अमकीनें आज खूप शानदार आलाप घेतले, तर तेंच बोलणें व तेंच गाणें यंत्रावर धरून ठेवून पाहिजे तर न्यूफौंडलंड बेटांत सन २८८२ सालीं ऐकावें!!!—उद्यां काय मेघकन्या जी विद्युत् तिला वाहक करून अग्निरथाच्या जागीं विद्युद्रथ निघाला! परवां काय सूर्यकिरणांसच दूत करून 'मेघदूता' वर ताण केली! याप्रमाणें पाश्चात्यांच्या बुद्धिसागराचे एकेक तरंग मेघमंडळावरही जाऊन आदळताहेत! आमच्या देशांत पाहावें तों नव्या विद्या व कला तर राहिल्याच, पण हजारों वर्षें ज्यांची येथें वस्ती झाली त्या सुद्धां बिचाऱ्या निराश्रित होत्सात्या विगलित होऊं पाहताहेत, व

[library stamp] ७७

किल्येक तर झाल्या सुद्धां ! दवलतावाजीच्या जागीं फूलस्केप आला, आंवळ्याच्या जागीं साटीण आली, कषायांच्या जागीं विलायती रस आले, ' हर हर ' च्या जागीं ' हडेल हप ' येऊन बसलें, शालजोडीच्या जागीं गौन आला,—याप्रमाणें क्रमाक्रमानें एकेक आदेश होत गेले. नाहीं म्हणावयाला अद्याप एक मात्र राहिलें आहे, कीं श्राद्धपक्ष चालवायालाही जुनीं भटें जीं येतात, त्यापेक्षां भट्टमोक्षमूलर यांचे छात्र किंवा बोधालिंगाचार्यांचे अंतेवासी यांस अद्याप इकडे कोणी टपालांतून मागवीत नाहीं !! असो; तर ही स्थितिही अत्यंत लज्जास्पद व भयप्रद होय. आजपर्यंत या देशावरच काय, पण पृथ्वींतल्या साऱ्या देशांवर परकी लोकांचे अंमल गाजलेले आहेत. पण सध्यां आमच्या येथें जी स्थिति दृष्टिगोचर होत आहे तिची तोड कोठेंही सांपडावयाची नाहीं. येवढें रोमन लोकांचें हजार दोन हजार वर्षें चाललेलें साम्राज्य; पण काबीज केलेल्या मुलखांवर एकेक प्रोकॉनसल ( मामलेदार ) रोम शहरांतून जात असे, व त्याच्या बंदोबस्ताकरतां फौजफाटा ठेवलेला असे, येवढी काय ती परकी अमलाची निशाणी; बाकी सारी व्यवस्था त्या त्या देशाच्या रिवाजाप्रमाणेंच विनहरकत चालत असे. मूळचीच राज्यपद्धति, मूळचाच धर्म, मूळचेच रीतरिवाज, असा चोहोंकडे प्रकार असून जसा घोड्याचा लगाम मात्र हातांत असावा त्याप्रमाणें केवळ राज्यसूत्र रोमकपत्तनस्थ राज्यधुरंधराकडे असे. असा संप्रदाय होता म्हणूनच येवढें पृथ्वीचें राज्य एका शहरांतील लोक वहिवाटीत होते, आणि तें किती काळ पावेतों, तर दीड दोन हजार वर्षें ! बरें, येवढ्या विस्तीर्ण छायेखालीं असणारीं राष्ट्रें सावटानें जसें रोपडें बिघडतात त्याचप्रमाणें दुरवस्थेस पोंचलीं कीं काय ! छे, दिवसेंदिवस त्यांच्या राज्यकर्त्यांची सुधारणा त्यांच्या ठायीं मुरून ते हळू हळू त्यांच्याच पदवीला येऊन पोंचले. हल्लीं येवढालीं प्रबळ राष्ट्रें युरोपांत झालीं आहेत, हीं सर्व वरील अस्तंगत साम्राज्याचीं अपत्येंच म्हटलीं असतां चालतील, तर अशी रूमच्या बादशाहीची गोष्ट होती. या बादशाहीचें ऐश्वर्य पुढें ईश्वरसत्तेनें आरबस्थानांत व तातारांत वनपशूंप्रमाणें हिंडणाऱ्या राष्ट्रांस प्राप्त झालें. त्यांची इमामशाही जशी लांबलांबच्या मुलखांवर गाजली व अजूनही गाजत आहे,

त्याप्रमाणेंच येथेंही गाजली. पण त्यांच्या तरी राज्यव्यवस्थेचा एकंदर प्रकार वरच्यासारखाच. मेकॉले, मॉरिस वगैरे सत्यापलापी व दुराग्रही मंडळीची बडबड कांहींही असो. पण आलीकडे ही गोष्ट बहुधा सर्वांस महशूर आहे कीं, मागली मोगलाई हल्लींच्या इंग्रेजशाहीपेक्षां शतपट बरी. ज्या राज्यांत ब्राह्मण दिवाणगिरीच्या कामावर असत व रजपूत सेनापति असत ते कोणीकडे, आणि ज्यांत प्रिवी इन्स्पेक्टरपर्यंत सुद्धां गोऱ्यावांचून चालायाचें नाहीं व ब्राह्मण म्हणजे कवडीचा माल ठरलेलें, असलें सध्यांचें सुधारलेलें सद्धर्मी व न्यायाचें आगर म्हणविणारें पाश्चात्य साम्राज्य कोणीकडे! या गोऱ्या बादशाहीची जिकडे जिकडे स्वारी फिरली आहे तेथें तेथें तिजबरोबर खराटा फिरत चालला आहे. आमचे नामधारी पाताळवासी इंडियन लोक यांच्यावर तर पवित्र आत्म्याची झडप पहिल्या तडाख्यास बसून त्यांस त्यानें अमेरिकेंतून पार धुवून काढलें; आमच्या इकडे तरी दिवसेंदिवस तोच प्रकार होऊं पहात आहे. इंग्रेजी काव्याखालीं आमचें स्वातंत्र्य नष्ट झालें, कायद्याखालीं आम्ही कफल्लक होऊन बसलों, पाद्री साहेबांस पुढें करून आम्हांस प्रभूच्या कोंडवाड्यांत नेऊन गुदरण्याचे प्रयत्न दीर्घकाळ चालू आहेतच, म्यांचेस्टरच्या वगैरे यंत्रांत येथील वाणिज्याचा चुराडा झालाच, आणि एकंदर विद्या व कला याही लुप्त होऊन जाऊन इंग्रेजी बादशाहीची मगरमिठी आम्हांस पक्की बसण्याचा समय दिसत आहे!

तेव्हां एकंदरींत पाहतां तूर्त आम्ही आकाबाईच्या फेऱ्यांत पुरें सांपडलों आहों असें म्हणायास हरकत नाहीं. जिकडे जिकडे दृष्टि फेंकावी तिकडे तिकडे आनंदच आनंद हल्लीं नजरेस येत आहे. कोणत्याही बाजूनें आम्ही धड राहिलों आहों असें नाहीं. निवळ रानटी राष्ट्रांची स्थिति एका अंशानें चांगली असते, तसें आमचें नाहीं, किंवा सुधारलेल्यांत हल्लीं जी प्रमुख होऊन बसलीं आहेत, त्यांस ज्या सोई असतात त्याही आम्हांस नाहींत. आम्ही धड ना विद्वान् ना अविद्वान्, ना रानटी ना सुधारलेले, ना स्वतंत्र ना परतंत्र, ना हिंदु ना खिस्ती, ना आर्य ना म्लेंच्छ, अशा कांहीं विलक्षण कचाटींत सध्यां येऊन पडलेलों आहों. या महागर्तेंतून काढून आम्हांस कोण ईश्वराचे घरचा लाल पुनः मार्गास लावील तो लावो! आमचे इमाम-

बंधू अफगाण लोक किंवा आफ्रिकावासी झुलू वगैरे लोक यांच्यांत आजच्या घटकेला इतकी तरी तरतरी आहे, कीं आम्ही आपापसांत भांडूं, लढूं, एकमेकांच्या उरावर बसूं, काय पाहिजे तें करूं, पण शेजारचे कोणी शेकोजी बळेंच दिंडींतून घुसून आमच्या घरांत येऊन लांडे कारभार करायाला लागले, कीं तें आम्हांला विलकूल खपायाचें नाहीं, असें त्यांच्यापैकीं प्रत्येक व्यक्तीला वाटत आहे. काफर म्हटला कीं तत्क्षणीं घरदार सोडून देऊन त्याच्याशीं सामन्याला जाऊन उभें राहावें ही एक जबरदस्त गोष्ट वरील राष्ट्रांच्या जणों काय हाडीं खिळलेली आहे. पण आपल्या येथला प्रकार यांच्या अगदीं उलट; आमच्या अंगीं येशूनें उपदेशिलेली शांति ओतप्रोत भरलेली आहे. काफर सोडून महाकाफर कां येईना; आम्हांला त्याची कांहीं क्षितीच नाहीं ! विलायतेतल्या लोकांनीं चार हजार कोसांवरून आमच्या नांवानें × × करावा " कीं अरे, तुमची चमडी जाण्याची वेळ आली तरी तुम्ही कांहीं हूं कां चूं सुद्धां करीत नाहीं; तुम्ही तरी भले निगरगट्ट बोवा; " पण आम्हांला काय त्याची लाज आहे ! टेंपल साहेब लाखों प्रेतांचा ढीग केसरिहिंदच्या पुढें मांडून आपल्या देशीं चालले ना, आमचें त्यांना मानपत्र आहेच; राव. वरवे आपल्या यजमानास ' क्लीबे च पतिते पतौ ' या पाराशरस्मृतींत घालून आपलें पौरुष गाजवूं पहाताहेत ना; ठीक आहे. त्यांची तुतारी आम्हीं पतकरलीच! बाणेदार महाराजाला खुळा ठरवून त्याची " वाट लावली " आणि एकादें भेषपात्रसें पोर पाहून यजमानिणीच्या मांडीवर दिलें कीं मग झाली पुनः आयुर्मर्यादेपर्यंत चंगळ सुरू; अशा वेळीं रावबहादुर एकादा ल्हानसा तुकडा तर आपल्या तोंडावर टाकतील; येवढाच ' समाचार ' आपल्याला बस झाला ! तर एका तऱ्हेनें पाहतां रानवटपणाच्या स्थितींतला जो अनावर आवेश तो सर्व नाहींसा होऊन आम्ही केवळ प्रेतवत् होऊन राहिलों आहों. बरें, दुसऱ्या बाजूनें पाहतां सुधारलेल्या लोकांची बडी अक्कल व कर्तृत्व हें जर पाहावें, तर तेंही पण आमच्या अंगीं आलेलें नाहीं. आमचें ज्ञान म्हणजे इंग्रेजांचे उष्टेमाष्टे विचार, आमची सुधारणा म्हणजे त्यांचें बालिश अनुकरण, आमचें कर्तृत्व म्हटलें म्हणजे पार्लमेंटच्या जागीं सार्वजनिक सभा, सेंट पॉल चर्चच्या जागीं प्रार्थनामंदिर, व क्रिकेटच्या

जागीं क्रीडाभुवन ! एतावता 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' या म्हणीप्रमाणें आमच्यांत धड आमचें मूळचें तत्त्व राहिलें नाहीं, व आमच्या पाश्चात्य बंधूंच्या समागमेंकरून नवें पाणी आम्हांत दृष्टीस पडूं लागावें तेंही अजून तर आलें नाहीं. मग पुढें हें आमचें तारूं कोणच्या थडीला लागणार आहे तें परमेश्वर जाणे !

---

अतिवीर्यवतीव भेषजे बहुरल्पीयसि दृश्यते गुणः । *
'किरातार्जुनीय'

१. मागील अंकांत सांप्रतच्या लोकस्थितीचें निरूपण केलें आहे. आतां यापुढें तिची उपपत्ति करून सध्यांच्या दुर्दशेच्या निवारणार्थ काय काय केलें पाहिजे याविषयीं विचार करावयाचा.

२. सदरील विषयावर आजपर्यंत पुष्कळ विचार झालेला आहे हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. इंग्रेजी विद्येचा इकडे प्रसार व्हावयाला लागून लोकांचे ठायीं नवी विचारशक्ति जेव्हां जागृत झाली, व आपला देश, व आपले रीतरिवाज, आपला धर्म, वगैरे विषयांवर त्यांनीं विवेचन करण्यास जेव्हां आरंभ केला, तेव्हां अर्थातच आपल्या राष्ट्राची हालहवाल व इतरांची हालहवाल, आपली विद्यमान कालची स्थिति व पूर्वींच्या कालांतली स्थिति, या सर्व गोष्टींच्या संबंधानें आमच्या विद्वान् मंडळींत चर्चा होऊन ती आजपर्यंतही चालूच आहे. बहुश्रुत व विचारशील अशी चार मंडळी एकत्र जुळली असतां सदरील विषयाच्या संबंधानें कांहीं ना कांहीं तरी ऊहापोह झाल्याशिवाय राहताच नाहीं; कां कीं, हा विषय ज्याच्या त्याच्या दृष्टीसमोर जिकडे तिकडे आहेच. जोंवर कोणी मनुष्य आरोग्ययुक्त व स्वस्थ असतें तोंवर त्याच्या संबंधाची विचारपूस करण्याचें कांहीं कारणच नसतें; पण वरील दोन्ही स्थिति नाहींशा झाल्या असतां अर्थातच क्षणोक्षणीं व पदोपदीं त्याच्या संबंधानें पृच्छा उत्पन्न होणारी आहे. मग हें जर एका व्यक्तीविषयीं पाहतां खरें आहे, तर अवघ्या राष्ट्राची सर्वांपरी दैन्या-

---

* "जसें जलाल औषध हें थोडकें असलें तरी त्यांत पुष्कळ गुण दृष्टीस पडतो !"

वस्था दृष्टीस पडूं लागली असतां तिच्या संबंधानें हजारों जणांचे हजारों प्रकारें विचार निघणार आहेत हें कशाला सांगायाला पाहिजे !

आतां वरील अत्यंत महत्त्वाच्या विषयावर आजपर्यंत काय काय कोट्या निघाल्या आहेत त्या अगोदर दाखल करून यांतील तथ्यातथ्याचा निर्णय करूं.

वरील कोट्या अनंत आहेत. कोणी म्हणतात, आमच्या मूर्तिपूजेचें बंड शिरलें हें आमच्या देशाच्या अपायास कारण झालें; तेव्हां गिझनीच्या महंमदाचें व्रत जेव्हां येथें जारीनें चालू होईल, व तेहतीस कोटी देवांची खाशी कत्तल उडेल तेव्हां या हिंदुस्थानाला कांहींसें बरें वाटावयाला लागेल ! कोणी म्हणतात, जातिभेद हा समंध मनूच्या कारकीर्दीपासून आमच्या बोकांडीं बसला आहे, तर श्रीमत्परमहंसांच्या 'जुक्ती' चें किंवा जोतीबांच्या 'गुलामगिरी' चें साह्य घेऊन जेव्हां एका सपाट्यासरसा साऱ्या देशभर 'सबगोलंकार' करून टाकावा, व मिस्टर लिटलडेल आणि मिस अनुबाई (Anne) यांच्या सारखे गांधर्वविवाह लाखोगणती करून द्यावे, तेव्हांच आमची 'ऋषींच्या कारकीर्दी' तील सुधारणा आमची आम्हांला पुनः परत मिळेल ! कोणी म्हणतात, वैधव्यदशेंत ब्रह्मचर्यानें रहावें हें जें खूळ आमच्या जुन्या टोणप्यांनीं एतद्देशीय स्त्रियांस लावून दिलें आहे तें पायांखालीं तुडवून टाकून जॉन्सनच्या यजमानणीनें चाळीस वर्षांच्या ऐन उमरींत पोरांबाळांसकट इटालियन सारंग्याशीं पाट लावला व साऱ्या इंग्लंडची छीथू मागें टाकून देऊन आपल्या नव्या सासरीं जसा मुकाट्यानें पळ काढला, किंवा स्कॉटलंडच्या राणीसाहेबांनीं लागोपाठ तीन चार नवरे केले, तशी जेव्हां बहार सुरू होईल, तेव्हां इकडे बावनकशी कोरी करकरीत सुधारणा अवतीर्ण होईल ! कोणी म्हणतात वनपशूंप्रमाणें झाडपाला व कणसें खाणें व भिकारड्यासारखें नुसतें पाणी पिणें हें सोडून देऊन 'वत्सतरी मडमडायिता'* हा जुन्या ऋषींचा पवित्र आचार जेव्हां मात्क्यान् सुरू होईल व बाटलाबाईच्या गळ्यांत मिठी मारून जेव्हां आम्ही गटारांत कोलंडूं लागूं, तेव्हां आमच्या अंगांत असा जोर येईल कीं, इंग्रेजांशीं किंवा रशियनांशीं सुद्धां टक्कर द्यावयाला आम्ही तयार

---

* 'उत्तररामचरिता' च्या चवथ्या अंकाचा विष्कंभक पहा.

होऊं! याप्रमाणें एक ना दोन,—शेंकडों कोट्या आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांनीं जातीनें ऐकल्याही असतील.

आतां वरील साऱ्या कोट्यांचा यथास्थितपणें विचार करणें हें किती आवश्यक आहे हें बहुधा कोणासही उघड दिसणारें आहे. त्यांतील कित्येक तर इतक्या असमंजसतेच्या आहेत कीं त्या नुसत्या नमूद केल्या कीं पुरे,—तेंच त्यांचें खंडन होय! बाकीच्यांत तरी प्रायः अज्ञानाचा व दुराग्रहाचा इतका अंश मिसळलेला आढळतो कीं थोडासा विचार केला असतां त्यांचा शुष्कपणा बहुधा कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहावयाचा नाहीं. शिवाय यापूर्वीं अनेक वेळां वरच्यांपैकीं कित्येक कोट्यांचा या पुस्तकांत प्रसंगोपात्त विचार झालेलाही आहे. यास्तव पूर्वोक्त कोटिक्रमांतला मुख्यांश मात्र ग्रहण करून त्यावर येथें विवेचन करूं म्हणजे बस होईल.

३. प्रस्तुतच्या राष्ट्रदशेची एक मोठी उपपत्ति आजपर्यंत काय करण्यांत आली आहे ती सर्वांस माहीत आहेच. ती ही कीं, आमचा धर्म हा फार खराब आहे. याच्या पायीं आज इतक्या खराबीस आम्ही आलों. तेव्हां याचा जेव्हां समूळ उच्छेद होईल तेव्हां आमच्या दृष्टीस चांगले दिवस पडतील! ही समजूत आमच्या आजपर्यंतच्या पंडितजनांत इतकी दृढपणें खिळून बसलेली आहे कीं, ती बहुधा प्रत्येकाच्या भाषणांत व लेखांत आढळत आली आहे. शिवाय हिंदुस्थानचा हा महारोग नाहींसा करून टाकून त्याची रक्तशुद्धि करण्याकरतां व त्यास पुनः सुदृढ करण्याकरतां मागील मंडळींनें आजपर्यंत सद्धर्मस्थापनेकरतांही केवढाले प्रयत्न केले आहेत ते आज सर्व प्रसिद्धच आहेत. पन्नास वर्षांपूर्वीचा ब्रह्मसमाज, वीस वर्षांपूर्वींचा प्रार्थनासमाज, शिवाय माजी होऊन बसलेले किंवा मधें मधें होणारे आर्यसमाज, सत्यशोधकसमाज वगैरे हे सर्व कोणास ऐकून तरी माहीत नाहींत? तर आतां या पहिल्या जबरदस्त कोटिक्रमाविषयीं विचार करूं.

हिंदु धर्माविषयीं हा येवढा तिरस्कार आमचे ठायीं आजपर्यंत कां बाणून राहिला आहे याचा जर विचार केला तर त्याचीं दोन मोठालीं

कारणें दिसतात. एक कारण मिशनरी मंडळी, व दुसरें आमचें आत्मविषयक अज्ञान. पाद्रीमंडळाचा पहिल्यापासूनचा बाणा तर जगजाहीर आहेच, कीं दुसरा धर्म म्हटला कीं तो हाणून पाडायाचा. त्यांच्या बुद्धीनें ईश्वरज्ञानाचा, नीतीचा व एकंदर ज्ञानाचा गठ्ठा काय तो ' पवित्र शास्त्रां ' त आकाशांतील देवबापानें सांठवून ठेवला आहे; तेव्हां बौद्ध, मुसलमान, हिंदु वगैरे चट सारे धर्म हे ईश्वराज्ञान, अनीति, व अज्ञान यांनीं ओतप्रोत भरलेले आहेत, व यास्तव त्यांचा जेवढा विध्वंस होईल तेवढा जगास हितावह, ही समजूत वरील पवित्र मंडळींच्या डोक्यांत अगदीं ठाम बसून गेली आहे. वस्तुतः पाहतां वरच्या इतका मूर्खपणाचा समज फारच थोडा आढळेल. विलायतेंत व एकंदर युरोपांत ख्रिस्ती धर्माची उत्तरोत्तर प्रतिष्ठा वाढत चालली आहे किंवा कमी होत आहे हें कोणाही विद्वान् व शोधक मनुष्यास सांगण्याची आज गरज उरली नाहीं. पण आपल्या मुख्य तळावर येवढा भडिमार सुरू आहे व तो दिवसेंदिवस अगदीं अंगाशीं येऊन लगटतो आहे, या जगप्रसिद्ध गोष्टीकडे कानाडोळा करून विलायतेंतल्या प्रेषित मंडळीनें या देशावर येऊन धाड घातली आहे, व येथील विद्वानांचीं मनें आमच्या धर्माच्या, आचारविचारांच्या वगैरेसंबंधानें पराकाष्ठेचीं दूषित करून टाकलीं आहेत. वस्तुतः पाहतां वरील दूषणप्रकार फारसा सिद्धीस जाऊं नये; कां कीं ख्रिस्ती धर्माची बळकटी व त्या लोकांची नीति वगैरे जगजाहीर आहेत. पण स्वतःविषयीं अज्ञान व दुसऱ्याविषयीं अयथार्थ बुद्धि हीं असलीं म्हणजे मनाचा हवा तो ग्रह बनण्यास उशीर नाहीं. आजपर्यंत आमच्या लोकांच्या मनानें ही समजूत बळकट धरलेली होती व अजूनही ती केवळ ढळली आहे असें नाहीं, कीं साहेबप्रणीत ग्रंथ म्हटला कीं तो केवळ वेदवचन, व साहेबांचें भाषण म्हटलें म्हणजे त्यांत असत्यतेचा म्हणून शिरकावच व्हावयाचा नाहीं. ज्या लोकांनीं पुराणांतरीं ऐकलेल्या गोष्टींची प्रचीती सर्वांस आणून दिली एवढें ज्यांचें बुद्धिवैभव त्यांचें मत अयथार्थ असेल तरी कसें ? या मतिभ्रमावरूनच आजपर्यंत मेकॉले सारख्यांचें ग्रंथप्रामाण्य व रे० विल्सन्सारख्यांचें वचनप्रामाण्य सर्वांनीं गृहीत केलें. वस्तुतः पाहतां वरील पंडितशिरोमणीस आमच्या संबंधांची कितीशी

माहिती असण्याचा संभव आहे बरें ? पण ही कल्पनाच अगोदर कोणाच्या डोक्यांत उतरेल तर सगळी पुढली गोष्ट ! तर आजपर्यंत आमच्या पुरातन धर्माच्या संबंधानें व आचारविचारांच्या संबंधानें जे जे अभिप्राय प्रगट झाले आहेत ते सर्व वरील मासल्याचे होत; म्हणजे परद्वीपस्थ व परधर्मी लोकांनीं अज्ञानास्तव व दुराग्रहास्तव जीं मतें ठोकून दिलीं त्यांचा तो अनुवाद होय.

वरील स्थिति आजपर्यंत चालत आली तें ठीकच झालें; त्यावांचून आम्हांला गतीच नव्हती. पण वरील मिंधेपणा व परमतावलंबन हें टाकून देऊन स्वतःच्या विवेचनशक्तीचा स्वतंत्रपणें उपयोग करून काय ठरतें तें पाहण्याचे आज दिवस आले आहेत. आज पांच पंचवीस वर्षांत एतद्देशीय व परदेशीय विद्यांचाही संस्कार आम्हांस बराच घडल्यामुळें आतां वरील 'पारंग्याचीं वाहिलें' कांठावर ठेवून भर धारेंत उडी झोकली असतांही चालेल असें आम्हांस वाटतें ! तर आतां केवळ स्वतंत्र रीतीनें प्रस्तुत विषयाचा विचार करूं.

आमची सुधारणा होण्यास हिंदु धर्म हा प्रतिबंधक होय असें जे म्हणतात, त्यास आम्ही असें विचारतों कीं, प्राचीन काळीं जी आमची सुधारणा गाजत होती तिच्या वेळेस हाच धर्म होता कीं नाहीं ? मग त्या वेळेस तो तीस कसा आडवा आला नाहीं बरें ? 'ऋषींच्या कारकीर्दी' त जर सुधारणेचा कळस झाला होता, तर त्याच ऋषींचीं वचनें आज आम्ही पाळीत आहों; मग प्राचीन व अर्वाचीन काळांत येवढा विपर्यास कां दृष्टीस पडावा बरें ? त्याप्रमाणेंच असाही चमत्कार आढळतो कीं, मूर्तिपूजादिक प्रकार जे सुधारणेस अत्यंत विरुद्ध म्हणून मानलेले ते सर्व साऱ्या प्राचीन राष्ट्रांतून तर जारीनें चालू होते. मिसर, ग्रीस, रोम वगैरे ठिकाणें म्हणजे मूर्तिपूजेचीं केवळ आगरें होतीं आणि असें असतां वरील राष्ट्रें उन्नतीच्या शिखराला चढलीं ! एडन् बागेमध्यें आमच्या आदिजनकानें व आदिजननीनें झाडाचें फळ खाल्लें, त्यामुळें आकाशांतील बाप कोपायमान होऊन त्यानें साऱ्या मनुष्यजातीला शाप दिला, पुढें त्यांचा एकुलता एक पुत्र हमीदार होऊन भूलोकावर आला आणि त्यास देवाच्या लाडक्या लोकांनीं हालअपेष्टा करून मारलें तेव्हां त्याच्या पवित्र

रक्तानें * सारी मानवजाति परिपूत झाली, वगैरे जीं पवित्र धर्माचीं सुधारणामूलभूत सत्य तत्त्वें तीं मिसरी मनोरे बांधणारांस व जगद्विजय करणाऱ्या शिकंदराच्या किंवा सीजराच्या शिपायांस बिलकुल माहीत नव्हतीं. तसेंच दुसऱ्या पक्षीं असेंही आढळतें कीं पवित्र शास्त्राचा प्रसाद ज्यास मिळतो त्याच्या अंगीं कांहीं अद्भुत संचार झालेला बिलकुल दृष्टीस पडत नाहीं. यास मोठें उदाहरण आमचे माजी धर्मबंधु गोमांतकी लोक यांचें आहे. तेथें पोपसाहेबांचें पवित्र प्रोक्षण साऱ्यांच्या डोक्यांवरून झालें असतां त्या जलबिंदूंचा प्रभाव आज तीनचारशें वर्षांत तर कांहींच नजरेस आला नाहीं. देवीच्या किंवा खंडोबाच्या पायां पडत असतां जी गोवेकरांची स्थिति होती तीच किंवा त्याहूनहा वाईट आज झाली आहे. मग गेल्या तीन चार शतकांत येशूची व मारवा देवीची भक्ति त्यांस फलद्रूप कां बरें झाली नाहीं ? तेव्हां दोन्ही बाजूंनीं पाहतां वरील सिद्धांताचा जम कांहींच बसत नाहीं.

आतां प्रस्तुत विषयाचा स्वरूपतःच जर विचार केला, तर तिकडूनही आमची तर अशी समजूत आजपर्यंत झाली आहे कीं, हवी तितकी सुधारणा होण्यास सध्यांचा हिंदु धर्म मोठासा बाधक आहे असें नाहीं. पहा कीं, सिंधु नदीच्या उल्लंघनाची एतद्देशीयांस मनाई आहे अशी जरी

---

* वरील शब्दांचा अर्थ आमच्या मराठी वाचकांस तर मुळींच कळायाचा नाहीं, यास्तव त्यांवर थोडेंसें व्याख्यान करणें इष्ट आहे. ख्रिस्ती धर्मांत येशूला 'अजापुत्र' अशी संज्ञा आहे; याचा अर्थ असा कीं, देवताच्या प्रसादार्थ पशूचें आलमन करण्याचा जसा सर्व प्राचीन राष्ट्रांतून सांप्रदाय होता, त्याप्रमाणेंच वरील देवपुत्राचें ऊर्फ अजापुत्राचें आकाशांतील बापाच्या कोपशांत्यर्थ हनन झालें. तेणेंकरून देवबापा खूष होऊन त्यानें असें शुभवर्तमान चोहोंकडे पिटविलें कीं जो आमच्या एकुलत्या एक पुत्रावर विश्वास ठेवील तो वरील महायज्ञाच्या पुण्याईनें पावन होत्साता स्वर्लोकीं अक्षय्य सुख पावेल; व जे विश्वास ठेवणार नाहींत त्यांस आम्ही अक्षय्य नरकांत लोटून देऊं. ख्रिस्ती धर्माचे जगद्गुरु पोपसाहेब यांनीं वरील यज्ञाचा पेटंट ( मालकीचा हक्क ) सारा आपणाकडे ठेवून ते पाहिजे त्यास स्वर्गलोकींचें तिकीट देत असतात हें इतिहासप्रसिद्धच आहे !

आजपर्यंत समजूत चालत आली आहे, तरी ज्या शिपायांनीं १८०७ व १८५७ सालीं यःकश्चित् कारणाकरतां एवढालीं बंडें केलीं तेच अफगाणिस्तानांत, इराणांत, माल्टा बेटांत मुकाम्यानें जाऊन आले कीं नाहीं? भर पेशवाईत राघोबा दादाचा वकील बर्कच्या बंगल्याशेजारीं उतरून तेथें इंग्रेजी सूर्याला अर्घ्यप्रदान करीत होता कीं नाहीं? त्याप्रमाणेंच परवां कांहीं मंडळी खुद्द श्रीनें पावन करून घेतली कीं नाहीं? पेशव्यांनीं थेट अटकेपर्यंत ज्या मराठ्या मारल्या त्या स्नानसंध्या अंतरायाची नाहीं असा आग्रह धरून व ' न नीचो यवनात्परः ' हीं महावचनें उराशीं बाळगून मारल्या काय! थोरले माधवराव साहेब जपजाप्यनिमग्न होऊन रामशास्त्रीबोवांचा जरासा खोळंबा झाला असतां त्या महाब्राह्मणानें खुद्द राजश्रीस काय उत्तर केलें बरें? मग या सर्व गोष्टींवरून पाहतां आमच्या धर्माच्या संबंधानें जी आजपर्यंत हाकाटी चालली आहे ती पोकळ आहे असें सिद्ध होत नाहीं काय? तुमचा धर्म वेडगळ व गैरसोईचा आहे म्हणून परम सोज्ज्वळ व अघळपघळ सोईचा असा हा गाण्याबजावण्याचा व डोळे मिटण्याचा धर्म आम्ही तुम्हांस लावून देतों, व तुमच्या लग्नाच्या चाली अगदीं अप्रयोजक आहेत यास्तव धरा एका हीन जाति विद्वानाला आणि सुशिक्षित ब्राह्मण विधवेला आणि द्या त्यांच्या पदराला गांठ, याप्रमाणें तुमच्यांत दुहेरी तिहेरी सुधारणा आम्ही करून देतों, किंवा उठली एक हिंदु लेडी आणि पडली एका टोपड्याच्या गळ्यांत, याप्रमाणें झोटिंगपाच्छाई न करतां पूर्वक्रमास अनुसरून जर आमची विद्वान् व लोकहितेच्छु म्हणविणारी मंडळी क्रमाक्रमानें सुधारणा करण्यास प्रवृत्त झाली असती तर फार बरें झालें असतें असें आम्हांस वाटतें. तसेंच हिंदु धर्माच्या आड वरचेवर लपून आपला कमकुवतपणा झांकण्यास जें आमच्या पुढारी मंडळीस आजपर्यंत फावलें तेंही फावलें नसतें!

४. आमच्या देशास दैन्य प्राप्त होण्याची दुसरी एक मोठी उपपत्ति पुष्कळ पंडितांच्या तोंडून अशी येते कीं, आमच्यांत बालविवाह शास्त्रोक्त आहे हें आम्ही दुर्बळ होण्यास कारण झालें आहे. या उपपत्तीची ही अशी मजा आहे कीं, ती मागील काळास बिलकुल लागू पडत नाहीं. जर बालविवाह हा आमच्या नाशास कारण, तर या कारणाचें कार्य आजपर्यंत कां बरें

प्रत्ययास आलें नाहीं ? निदान तीन हजार वर्षें वरील प्रचार येथें सुरू असला पाहिजे; मग त्याची हाकाटी गेल्या पांच पन्नास वर्षांतच कां कानीं यावी बरें ? आमचे आजे पणजे वगैरे मंडळी जी येवढी सुदृढ असे तीस वरील विवाह कसा बरें बाधक झाला नाहीं ? युरोपांत ज्याप्रमाणें वीस वर्षांच्या, तीस वर्षांच्या किंवा याहूनही अधिक उमरीच्या कुमारींचा विवाह होतो व पुरुषांचेंही सदर्हूप्रमाणें, तसा प्रकार पूर्वी इकडे चालू होता काय ? आमचे आजे पणजे नुकते नुकते साऱ्या हिंदुस्थानभर धुमश्चक्री करीत असतां आम्हीच एक दोन पिढ्यांत वाऱ्याशीं भांडायाजोगते जे झालों याचें अपेश बालविवाहावर कसें देतां येईल ? शिवाय ज्या ब्राह्मणेतर जातींस 'अष्टवर्षा भवेत्कन्या' हें सूत्र लागू नाहीं त्यांच्यांत तरी आज पहिल्या इतका जोम आढळतो काय ? तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करतां वरील उपपत्तींतही 'जुक्ती' चा फारसा अंश उरत नाहीं.

५. याप्रमाणेंच जातिभेद, स्त्रीशिक्षण, वगैरे विषयांच्या संबंधानें जेवढ्या कोड्या आजपर्यंत पुढें आल्या आहेत त्या सर्वांची व्यवस्था लागते. आमचेच पंडित इंग्रेज ग्रंथकारांचा अनुवाद करून जर आम्हांस सांगतात, कीं शिकंदर बादशाहानें पंजाबावर स्वारी केली त्यावेळीं जी या देशाची स्थिति होती तीच आज आहे, तर मूर्तिपूजेच्या किंवा जातिभेदाच्या नांवानें हांका मारण्यांत काय हांशील आहे ? कार्यकारणांचा परस्पर जो नित्य-संबंध आहे त्यास कालांतरानें विपर्यास पडत असतो काय ? पोरस् राजानें दिग्विजय करून आलेल्या शिकंदराशीं टक्कर दिली तेव्हां त्याच्या लष्करांत दयानंदजींचा 'सच् गोलकार' चालू होता काय ? किंवा आपासहिबानें फिरंग्यास जेर केलें तेव्हां तो एकेश्वराचा वरप्रसाद घेऊन आला होता काय ? त्याप्रमाणेंच आमच्या देशांत येवढाले कवि, येवढाले शास्त्रकार, येवढाले शिल्पी वगैरे होऊन गेले; पण बेकन्ला जसें त्याच्या आईनें शिकविलें त्याप्रमाणें इकडेही गदाधरभट्टाची आई मोठी विदुषी होती वगैरे कांहीं एक ऐकण्यांत नाहीं ! मग हजारों वर्षें ज्या कारणांचें अस्तित्व या देशांत आहे त्यांच्या कार्यांचा आविर्भाव काय तो गेल्या पांच पन्नास वर्षांतच दृष्टी पडूं लागला हें म्हणणें किती सम- पणाचें आहे बरें ?

आतां वरील कोट्यांचें जें आम्हीं खंडन केलें त्यावरून कित्येक समंजस मंडळीचें कदाचित् असें अनुमान होईल कीं, वरील बालविवाहादि प्रकार आम्हांस सर्वप्रकारें मान्य होता, व आजपर्यंत जें चालत आलें आहे तें सर्व जसेंचें तसें चालू ठेवण्याविषयीं आमचा आग्रह आहे. वस्तुतः पाहतां वरील प्रति काढण्यास बिलकूल आधार नाहीं. आमचें म्हणणें जें काय आहे तें इतकेंच कीं, वरील प्रचार चांगले असोत किंवा वाईट असोत, त्यांच्यांत फेरफार करणें किंवा ते नाहींसें करून टाकणें हें इष्ट असो किंवा अनिष्ट असो; आज आमची जी अवस्था झाली आहे तिला ते कितपत कारणभूत होत इतकेंच काय तें पहावयाचें. येवढ्यापुरता विचार केला असतां आमचा आजपर्यंत असा अभिप्राय ठरला आहे कीं, वरील गोष्टींमुळें आज आम्ही दुर्बळ, द्रव्यहीन, सत्ताहीन, वगैरे झालों आहों या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आम्ही मूर्तींच्या पायां पडतों व स्त्रियांस शिक्षण देत नाहीं यामुळें आम्ही इंग्रेजांचे अंकित झालों हें म्हणणें, आणि आम्ही टोप्यांच्या ऐवजीं पागोटीं घालतों किंवा विजारींच्या ऐवजीं धोत्रें वापरतों म्हणून आज आमची अशी दशा झाली आहे हें म्हणणें हीं दोन्ही 'जुक्ती' च्या पारड्यांत सारख्याच वजनाचीं भरतील असें आम्हांस वाटतें !

६. तेव्हां एकंदरींत पाहतां आमच्या राष्ट्राच्या प्रस्तुत विपत्तीची आजपर्यंत आमच्यांतल्या बड्या बड्या मंडळीनें जीं एकेक बडीं बडीं निदानें ठरविलीं आहेत तीं आम्हांस बहुतेक अंशीं चुकीचींच वाटतात. वरील उपपत्ति त्यांनीं केवळ इंग्रेज लोकांच्या प्रलापावरून बसविल्या आहेत. जे इंग्रेज लोक येथें चाळीस वर्षें राहिलेले असतां व इतका काळ पावेतों आमच्यांत वावरले असतां इकडील सामान्य गोष्टीच्या संबंधानेंही कित्येक वेळां अत्यंत अनभिज्ञ असलेले आढळतात; त्यांनीं आमच्या राष्ट्राची आपल्या राष्ट्रावरून परीक्षा करावी, आणि रोगनिदान ठरवावें हें आम्हांस तर केवळ हास्यास्पद वाटतें. इंग्लंडांत हवा निराळी, राहणी निराळी, सर्वच निराळें; पण तें लक्षांत न आणतां इकडच्या रोग्याला जे उपचार करावयाचे ते सर्व तिकडचे केले असतां चालतील काय ? जो खरा वैद्य आहे तो अगोदर रोग्याच्या प्रकृतीचें मान पूर्णपणें लक्षांत आणतो, त्यास

कशापासून काय विकार जडला आहे याचा चांगला विचारपूर्वक शोध करतो, आणि मग औषधयोजना करून तिजपासून त्यास गुण येतो किंवा कसें हें वरचेवर पाहतो. पण यांपैकीं प्रस्तुत प्रकरणीं कांहींच प्रकार आढळत नाहीं. चाललेला प्रकार म्हटला म्हणजे इंग्रजी व विशेषतः नेटिव डॉक्टरांचा जो आढळतो तो! डॉक्टरसाहेबांस पाचारण करायाचें म्हटलें म्हणजे प्रथमतः रथ सज्ज करा, निघण्यापूर्वी प्रथमतः 'किंचित् व्यवहारिकं द्रव्यं' म्हणून पात्रपूजा करा, नंतर स्वारींची पायधूळ बिचाऱ्या रोग्याच्या घरीं बूटस्टॉकिंगांनिशीं झाल्यानंतर नालिकाप्रयोग वगैरे थोडेसें सोंग झालें कीं, आणा कागद आणि पेन, कीं साहेबांनीं आपल्या पातीदार दवाखानेवाल्यावर दिली एक चिठ्ठी खरडून! हें आटपलें कीं लागलेंच निघालें घड्याळ खिशांतून, कीं चालली स्वारी पुनः फडकत,—मग या त्यांच्या इंग्रेजी थाटाखालीं मधें बिचाऱ्या रोग्याचें कांहीं का होईना; त्याची कोणाला पर्वा आहे! इंग्रेजी वैद्य ग्रंथांतून ठरवलेलीं औषधें ठोकून द्यावयाचीं; मग गुण न येणें त्या ग्रंथकाराच्या माथ्यावर! डॉक्टरांची व त्यांच्या घोड्याची चंदी निघाल्याशीं त्यांचें काम! तर आमच्या आर्यभूमीचीं निदानें आजपर्यंत फरड्या इंग्रेज ग्रंथकारांनीं व हजारों रुपये 'आप्याय स्वाहा' करणाऱ्या रेवरेंड मंडळीनें जीं आजवर केलीं आहेत तीं सर्व वरील मासल्याचीं होत. इंग्लंडांत हजामाचा मुलगा लॉर्डची पदवी मिळवितो, किंवा खाटकाचे चिरंजीव वजीर बनून खिस्ती धर्माचे शंकराचार्यही होऊं पाहतात, म्हणून आमच्या पाश्चात्य मंडळीस इकडे तोच प्रकार सुरू करावासा वाटतो; व तो प्रकार इकडे सुरू होईपर्यंत सुधारणा थबकून राहणार आहे असा ते सिद्धांत करतात. त्याप्रमाणेंच इंग्लंडांतील लोक मूर्तिपूजक नाहींत, व बेकन् किंवा न्यूटन् हे देवतार्चन किंवा पितृतर्पण करीत नसत, म्हणून वरील प्रकार सुधारणादेवीचे प्रतिपक्षी होत असें प्रमेय तावडतोब त्यांच्या डोक्यांत ठाम होऊन बसतें. पण आम्हांस तर वरील प्रकारांचा आणि देशोन्नतीचा येवढा निकट संबंध कोणता आहे तो बिलकूल नजरेस येत नाहीं. आमच्या महाराष्ट्रांत येवढ्या अठरापगड जाती असतां कोंकणच्या 'भटांनीं * इतक्यांसही आपल्या बगलेंत

---

* अंक ७३ पृष्ठ ४ यांतील शतपत्र नंबर ६१ पहा.

मारून साऱ्या आर्यभूमीस पालाण घालून भोजराजा किंवा विक्रमादित्य यांचे दिवस येथें पुनः आणले कीं नाहीं ? मल्हारी धनगराचे जेव्हां मल्हारराव बनले तेव्हां जोतीजींची ' गुलामगिरी ' कोठें गेली होती बरें? राघोबा दादा येवढा कर्मिष्ठ होता म्हणून अटक नदीवर केलेली श्रावणी त्याच्या तरवारीच्या आड कधीं आली काय ? उद्यां जर आम्हांस पार्लमेंटांत मेंबर होण्याचा अधिकार आला, तर ऐरिश समुद्रांत बुडणाऱ्या सूर्यास अर्घ्यप्रदान केल्याबरोबर कर्णाची अस्त्रविद्या जशी त्यास समयीं स्फुरेना त्याप्रमाणें आमची सरस्वती ही अंजल्युदकाबरोबर विगलित होऊन भर पार्लमेंटांत आम्ही कोरडे ठणठणीत होऊन उभे राहूं काय ? तेव्हां एकंदरींत पाहतां आमच्या नवीन पंडितांनीं काढलेल्या सर्व मीमांसा सुविचारापुढें एकदम शुष्कप्राय होऊन जातात. धर्म व व्यवहार हे कोणत्याही देशांत परस्परविरोधानें कधींही राहत नाहींत. दोघांची घासाघासी होण्याची वेळ आली असतां त्या घासाघासीनेंच क्रमाक्रमानें दोघांचीही सोय निघते. खिस्ती धर्म येवढा सोज्ज्वळ व सुधारणेस अत्यंत अनुकूळ म्हणून त्याचा मिथ्यास्तव तदनुयायी करतात, व तेंच तुणतुणें आमच्या इकडचे नूतन पंडितही पुढें चालवतात, पण वस्तुतः पाहतां वरील धर्मासारखा व्यवहारदृष्ट्या अप्रयोजक धर्म दुसरा फारच थोडा सांपडेल. आमच्या राज्यकर्त्यांचे सद्गुरु साक्षात् ईश्वरपुत्र हे आपल्या अनुयायांस उपदेश करतात,—"बाबांनो, तुमच्या एका गालावर कोणीं मारली असतां दुसरा गाल पुढें करीत जा." " तुमच्याशीं दुसऱ्यानें जसें वागावें असें तुम्हांस वाटतें तसें दुसऱ्यांशीं वागत जा. " " माझें राज्य या लोकींचें नाहीं, तर आकाशींचें आहे, व तें जवळ येत आहे. " हा उपदेशाचा भाग झाला. आतां ' पवित्र शास्त्रां ' तील आचारप्रकरण पहा. आदितवारीं ईश्वरानें विश्रांति घेतली, यास्तव सर्व मनुष्यांनीं त्या पवित्र दिवशीं विश्रांति घ्यावी, कांहींएक काम करूं नये, जो करील तो महापातकाचा अधिकारी होईल. त्याप्रमाणेंच ईश्वराची मोठी तुतारी शेवटल्या न्यायाच्या दिवशीं वाजणार आहे. यास्तव सर्वांनीं आपापल्या थडग्यांतून बाहेर पडण्याची त्या दिवसाची तयारी करून ठेवावी ! आतां वरील उपदेश व वरील आचार यांविषयीं जर विचार केला, तर साऱ्या खिस्ती लोकांच्या माथीं ईश्वरदत्त आज्ञांचा केवळ

भंग केल्याचा चार्ज येत नाहीं काय? एका थोबाडींत लगावली असतां दुसरें थोबाड पुढें करणारे ख्रिस्तपुत्र आज साऱ्या भूमंडळावर कितीसे आढळतील बरें? येशूच्या नांवावर विकून प्रतिमासीं हजारों रुपये पोतडींत भरणाऱ्या पाद्रीसाहेबांवरच वरील चपेटिका प्रयोग केला असतां पोलिसास न बोलावणारे देवाचे लाल कितीसे सांपडतील? क्लैव, हेस्टिंग्स्, डालहौसी, लिटन्, टेंपल, वगैरे मंडळींची शेवटल्या दिवशीं ईश्वरपुत्र सपाटून पाठ थोपटील काय? ही सारी खाशी मंडळी जर ख्रिस्ती होय, तर उमाजी रामोशास वरील न्यायाचे दिवशीं ख्रिस्ताचें अर्धासन कां मिळूं नये? इंग्रेजांचा व साऱ्या ख्रिस्ती लोकांचा आज कित्येक शतकें जो एकंदर जगाशीं व्यवहार चालू आहे त्यास वरील ख्रिस्तप्रणीत द्वितीय सूत्र कितपतसें लागू पडेल बरें? इंग्रेज लोक गेल्या शतकभर आमच्याशीं ज्या तऱ्हेनें वागले त्याच तऱ्हेनें इतरांनीं त्यांच्याशीं वागावें असें ते इच्छितात काय? आम्हीं उठून उद्यां इंग्लंडावर गेलों, आणि सारी दौलत आणून हिंदुस्थानांत भरली तर चालेल काय? नाना तऱ्हेचे चरक लावून तेथील सारी प्रजा पिळून काढली असतां तें आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंस कितीसें मानवेल बरें? फुलर साहेबांनीं एका शिपायास मारलें आणि त्याच्या बायकोला तीस रुपये त्याच्या प्राणाची मरपाई म्हणून दिले, त्याप्रमाणेंच एखाद्या ख्रिस्तपुत्रास आकाशांतील बापाकडे रवाना करून मडमसाहेबांची समजूत वरील दक्षिणा देऊन केली तर मोठी मौज होईल नाहीं बरें? बिचारा क्रूसावर चढणारा येशू जर आपल्या शिष्यांस असें सांगतो, कीं मी तुम्हांस आकाशांतील राज्याचे वांटेकरी करीन. तर आजपर्यंत या सच्छिष्यांनीं साऱ्या पृथ्वीभर जो धिंगाणा घातला व अजूनही घालीत आहेत व नवी नवी रणसामग्री करून एकमेकांच्या उरावर बसण्यास ते जे नेहेमीं टपलेले असतात, हा सर्व प्रकार ईश्वरपुत्राच्या कानांवर जेव्हां पूर्वोक्त दिवशीं जाईल तेव्हां त्यास काय वाटेल बरें? आमच्या साध्याभोळ्या आदिपितरांनीं नुसतें झाडाचें फळ तोडून खाल्लें येवढ्याबद्दल जर अल्लासाहेब इतके क्रुद्ध झाले, तर त्यांच्या पुत्रास वरील आज्ञाभंग पाहून किती अपरिमित संतोष होईल कोण जाणे!! याप्रमाणेंच विश्रामदिवशीं काम केलें असतां महापातक

लागतें या पवित्र आज्ञेचा तरी वरील सत्यधर्मी लोक कितीसा प्रतिपाळ करतात हें दिसतेंच आहे; तसेंच जहाजावर जे जे मरतात त्यांचा अंत्यविधि ' समुद्रास्तृप्यंतु ' या वचनास अनुसरून जो होत असतो त्या वेळेस तरी पवित्र शास्त्र गुंडाळूनच ठेवतात कीं नाहीं ? कां कीं अटलांटिक किंवा पासिफिक महासागराच्या तळीं शेवटल्या दिवशींची तुतारी वरील खिस्तपुत्रांच्या कानीं पडेल हें म्हणणें नीट दिसत नाहीं; आणि त्यांतूनही जी मंडळी माशांच्या उदरीं जाऊन त्यांचा तळीराम गार करीत असेल त्यांची तर बिचाऱ्यांची मधल्यामध्यें काय वाट होणार कोण जाणे ! ' इतो भ्रष्टास्ततो भ्रष्टः ' ! ! असो; तर एकंदरींत काय सांगावयाचें, कीं ईश्वरप्रणीत व अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचा जो खासा खिस्ती धर्म त्याची वर सांगितल्याप्रमाणें दशा आहे. त्यांतील अत्यंत मूलभूत सिद्धांतही व्यवहाराला अत्यंत विरुद्ध आहेत, त्याप्रमाणें जर कोणी चालेन म्हणेल तर त्यास बिचाऱ्यास एक पाऊलही पुढें टाकण्याची सोय नाहीं. मग असें असतांही आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंनीं जर आज इतकी मजल मारली, तर प्राच्य आर्यांनीं येवढें हवालदील होऊन हात टेंकून कशाला बसावयाला पाहिजे बरें ? आम्हांस तर खास वाटतें कीं, आजपर्यंत आमच्या खाशा विद्वन्मंडळानें आपल्या जुन्या धर्माच्या संबंधानें व भटांच्या नांवानें सदोदित हाकाटी करीत बसायाचें सोडून आपला देश सुधारायाचे कामीं जर एकदम कंबर बांधली असती तर आजमित्तीलाच आम्ही केवढा पल्ला आटपला असता ! पण आजपर्यंत झालेला प्रकार कांहीं विचित्रच ! मूर्तिपूजा ही आमच्या देशाच्या सुधारणेस अत्यंत विघ्नभूत, म्हणून ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज वगैरेंची स्थापना अवश्य झाली पाहिजे; जुने शास्त्री व जुनीं भटें मोठीं खरतड, म्हणून ' प्रथम पाठशाळेचा विध्वंस होऊन हें पुरंधरचें बंड मोडलें पाहिजे; ' जातिभेद हा तर मोठाच समंध, यास्तव सब गोलंकार करण्याचा मक्ता पाश्चात्य सुधारणेचा केवळ अर्कच जो द्राक्षारस त्याच्याकडे सोंपून दिला पाहिजे; युरोपांत स्त्रियांच्या पाणिग्रहणास कांहीं मर्यादा नाहींच, यास्तव चाळीस व पन्नास वर्षांच्या कोवळ्या वधूवरांचा संयोग होऊन लग्नाची टाळी वाजली पाहिजे; आमच्यांतले नामदारपुत्र प्रभृति एकेक जाडे जाडे पंडित तिकडे विलायतेस जाऊन

पार्लमेंट गर्जवून देणार, यास्तव सोवळ्याओवळ्याचें मूर्खपणाचें लचांड काढून टाकण्याकरतां देहास पावन करणाऱ्या बुटणेरी पावांचा ओनामा येथपासून पडला पाहिजे ! याप्रमाणें आमची सुधारणेच्छु मंडळी आजपर्यंत कोणीकोणीकडे भकून गेली आहे याचा पत्ता नाहीं; आणि इतके दिवस सुधारणेच्या मागें लागले असतां ती अद्याप घावली नाहीं ती नाहींच ! नाहीं म्हणायाला ' शिव शिव न हिंदुर्न यवनः ' इतक्या मासल्याचे कांहीं चारचार करायाला मात्र आम्ही शिकलों आहों ! त्यांच्या योगानें आमच्या पूर्व स्वरूपास आम्ही मुकून हल्लींच्या दैन्य व विपत्ति यांच्या विलक्षण स्थितीस मात्र येऊन पोंचलों आहों !—ना धर्म, ना देश, ना सामर्थ्य, ना संपत्ति, ना कांहीं ! !

---

छिन्नोऽपि रोहति तरुश्चंद्रः क्षीणोऽपि वर्धते लोके ।
इति विमृशंतः संतः संतप्यंते न लोकेऽस्मिन् ॥ *

' नीतिशतक '

१. मागील अंकांत आमच्या राष्ट्राच्या संबंधानें आजपर्यंत विद्वन्मंडळानें काय काय निदानें ठरविलीं व काय काय चिकित्साप्रयोग केले ते सांगितले. आतां आम्ही आपली उपपत्ति व उपचार आमच्या देशबंधूंस सादर करून हा विषय आटपतों.

२. प्रथमतः आमच्या प्रस्तुतच्या ऱ्हासस्थितीची उपपत्ति. प्रस्तुत विषयावर आमच्या आजपर्यंत काय समजुती झाल्या आहेत त्या नुकत्याच आम्ही प्रदर्शित केल्या आहेत, यास्तव त्या पुनः येथें दाखल करण्याची जरूर नाहीं. आमचा ठरलेला सिद्धांत आम्हीं मागेंच नमूद केला आहे, कीं आमच्या देशास कांहीं एक झालें नाहीं. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांहीं एक विकार नाहीं.

---

* " झाड तोडलें तरी पुन्हां वाढतें, व चंद्रास क्षय लागला असतांही तो पुनः वृद्धिंगत होतो.—या सृष्टिधर्माकडे लक्ष देऊन सज्जन विपत्तींतही खचून जात नाहींत. "

यास्तव आमच्या अर्वाचीन पंडितमंडळीनें डाक्तरी पद्धतीस अनुसरून एकावर एक जालीम दवे सुरू करून व शस्त्रक्रियेचे तीव्र प्रयोग करून त्याची जी हलाखी मांडली आहे व विनाकारण विटंबना आरंभली आहे ती सर्व सोडून देऊन साधारण पौष्टिकाचे उपचार त्याजवर सुरू झाले असतां तो लवकरच पुनः पहिल्यासारखा सशक्त व तेजस्वी होईल याविषयीं आम्हांस बिलकुल संशय नाहीं. हल्लीं जी आमच्या राष्ट्रास विपत्तीची स्थिति प्राप्त झाली आहे ती आमच्या अंगच्या कांहीं अनिवार्य दोषांमुळें आली नसून ती यदृच्छेनें कोणत्याही देशास येण्यासारखी आहे, व आजपर्यंत आलीही आहे. इंग्रेज लोक हे आम्हांहून अनेक प्रकारांनीं बलिष्ठ असल्यामुळें व आमचें दैव फिरल्यामुळें हल्लींच्या अवस्थेंत आम्ही येऊन पडलों आहों. ज्या प्रबलतेमुळें व ज्या सद्दीमुळें स्कॉटलंडसारखा वीर्यपरिप्लुत देश आमच्या राज्यकर्त्यांच्या सत्तेखालीं आला, आणि फिलिप व नेपोलियन् सारखे मी मी म्हणत त्यांच्यावर चढाई करून गेले असतां ते हतवीर्य होऊन माघारीं आले, त्याच दोन कारणांचा येथेंही प्रभाव गाजला आहे. बाकी ज्या देशांत शिवाजी, बाजीराव, माधवराव, राघोबा, हैदर, यशवंतराव, रणजितसिंग, तात्या टोपी असलाले एकेक तरवारबहादर होऊन गेले व बाळाजी विश्वनाथ, नाना फडनवीस, सखारामबापू, महादजी शिंदा, नानासाहेब, असले मसलती पुरुष ज्या देशांत निपजले तो म्हणजे क्यापटन् क्लैव सारख्यांस व वॉरन् हेस्टिंग्स सारख्यांसही हार जावा, अशांतली बिलकुल गोष्ट नव्हती ! पण कालगति विचित्र आहे; त्या वैचित्र्यांतीलच आमची प्रस्तुतची स्थिति हा एक प्रकार होय.

आतां ही जी आमची सांप्रतची दुरवस्था हींतून सुटण्याचा कांहीं मार्ग आहे कीं नाहीं व असल्यास तो कोणता याविषयीं विवेचन करायाचें.

आमच्या प्रस्तुतच्या दैन्याचें मुख्य कारण काय आहे हें कोणालाही सांगायाला नकोच. तें परकी अंमल हें होय हें उघडच आहे. इंग्रेज लोक इकडे प्रभु होण्यापूर्वीं हा देश फार संपन्न होता व मुसलमानांची जुलमी म्हटलेली कारकीर्द सांप्रतच्या सुधारलेल्या कारकीर्दीहून शंभर वांट्यांनीं बरी वगैरे गोष्टी आलीकडे सिद्धांतासारख्या होऊन बसल्या आहेत, व प्रत्यक्ष

इंग्रेज लोकही त्या बोलून दाखवितात, हें आज बहुधा सर्वांस माहीत असेलच. असो; तर आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंचें आधिपत्य हें जर आमच्या विपत्तीचें मोठें कारण होय, तर तें नाहींसें झालें असतां आमची स्थिति सुधारेल ही अर्थातच कोणाच्याही मनांत प्रथमतः मोठी कल्पना येणार आहे. तर आमचा व आमच्या राज्यकर्त्यांचा संबंध तोडून टाकून आपणांस सुखी करण्याचें आमच्या स्वाधीन आहे कीं काय याविषयीं पहिल्या-प्रथम विचार करूं.

वरील उपाय म्हटला म्हणजे आम्ही आमच्या राज्यकर्त्यांशीं लढाईला उभें राहून त्यांचा पराजय करायाचा, व आपलें राज्य पुनः आपलें आपण वहिवाटायाचें हा होय. आतां ही गोष्ट हल्लींच्या काळीं कितपत साध्य आहे हें बहुधा एकाद्या लहान पोरालाही कळण्यासारखें आहे. जो असंबंध सिद्ध करायास आमच्या पातालवासी बंधूंस आठ वर्षें घनघोर संग्राम करावा लागला, व ऐरिश लोकांनीं आज शेंकडों वेळां झटापटी खाल्ल्या पण कांहीं एक झालें नाहीं, तो आमच्यानें आज तडीस जावयाचा म्हणजे खरेखरेच मुसळास अंकुर फुटावयाचे होत! आमच्या राज्यकर्त्यांचें केवढें अपार सामर्थ्य व केवढा कड्डा सरंजाम, तसाच केवढा जगड्व्याळ बंदोबस्त; आणि आमच्याकडे मंडळींत परस्पर किती सूत, आमची हल्लींची रणसामग्री किती, व युद्धकलेचें ज्ञान किती...सर्वच गोष्टी अनकूल! असो; तर वरील थोरल्या उपायाच्या संबंधानें तर आज कोणी गोष्टही काढूं नये अशी सांप्रतची अवस्था आहे हें स्पष्टच आहे.

तेव्हां हें सिद्ध आहे कीं आम्हांस सांप्रतच्या दुरवस्थेतून जर निघायाचें असेल तर आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांशीं बिघडून आम्हांस बिलकुल सोय नाहीं. जो प्रसंग पडला आहे त्यास सादर होऊन त्यांच्या सलोख्यानेंच जें काय कार्य होईल तेवढें करून घेतलें पाहिजे. हा सलोखा होण्यास दिवसांदिवस अधिकाधिक सोईही होत चालल्या आहेत. पूर्वीं टोपकराचा स्पर्श होतांच सचैल स्नान करावें अशा ज्या आमच्या ठिकाणीं आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंविषयीं समजुती होत्या त्या आतां पुष्कळ कमी होऊन त्यांचें वैभव व थोरवी हीं आतां आमच्या पुरतीं लक्षांत येऊन चुकलीं आहेत, त्याप्रमाणें हिंदु म्हणजे आफ्रिकेंतील नीग्रो लोकांचे बंधु ही जी

आकाशांतील बापाच्या पवित्र लेंकरांनीं चोहोंकडे समजूत पसरून दिली होती तींतही आतां इतकें अंतर पडलें आहे कीं, जगाच्या चारी खंडांत गीर्वाण वाणीचा घोष सुरू होऊन अमेरिकेंतली मंडळी अर्धा गोल ओलांडून आम्हांस कडकडून भेटण्याकरितां व आमच्या प्राचीन ऋषींचा आम्हांपासून अनुग्रह घेण्याकरतां आम्हांकडे उड्या टाकूं लागली आहे. तसेंच अर्वाचीन शास्त्रांनीं व कलांनीं सारें भूमंडल एकमय करून टाकून 'पवित्र शास्त्रां'तील सार्वलौकिक बंधुत्वाचें जें पोकळ मत त्यांस यथार्थता आणण्याचा योग आणला आहे. खेरीज या शतकांत राजांच्या सत्तेस धक्का बसून त्यांचें माहात्म्य किती कमी होत चाललें आहे, आणि लोकप्रभुत्व व स्वातंत्र्य हीं तत्त्वें चोहोंकडे किती जारीनें पसरत चाललीं आहेत हेंही आज कोणाही शोधक मनुष्याला अश्रुत नाहीं. तर वरील सर्व गोष्टींचा विचार केला असतां या देशाविषयीं कळकळ बाळगणाऱ्या कोणाही मनुष्यास मोठी उमेद येण्यासारखी आहे कीं, हल्लींच्या निकृष्टावस्थेंतून निघून हिंदुस्थानानें पुनः आपलें नांव जगांत गाजवावें असें होण्यास दिवसांदिवस अधिकाधिक उपाय सिद्ध होत आहेत.

आतां वरील उपाय कोणते, त्यांची योजना कोणत्या तऱ्हेनें झाली पाहिजे, व आजपर्यंत आमच्या मंडळींचें काय काय चुकत होतें, वगैरे गोष्टींच्या संबंधानें आम्ही आपले विचार आमच्या देशबंधूंस सादर करतों.

मनुष्याची किंवा राष्ट्राची सुधारणा करायाची म्हटली म्हणजे तिचा पाया आत्मस्थितीचें पूर्ण ज्ञान हें होय. ज्यास आपली अवस्था काय आहे, पुढें काय होणार, आपलें बळाबळ किती, वगैरे गोष्टींचें चांगलेंसें ज्ञान नाहीं त्याची स्थिति कधीं सुधारायाची नाहीं. तर आमच्या लोकांस प्रथमतः स्वतःविषयींचें ज्ञान करून देणें अवश्य होय. आतां स्वतःविषयींचें ज्ञान म्हणजे काय अशी कोणी पृच्छा केली तर तिचें उत्तर असें आहे. साऱ्या जगाची स्थिति हल्लीं काय आहे, आलीकडे निरनिराळ्या संबंधांनीं पृथ्वींतील देशांचे परस्परांशीं व्यापार कसे सुरू आहेत, त्यांत या आमच्या देशाचें इतरांशीं दळणवळण कोणत्या प्रकारचें आहे, आमच्या राष्ट्राची पूर्वी स्थिति कशी होती व हल्लीं कशी आहे, या स्थित्यंतराची उपपत्ति काय, आपली पुनः भरभराट होण्यास कोणत्या गोष्टी आवश्यक आहेत,

इत्यादि विषयांवर सर्वांचे यथार्थ समज होणें हें अगोदर फार जरूरीचें आहे. हें जोंपर्यंत होणार नाहीं तोंपर्यंत हल्लींसारखेंच पोकळ लोककल्याण व रिकामी बडबड चालेल. व वास्तविक उपयोगाचें असें कांहीं एक होणार नाहीं. उघडच आहे कीं, ज्याला आपणांस कांहीं रोग जडला आहे हीच मुळीं कल्पना नाहीं तो औषधक्रियेची तजवीज कशाला करील ? तो मूर्खपणानें कुपथ्यावर कुपथ्यें करून ऐन त्रिदोषाच्या वेळेस मात्र हाका मारीत बसेल, तर ज्यास आपली प्रकृति नीट करून शरीर दृढ करायाचें असेल त्यानें प्रथमतः आपल्या प्रकृतीचें मान समजून घेणें जसें अत्यावश्यक होय, त्याप्रमाणेंच येथेंही प्रत्येक मनुष्यास आपल्या देशाची स्थिति पूर्णपणें लक्षांत येऊन आपलें बळाबळ जेव्हां त्याच्या पुरतेपणीं मनांत भरेल तेव्हां आमच्या सुधारणेला आरंभ झाला असें खास म्हणतां येईल. आतां ही साऱ्या राष्ट्राची जागृति व्हावी कशी ? हा वरच्याच्या पुढला विचार होय. पण याचाही निकाल करणें फार कठीण आहे असें नाहीं. अज्ञान ध्वंसनाचीं आलीकडे जशीं जबरदस्त साधनें उपलब्ध झालीं आहेत तशीं पूर्वीं कधींही नव्हतीं. छापखाने, आगगाड्या, आगबोटी, डाका, तारायंत्र वगैरे अर्वाचीन कला हीं सर्व युद्धांत कामीं पडणारीं अशीं केवळ दिव्य अस्त्रेंच होत असें म्हटलें असतां चालेल. पण हीं स्वतः केवढींही प्रबळ असलीं तरी उपयोग काय ? पंतांनीं आपल्या प्रसिद्ध महाकाव्यांत म्हटलें आहे:—

सहाय असिला असे तरिच शत्रुला मारव ।

मोठी भवानी तलवार असली तरी तिचें पाणिग्रहण जेव्हां ' यवन-कुंजर शिरपर ' चढणाऱ्या ' सिंहा ' नें करावें तेव्हां तिचें पाणी खळाळ-णार, नाहीं तर कोंडून राहिलेल्या डबक्याप्रमाणें तें जागच्या जागींच मठ्ठ बसून राहणार !

तर वरील महासाधनांच्या द्वारें आमचा येवढा सारा देश जो कुंभ-कर्णासारखा निद्रापद भोगीत स्वस्थ व सुस्त होऊन पडला आहे त्यास हाल हालवून जागें करण्याची प्रथमतः तजवीज झाली पाहिजे. हाच प्रकार यापूर्वीं साऱ्या युरोपांत, फ्रान्स देशांत, व रशियांत झालेला आहे. अवघें

युरोपखंड हें सोळाव्या शतकापूर्वी आमच्या देशाप्रमाणेंच स्वस्थपणें घोरत पडलें होतें. पण चीन देशांतून मुद्रणकलेनें येऊन पाश्चात्य राष्ट्रांचे ठायीं वस्ती केली मात्र, तों लागलींच पन्नास साठ वर्षांत जिकडे तिकडे चळवळ सुरू झाली. जुन्या ग्रीक व लाटिन ग्रंथांचा साऱ्या देशांत अभ्यास व्हाव• याला लागून युरोपची बुद्धिदेवता फार दिवसपर्यंत जी निद्रिस्त झाली होती ती एकाएकीं जागृत झाली. हिचें फळ सोळाव्या शतकांतील जगत्प्रसिद्ध धर्मक्रांति हें होय. याप्रमाणच फ्रान्स देशांतही अठराव्या शतकापर्यंत बिलकुल गडबड नसून हवी तशी अंदाधुंदी चालली होती, व एकंदर राष्ट्र हें मेंढवाड्यासारखें होऊन गेलें होतें. सरकारी अधिकाऱ्यांनीं हवे तसे जुलूम करावे, आणि ते खुशाल खपले जावे. पण व्हॉल्टेर प्रभृति महान् महान् ग्रंथकारांनीं देशभाषेच्या द्वारें लोकांचें मन क्षुब्ध करून त्यांस सुजाण केल्याबरोबर वरील शतकाच्या शेवटीं अशी धुमश्चक्री उडाली कीं तिनें फ्रान्सच काय, पण सारें युरोपखंड खळबळून सोडलें! अशाच प्रकारचें तिसरें उदाहरण रशियन लोकांचें होय. हे लोक अद्यापही आडदांड व दांडगे असेच आहेत, व त्यांची गणना सरासरी अर्धवट रानटी लोकांतच आहे. मग दोन शतकांपूर्वी तर त्यांची अवस्था काय असेल ती पहा! पण तसल्या स्थितींतही त्यांचा राजा पीटर दि ग्रेट यानें जातीनें अचाट मेहेनत करून त्यांची सुधारणा करण्याचें मनांत आणलें, आणि पांच-पंचवीस वर्षांत आपल्या राष्ट्रांत अतोनात फरक करून सोडला. तो इतका कीं रशियाचें संस्थान आज साऱ्या युरोपांत प्रबळ होऊन बसलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं! असो; तर ज्ञानाच्या प्रसाराचा महिमा असा विचित्र आहे.

तेव्हां आमच्या देशाची हलाखी पाहून ज्यास खरोखर दुःख होत असेल, व तिजपासून त्याची सुटका व्हावी म्हणून जे झटत असतील, त्यांनीं वरील ज्ञानांजनाचा प्रयोग करण्याचें मनावर घेतलें पाहिजे. सर्व क्रियेचें मूळ मन आहे, यास्तव तेंच सुविचारसंपन्न व पोक्त झालें असतां केवढा फायदा होणार बरें! ही गोष्ट येवढी स्पष्ट असतांही तिजकडे आमच्या आजपर्यंतच्या पुढारी मंडळीचें कांहींच लक्ष पोंचलें नाहीं असें म्हटलें पाहिजे. देशहिताची दीक्षा विद्यापीठांतील भट्टाचार्यांपासून घेऊन निघाल्या-

वर आमच्या नूतन पंडित मंडळीनें करावें काय, तर सरकारी हुद्दे मिळवावे, जन्मभाषेची व आपल्या देशाची ओळख विसरून जाऊन पाश्चात्य भाषेंत निरंतर अद्वातद्वा प्रलाप करावे व आपल्या राज्यकर्त्यांचें सर्व प्रकारें अनुकरण करून मोराचीं पिसें लावून आयता थोरपणा मिळवूं पाहणाऱ्या डोमकावळ्याच्या पंक्तीला बसावें, आणि लोककल्याणाची मोठी शिकस्त काय, तर मोठा थोरला तंबुरा घेऊन आकाशांतील बापाच्या कानीं सुस्वर आक्रोश पाडावा, किंवा मिशनरी साहेब जसें एकाद्या 'वेड्या कोकरा' ला धरून आपल्या कळपांत ओढून नेतात, त्याप्रमाणें एकादा उपटसुंभ्या बघावा आणि एकाद्या हतभाग्य देशभगिनीचा व त्याचा योग करून देऊन आपण मुकाट्यानें निसटून जावें! ज्यांच्या शिरावर साऱ्या देशसुधारणेचा भार, व जे आपणास अटोकाट शहाणे समजून आपल्या देशबंधूंचें विपत्तिरूप महागर्तेतून उद्धरण करणार, त्यांच्या वरील कृति पाहून कोणास आश्चर्य व खेद हीं वाटणार नाहींत! प्रार्थनासमाजीय तंतुवाद्यांच्या शंभर भोपळ्यांनीं तरी हा विपन्मग्न देश तरण्याचा संभव आहे काय? त्यांचा कर्णमधुर व पवित्र रव हिंदुस्थानच्या वीस कोटी प्रजेच्या कानीं कधीं पडणार! आणि तो पडला असें जरी मानलें तरी त्यापासून या भरतवर्षाची उन्नति होण्याचा कितीसा संभव आहे याविषयीं आम्हांस फार संदेह आहे. ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज हे जरी खूप जारीनें सुरू झाले तरी त्यांत देशास किफायत ती काय होणार? इतर शेंकडों पंथ आहेत त्यांत हेही आणखी सामील होतील, दुसरें काय? त्याप्रमाणेंच आलीकडे पूर्वीचे संप्रदाय मोडून टाकून हवे तसे गमतीचे विवाह जे होत आहेत त्यांपासून तरी काय निष्पन्न होणार असेल तें असो! इकडील एकादी फांकडी मिस् (कुमरी) आणि तिकडचा एक घोटक ब्रह्मचर्य आचरणारा गोरा नवरा यांचा गांधर्वविवाह झाल्यानें आमच्या देशसुधारणेचें तारूं जर पुढें ढकललें जाणार तर बटोदर मुक्कामीं कांहीं वर्षांपूर्वीं जो कपोतविवाह येवढ्या कडाक्यानें गाजला तोही देशोन्नतीची पताका फडकण्यास परम साधनीभूत म्हणून समजायाला नको काय? एकंदरींत पहातां आम्हांस वरील प्रकार केवळ बालिशत्वाचे वाटतात.

त्यांत व देशोन्नतींत ज्यांस कार्यकारणभाव दिसत असेल त्यांचें तार्किक आमच्याहून फार निराळें आहे असें म्हणून स्वस्थ बसणें भाग आहे !

तर देशस्थिति सुधारण्याचा राजमान्य मार्ग म्हटला म्हणजे लोकांस ज्ञानसंपन्न करणें हा होय. हीं संपन्नता सिद्ध करण्याचीं मोठीं दोन साधनें म्हटलीं म्हणजे रसना व लेखनी हीं होत. पहिल्या सदराखालीं शाळा, व्याख्यानें येतात; दुसऱ्याखालीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व ग्रंथ हे येतात. या दोन्ही साधनांचा उत्कर्ष होऊन या अज्ञानांध राष्ट्राचे डोळे उघडावे एतदर्थ आमच्या थोर व दयाळू सरकारनें आजपर्यंत थोडा उद्योग केला आहे असें नाहीं. युनिवर्सिटी ( विद्यापीठ ), विद्यालयें, शाळा, वगैरेंची स्थापना करून आज वर्षानवर्षे त्यांची व्यवस्था चालविली आहे, व देशभाषांची अभिवृद्धि व्हावी म्हणूनही होईल तितका यत्न सरकारनें केला असून अजूनही तो चालू आहेच. पण सरकारनें आपलें काम बजाविलें म्हणून तितक्यानें काय झालें ? आम्ही स्वतः मोठें कर्तृत्वाचे पडलों ना ! आमच्या तोंडावर अचानक जांभूळ पडलें तरी तें आंत लोटायलाही आणखी कोणी पाहिजेच ! आमची मर्दुमकी असली कीं रडतरावाप्रमाणें आम्हांला घोड्यावर बसवून शिवाय आमच्या हातून लोकांनीं तरवारही मारविली पाहिजे ! वस्तुतः पाहतां सरकारनें जर इतका पल्ला मारला, तर बाकीची मजल आम्ही मोठ्या संतोषानें व उत्साहानें केव्हांच आटपावी. येवढा ज्ञानाचा प्रवाह आडवून त्याची मालकी जर आमच्या सरकारनें आमच्या नवीन बांडास दिली; तर नलिकाद्वारें घरोघर उदकसंचय करण्याचें अल्पस्वल्प कामही त्यांच्यानें होऊं नये ? पण हें करतो कोण व गरज कोणाला ? शिवाय असें करण्यापासून कांहीं फायदा होण्यासारखा आहे हें तरी कोणाच्या अंतःकरणांत बिंबलें आहे ? आमच्या भाषेंत म्हण आहे कीं, ' डोळ्यांत केर आणि कानांत फुंकर '; तर याच न्यायानें सारी व्यवस्था चालली आहे. आमची अन्नान्नगत झाली आहे, दुष्काळाचा तडाका उडाला म्हणजे लाखों लोकांची चांदी उडते आहे, सरकारदेण्याखालीं रयतेचा चुराडा होत आहे, लोकांस आपल्या सामान्य हक्कांचें व सामान्य गोष्टींचें सुद्धां ज्ञान नसून त्यांच्या अभावीं त्यांची स्थिति पशुवर्गासारखी होऊन गेलेली आहे; येवढा हा संपन्न देश असतां, येथील

लोकसंख्या येवढी असतां, लोकांची बुद्धि येवढी प्रखर असतां व आहे तेथें अर्थसंचयही विपुल असतां कल्पवृक्षाखालीं उपवास या न्यायानें इतकी प्रजा व्यर्थ हाल सोसते आहे,—ही स्थिति सर्वांच्या डोळ्यांसमोर आहे; आणि देशोन्नतीचे धुरंधर वरील विपत्तींच्या प्रतिकारार्थ उद्योग काय करते आहेत म्हणाल, तर एक आकाशांतील बापास आरोळी देत आहेत, दुसरे आपल्या लेडीकरवीं कोणा गौरकाय अधिकाऱ्याचें हस्तपीडनपूर्वक स्वागत करताहेत, कोणी पार्लमेंटच्या गर्दीत गुंग होऊन गेले आहेत, कोणी अर्वाचीन सोमरसांत तल्लीन होऊन जातिभेदरूप महान् अनिष्टांचा उपशम होऊन या देशास आराम पडावा म्हणून अर्वाचीन ऋषींचा तांडा जुळवून गवालंभाचें अनुष्ठान करीत आहेत, कोणी सरकारी अधिकाऱ्यांचे प्रतिदिवशीं उंबरठे पुजून त्यांच्यापुढें निरंतर लांगूलचालन करीत आहेत, इ. इ. ! हा सर्व प्रकार आम्हांस तर केवळ लज्जास्पद दिसतो. मेकॉले सारख्यांनीं येवढी भवति न भवति करून व येवढा अट्टाहास करून जी नवीन शिक्षणपद्धति सुरू केली तिचीं वर सांगितलीं हींच फळें काय ? त्यांनीं लावलेल्या उत्तम वृक्षास दरवर्षी येवढा मोहोर येत असतां तो बहुधा सगळाचा सगळा गळून जावा आणि फळ म्हणून प्रायः मुळींच धरूं नये ही केवढी खेदाची गोष्ट आहे ! आमच्या राष्ट्रांचे पालक म्हणून ज्यांस सरकारानें नेमलें आहे त्यांनीं आपला अधिकार किती उत्कृष्ट रीतीनें आजपर्यंत बजावला बरें !

IRBK-0103174
IRBK-0103174